पराशक्ति

कुंडलिनी शक्ति जागरणाच्या काळातील माझे अनुभव

कर्नल टि श्रीनिवासुलु

Copyright © 2018 T Sreenivasulu

All rights reserved.

समर्पण

७०० वर्षांपूर्वी भारतातील काश्मिर घाटीत, श्रीनगरच्या रस्त्यावर अर्धनग्न अवस्थेत फिरत असणाऱ्या त्या स्त्रीला समर्पित. काश्मिर घाटीतच जन्म झालेल्या त्या महान प्रतिभाशाली स्त्रीला समर्पित आहे, जिने आपले मृत शरीर दोन कट्टर पंथि संप्रदायांच्या आपसातील मतभेदामुळे उत्पन्न झालेला वाद मिटवण्यासाठी त्यांच्या दृष्टिपथातून गायब केले. त्या नारीला, त्या महान योगिनीला शतशत प्रणाम. तिचे नाव लल्लेश्वरी अथवा लाल देवी, लल्ला.

श्री स्वामी सहाजानंद तीर्थ लेखकाचे आदरणीय गुरु, २००९ मध्ये त्यांच्या वयाच्यां ८५ व्या वर्षी लेखकाला भेटले

सामग्री सारणी

लेखकाचे महा मायेला समर्पण
आभार
प. पू. स्वामी सहजानंद तीर्थ यांचे आशिर्वचन
विषय प्रवेश
संक्षिप्त योग प्रणाली
सिद्ध महायोग
दिव्य योग प्रकाराचे चार मार्ग
कुंडलिनी शक्ति
शक्तिपात
शक्तिपात गुप्त पद्धतीचा संक्षिप्त इतिहास
क्रिया
शक्तिची संरचित अभिव्यक्ति
कुंडलिनी शक्तिची जागृती
क्रियांचे प्रकटीकरण
सहस्रारात शक्तिचे आरोहण
शक्तिचे गतिविज्ञान
मेरुदंड स्थित विशेष प्रतिक्रिया
शक्ति आणि साधकांमधील पडदा
क्रिया रुप जीवन
बुद्धि परिवर्तन
योगाभ्यासाच्या दरम्यान गुरुंचे मार्गदर्शन
अंतिम शब्द
शब्द-अर्थ (शब्दार्थ)
शक्तिपात पद्धति के आश्रम.
शक्तिपात पद्धति के संत (अनुमार्गणीय इतिहास)

लेखकाचे महा मायेला समर्पण

माझा भ्रम ही शक्ति आहे! माझी बुद्धि ही शक्ति आहे!
माझा अहंकार ही शक्ति आहे! माझे बुद्धत्व ही शक्ति आहे!
माझे शरीर ही शक्ति आहे! माझे प्रेम ही शक्ति आहे!
माझा क्रोध ही शक्ति आहे! माझा गर्व ही शक्ति आहे!
माझी वासना ही शक्ति आहे! माझा लोभ शक्ति आहे!
माझा श्वास ही शक्ति आहे! माझी जीवनशक्ति शक्ति आहे!
माझे जीवन ही शक्ति आहे! माझे स्वप्न ही शक्ति आहे!
माझी निद्रा ही शक्ति आहे! काळ ही शक्ति आहे!
ब्रम्हांड ही शक्ति आहे ! काल ही शक्ति आहे!
माझे समर्पण ही शक्ति आहे.
संपूर्ण सत्य ही शक्ति आहे.
चैतन्य ही शक्ति आहे.
परमानंद संपूर्ण शक्ति आहे.
शक्ति रहस्यमय आणि अक्षय आहे.
तिलाच कुंडलिनी नावाने संबोधले जाते.
ईश्वराला अज्ञात शक्ति पराशक्ति.

आभार

ज्या योग परंपरेत ज्यांच्या घरी मला अनुग्रहित केले गेले तो, माझ्या लहानपणाचा मित्र डॉ. वि.वि.एस.एस. चंद्रशेखरम् व त्यांची पत्नी राजेश्वरी यांचा मी आभारी आहे.

माझे परम पूज्य गुरुजी श्री. स्वामी सहजानंद तीर्थ यांच्या आशीर्वादा शिवाय या पुस्तक लिखाणाबद्दल मी विचार देखील करू शकत नाही. संपूर्ण लेखन काळात स्वामीजींची नजर होती, जेणेकरून मी कधीही विषयापासून दूर भरकटला जाऊ नये.

पुस्तकाच्या सुरुवातीच्या लेखनात फेरफार वा दुरुस्ती करण्यासाठी माझे सहचारी श्री. कमल कुमार, श्री. रविकुमार कौशिक व श्री. अजय हमसागर यांच्या प्रति आभार प्रदर्शित करू इच्छितो.

या पुस्तकाचे उच्च कोटीचे व्यापक संपादन, स्वरूप, मुखपृष्ठ आणि प्रकाशन निश्चित करण्यासाठी त्यांचा हार्दिक आभारी आहे.

हे पुस्तक प्रकाशित करण्याची अनुमती मिलिटरी इंटेलिजन्स निर्देशालय (भारतीय सेना) द्वारा प्राप्त झाली त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो.

मी श्री मोहन विनायक जोशी जी यांचा आभारी आहे. त्यांनी माझ्या पुस्तकाचे उत्कृष्ट भाषांतर मराठीत केले. त्यांच्यासारखा उत्तम भाषांतरकार माझ्या पुस्तकासाठी दुसरा कोणी मिळाला नसता.

प. पू. स्वामी सहजानंद तीर्थ यांचे आशिर्वचन

आपल्या सृष्टिकर्त्याच्या मिलना संबंधीचा निवडलेला मार्ग प्रत्येक व्यक्तिसाठी अद्वितीय आणि विशिष्ट असतो. मार्ग कोणताही असला तरी परमात्म्याची दिव्य कृपा त्याला सतत प्राप्त होत असते. तसेच त्याला मार्गदर्शन पण मिळत असते.

प्रत्येक जीवाची परमेश्वराबद्दलची कल्पना विशिष्ट आणि वेगवेगळी असते, कारण प्रत्येकाचे सांसारिक ज्ञान हे वेगळे असते त्यामुळेच प्रत्येकाची परमेश्वराविषयीची धारणा त्या व्यक्तिसाठी निश्चित स्वरूपाची असते. विषय नीट समजावा म्हणून काही उदाहरणे देऊन समजावून देऊ इच्छितो. एखादी व्यक्ति परमेश्वराची पूजा-अर्चना प्रेमिकेच्या स्वरूपात करू शकतो किंवा मित्र, पिता, माता, पुत्र, पुत्री अशा मानवीय नाते संबंधाने करू शकतो. अशा प्रकारची उदाहरणे रामायण-महाभारतात भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत. वाचक या विषयी परिचित आहेतच की कृष्णाची पूजा त्याचे भक्त मानवी संबंधांच्या नात्याने करत असत.

हा विचार नाते संबंधांच्या अनेक रूपा संबंधीही लागू केला जाऊ शकतो. एखादी व्यक्ति सर्वशक्तिमान परमेश्वराला आपल्या शत्रूच्या स्वरूपात पाहू शकते, ज्याला युध्द क्षेत्रात पराजित करणे आवश्यक आहे. भागवत कथांत कंस आणि शिशुपाल या कोटीत येतात. त्यांचा भगवान श्री

कृष्णाशी संबंध शत्रू रूपात व्यवहार करतांना आढळतो.

त्यांची कल्पना सैन्याच्या उत्कृष्ट कामगिरीच्या स्वरूपात करता येईल, जे कोणत्याही प्रकारच्या शत्रूला आरामात पराभूत करू शकतील. रामायणात सुग्रीवाने श्री रामाची पूजा या प्रकारे केली होती. तसेच एखादी व्यक्ति परमेश्वराची कल्पना आदर्श शिक्षकाच्या रूपात करू शकतो. जो, परमज्ञान प्रदान करू शकतो. या व्यतिरिक्त परमेश्वराची कल्पना इतरही मर्यादांमध्ये केली जाऊ शकते. जसे, सर्वोच्य शक्ति जिचे एखादे रूप नाही, एखादा पुरुष जो अत्यंत सुंदर, युवा तसेच सर्व शक्ति संपन्न असावा, दयाळु माता वा पिता अथवा भाऊ. या कल्पनांना अंत नाही !

सद्य स्थितीत अनंत जीव जगत आहेत. अनंत जीवांचा अंत झाला तसेच अनंत जीव जन्म ग्रहण करतील. आणि या अनंत जीवांची परमेश्वरा प्रतीची कल्पना प्रत्येकासाठी अद्वितीय असेल. परमेश्वर किंवा सर्वशक्तिमान प्रत्येक व्यक्तिच्या भावना कल्पनानुसार आपला कृपाप्रसाद लुटत असतो, ज्यामुळे जिवाचे मन संतुष्ट होते व बुद्धि ची खाज शांत होते. जेव्हा बुद्धिची खाज शांत होते तेव्हाच त्याला त्याच्याच अंतरात उपस्थित असलेली आत्म्या च्या दिव्यतेची झलक मनाच्या शांततेत पाण्याच्या प्रतिबिंब स्वरूपात दिसते. सर्व योग प्रक्रियांचा हाच एकमेव उद्देश असतो. या नंतरचा प्रवास आत्मबोधाच्या दिशेने असतो व अंती परमेश्वराशी एकरूप होणे आवश्यक असते, योग ग्रंथानुसार प्रत्येक मनुष्यासाठी ही अंतिम मुक्ती केवळ परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असते कारण या पलीकडे कोणताही योगप्रकार शिल्लक राहत नाही व त्यासाठी परमेश्वरा प्रती संपूर्ण आत्मसमर्पण हाच एकमात्र मार्ग राहतो.

जो मार्ग आपण निवडतो, ते केवळ लक्ष्य प्राप्तीचे एक साधन असते. आणि लक्ष्य ईश्वर आहे. निवडलेला मार्ग प्रत्येक व्यक्तिसाठी अद्वितीय असतो व मार्गातील अनुभव देखील !

तसे पाहिले जाता, प्रत्येक व्यक्तिचे चरित्र अद्वितीय असतेच तरीपण काही लक्षणे समाजातील इतरांशी समानता दाखवतात. व त्याच्या परिणामस्वरूप अमरतेच्या मार्गातील काही अनुभव सारखे वाटतात.

याच समान आधारानुरूप विभिन्न योग प्रणाली व दर्शन शास्त्र विकसित झाली व जी भिन्न स्वभावांच्या लोकांसाठी उपयुक्त असतात. म्हणूनच कोणतीही योग प्रणाली वा दार्शनिक विचार, हे दुसरे काही नसून जे लक्ष्य 'ईश्वर प्राप्ती' त्याचे एक साधन मात्र आहे.

मानवाच्या अस्तित्वाचे एकमात्र उद्दिष्ट व्यक्तिगत आत्म्याचे सार्वभौमिक आत्म्याशी जोडणे आहे. योग ग्रंथानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी केवळ मनुष्य शरीरात उपलब्ध असतात. याचा अर्थ असा की या प्रकारची संरचना या संसारात वा ब्रम्हांडात इतर प्राण्यांसाठी बनवलेली नाही.

माणसाच्या आजूबाजूला असलेले ब्रम्हांडाचे अस्तित्व भ्रामक प्रवृत्तींनी परिपूर्ण आहे. व ते पडद्यावर प्रदर्शित झालेल्या चित्रफितीप्रमाणे आहे. ही जागरूकता प्रत्येक व्यक्तित हळु हळु आत्मबोध प्राप्त आदरणीय गुरु-शिक्षक यांच्या अनुग्रहाद्वारे व सतत योग साधनेच्या प्रदीर्घ अभ्यासानंतर प्राप्त होते. आत्मबोधाची ही प्रक्रिया केवळ मानवी मनातच होऊ शकते. एकदा का आत्मबोध झाला की मगच अंतरातील आत्म्याच्या दिव्य प्रकृतीची ओळख होते.

थोडक्यात, व्यक्ति इतकी सक्षम होते की त्याची इच्छा असेल तर, ब्रम्हांडातील अस्तित्वात असलेल्या भौतिक शक्तिवर नियंत्रण करू शकतो. प्रत्यक्षात जर अस्तित्व हेच भ्रामक आहे तर त्याविषयी ही जरूरीच पडणार नाही. या व्यतिरिक्त, स्वबोधित व्यक्ति आपले स्वत:चे अस्तित्व सार्वभौम ईश्वरीय सत्तेहून भिन्न मानत नाही. माणसासाठी या संसारात आत्मबोधा व्यतिरिक्त इतर सर्व अनर्थकारी ठरते. मनुष्य मात्रात 'जीवना विषयी' जर अन्य विचार असतील, तर त्याचे एकमात्र कारण अज्ञान आहे. त्यामुळेच आत्मबोधाची ही प्रक्रिया विशिष्ट आहे व ते प्राप्त करणे स्वाभाविक आहे. परमेश्वराने वा सर्वशक्तिमानाने मानवी शरीरात आवश्यक जैविक तंत्र देऊन माणसाच्या अवास्तविक भ्रामक प्रवृत्तींना घालवण्यासाठी एक रस्ता सुनिश्चित केलेला आहे. आपण याला अलौकिक तंत्र म्हणू शकता किंवा ईश्वरीय इच्छा, व्यवस्था.

हे ही सत्य आहे, जो पर्यंत सांसारिक समस्या वा जीवनांत उलथापालथ होत नाहीत तोपर्यंत आपल्या अंतर दुनियेच्या दिशेने वाटचाल वा बदल सहज रूपात होत नाही. वास्तवात अनंत जन्मात केलेल्या कर्माच्या आधारावरच या संसारिक समस्या निर्माण करून जीवाला उपकृत करण्यासाठीच विविध परिस्थिती निर्माण करून त्याला आंतरिक दुनियेकडे प्रोत्साहित केले जाते व त्या दिशेने बदल व्हावा.

कोणतीही व्यक्ति जी जीवनात अध्यात्म पथावर वाटचाल करण्याचे जे स्वप्न पाहत असेल तर त्याला सामान्य जीवनात काही आघात सहन करणे आवश्यक असते. कोणीही मनुष्य दुःखाचा विचार करू शकत नाही. प्रत्येकजण आत्मज्ञानाची अवस्था जीवनात सरळ सरळ व प्रसन्न वातावरणात प्राप्त करू इच्छितो. जीवन जर इतके प्रसन्न व आनंदित असते तर कोणी त्याला सोडून या अज्ञात मार्गावर अग्रसर होईल ? प्रत्येक व्यक्तिसाठी बाह्य जीवनापासून परिवर्तन करून अंतराच्या दिशेने प्रेरित करण्यासाठी त्यांच्या सामान्य जीवनात बाहेरून असे काही होणे आवश्यक आहे जेणेकरून हे परिवर्तन शक्य होईल. हे एक कटु सत्य आहे ज्यामुळे ईश्वराच्या मीलना संबंधीची प्रक्रिया सुरू होईल व हे सत्य मान्य करणे आवश्यक आहे.

प्रत्यक्षात ते धन्य आहेत ज्यांनी हे कटुसत्य अमृततुल्य समजून त्याचा सहर्ष स्वीकार केला. संसारिक दृष्टीकोनातून, जेंव्हा व्यक्ति जीवनात असफल होतात, (आर्थिक-व्यावसायिक वा अन्य काही कारणाने) समाज त्या व्यक्तिशी विपरित व्यवहार करतो. खरेतर ती व्यक्ति आपल्या विफलतेमुळे आत्मविश्वास घालवतात. या व्यतिरिक्त इतरही समस्या असू शकतात जसे आपल्या प्रियजनांचे निधन, वित्तहानी इत्यादी. कोणत्याही अनपेक्षित घटना जी मनुष्य जीवनांत घटित होतात, त्या कटु सत्याच्या श्रेणीत मोडतात.

जर, या महत्त्वपूर्ण वळणावर लक्ष अंतर्मनावर केंद्रित करता आले तर असे म्हणता येईल की त्या व्यक्तिने परिस्थितीवर मात केली. याचा अर्थ हा नाही की तो आर्थिक वा व्यावसायिक रूपात परत एकदा या भ्रामक बाह्य दुनियेत आपल्या चुका दुरुस्त करण्यास प्रवृत्त होईल. असेच जर असेल तर केंद्रबिंदू बदलला नाही ! लक्ष परमेश्वराच्या दिशेने वळणे हे त्या

दिशेने वळणे असेल जे त्याच्या स्वतःच्या अंतरात अस्तित्वात आहे. एकदा जरी व्यक्ति आत्मबोध करून घेईल, त्याच्या आजूबाजूच्या दुनियेतील भोतिक व अलौकिक प्रसंगांचे पूर्ण नियंत्रण शक्तिकडे जाते. परिणामी सांसारिक कटु सत्याच्या गोळ्या आता त्याला विचलित करु शकत नाहीत. प्रत्यक्षात या कडू गोळ्या त्या व्यक्तिला असाधारणता प्राप्त करून देतात असे लक्षात येईल. त्यामुळेच अशी व्यक्ति विफलतेला सर्व श्रेष्ठ सफलतेत बदलण्यास समर्थ होईल तेच खरे धन्य होत.

प्रत्येक माता आपल्या तान्हुल्याला औषध पाजताना याच समस्येला तोंड देते. औषधाला गोड चव द्यावी लागते. अन्यथा बालक थैथयाट करणार याची तिला पूर्ण कल्पना असते. गोड चवीच्या आवरणाखाली मुलाला कळत नाही की त्याने काय खाल्ले. मूल प्रसन्न होते व लवकरच बरे होते. याच प्रकारे प्रत्येक व्यक्तिचा आत्मा एकाच रोगाने ग्रस्त आहे व ज्याचे नाव अज्ञान आहे. व तो त्याच रोगाने पीडित आहे. प्रत्यक्षात त्या सर्वोच्च मौलिक शक्ति वा ईश्वराला, शक्तिमानाला, जो की आदि आहे आणि कुठल्या जीवाला कोणते औषध लागू पडेल हे ही तो जाणतो.

कुंडलिनी शक्ति जागृती मनावर खोलवर प्रभाव पाडते. हे योगाच्या साधकांवर, त्यांच्या मानसिकतेवर, उच्च स्तरावर संतुलन वाढवते. त्याच बरोबर मानसिक जागृती व्यापक होते.

कुंडलिनी जागृती नंतर साधकांवर काय काय प्रसंग येतात त्याचे स्पष्ट रूप, लेखकाने समजावले आहे. जरी ही एक जटील प्रक्रिया आहे तरी लेखकाने प्रतिक्रियां संबंधी येणारे विचार, जे शरीरांतर्गत वा बाह्य जीवनात अनुभवावे लागतात त्याचे प्रस्तूतीकरण करण्यात बऱ्याच प्रमाणात सफल झाला आहे. हे केवळ त्याचे विचार नसून त्याचे प्रत्यक्ष स्वानुभव शब्दांकित झाले आहेत.

पुस्तक केवळ शास्त्र, दर्शन वा सिद्धांताविषयी वाद-विवाद नाही. ते केवळ अनुभवावर आधारित आहे. लेखक मानसिकतेच्या काही गूढ प्रश्नाचे योग्य उत्तर देण्यात यशस्वी झाला आहे.

व्यक्तिगत अनुभवांचे वर्णन करून योग परंपरेचे उल्लंघन केले अथवा नाही हा ज्याचा त्याचा विचार असेल. कमीत कमी त्याचा

मानसिकतेवर विपरीत परिणाम निश्चितच होणार नाही. त्यामुळे यावर टिप्पणी करणे उचित नाही. शुद्ध अंतःकरणाने हे पुस्तक परोपकाराच्या दृष्टिकोनातून लिहिले गेले आहे.

अनेकदा लेखकाने सिद्धांताची वैधता आणि अनुभवाची प्रामाणिकता या संबंधीच्या भयामुळे पांडुलिपी माझ्या समक्ष ठेवली आहे. या प्रसंगी मी एकच सांगू इच्छितो की सर्वोच्च मौलिक शक्ति ब्रम्हांडाच्या प्रत्येक कंपनाविषयी योग्य जाणते कारण ती स्वत: एक कंपन आहे.

पुन्हा एकवार सांगू इच्छितो, हे पुस्तक बौद्धिक मनोरंजनासाठी नसून हा त्या मौलिक शक्तिचा एक स्पंद आहे. **साधकाने केवळ साधनरूप कार्य केले आहे. ज्याच्या माध्यमातून हे विचार प्रकट झाले आहेत.**

लेखकाने कोणतीही नवीन गोष्ट सांगितलेली नाही. तथापि ज्या पद्धतीने पुरातन सत्य उजागर करण्यात यशस्वी झाला आहे तेच पुस्तकाला रोचक बनवते.

माझ्या जाणिवेनुसार, लेखकाने स्वयंप्रेरणेच्या क्षणी हे पुस्तक लिहिले आहे, आणि ज्या अर्थी हे लेखन प्रेरणेच्या क्षणी झाले आहे त्या अर्थी हे पुस्तक लेखकाने लिहिलेले नाही. व ते सर्व शब्द मौलिक शक्तिचीच अभिव्यक्ति आहे.

मी प्रार्थना करतो की हे पुस्तक मोहजालाला नष्ट करण्यास समर्थ होवो व योगमार्गातील साधकांच्या मनात जी अज्ञानराशी आहे त्याला जाळून भस्म करण्यास समर्थ होईल.

मी प्रार्थना करतो हा प्रकाश किरण सामान्य वाचकांच्या मनाच्या आकांक्षेला एका प्रकाश स्तंभाचे स्वरूप प्राप्त करून देवो.

- **श्री स्वामी सहजानंद तीर्थ**

विषय प्रवेश

मागील २५०० वर्षामधे मानवांमध्ये महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. मी सामाजिक किंवा आर्थिक परिवर्तना विषयी किंवा ऐतिहासिक घटनां बाबत सांगत नसून जी वास्तविकता मानवाने अनुभवली आहे त्या संबंधी मी बोलत आहे.

वाचकांना माहितच आहे की जे धर्म आज अस्तित्वात आहेत ते इसवीसना पूर्वी नव्हते. त्याच प्रकारे इसा पूर्वी जे धर्म होते ते आज नवीन नाम रूपाने प्रकाशित होत आहेत. त्यामुळेच विश्वाच्या काही भागात धार्मिक दृष्टिकोनात फार मोठे परिवर्तन आले आहे. या अतिरिक्त पश्चिमेकडे प्लेटो वा अरस्त यांच्या जमान्यात पृथ्वी हा विश्वाचा केंद्रबिंदू मानला होता. नंतरच्या काळात इटली मधे कोपर्निकस आणि गॅलिलिओ यांच्या काळात विचार परिवर्तन झाले. एक नवीन विचारधारा प्रचलित झाली व जनतेला समजले की पृथ्वी ब्रम्हांडाचा केंद्र नसून सर्व ग्रह गोलक सूर्या भोवती प्रदक्षिणा करत आहेत. या व्यतिरिक्त न्यूटनच्या काळात ब्रम्हांडाची कल्पना एका यांत्रिक स्वरूपात केली गेली. नंतर त्याच यांत्रिक स्वरूपाची आईनस्टाईन ची नियमावली व क्वांटम सिद्धांत यांनी ब्रम्हांडाची वास्तविकता गणिती भाषेत व्यक्त केली. त्यामुळेच असे म्हणावे लागते, ब्रम्हांडा विषयी मनुष्य जातीच्या विचारांचे जे अस्तित्व आहे ते स्थिर नाही. तसेच ते पुढे देखील स्थिर राहील याचा काही नेम नाही. त्यामुळेच मला असे सांगावेसे वाटते की सद्य स्थितीतील विज्ञान, दर्शन वा धर्माच्या बाबत सिद्धांतावर शिक्का मारू नये. त्यामुळेच या पुस्तकाने माणसाच्या धार्मिक आस्था, दार्शनिक दृष्टिकोण, वैज्ञानिक सफलता आणि सरते शेवटी शांतीच्या शोधार्था बाबत काही प्रकाश टाकला आहे.

२१ साव्या शतकातील वाचकगण, गेल्या २५०० वर्षापासून प्रचलित असलेल्या विविध धर्मांबाबत जाणतात, जे अस्तित्वात होते. सध्या प्रचलित असलेले जे धर्म आहेत. ते याच काळातले आहेत. याला केवळ हिंदू धर्मच अपवाद आहे. याचा आरंभ कधी झाला त्याची कोणतीही काळ गणनेची ऐतिहासिक नोंद नाही. तसेच हिंदू धर्माची प्रथा कधी सुरु झाली याचे तर्काने देखील उत्तर सापडू शकत नाही. या विविध प्रणाली बाबत फक्त पूर्व व पश्चिम भागात विकसित झाल्या एवढेच म्हणता येईल. एवढेच म्हणता येईल की ऐतिहासिक लिखित पुराव्या अभावी काळाची संकल्पना करणे कठीण आहे, दर्शन शास्त्रातील कोणत्या भारतीय प्रणाली कधी उत्पन्न झाल्या ?

कालगणनेची नोंद जरी नसली तरी आपल्याला मान्य करावेच लागेल की २५०० वर्षांपूर्वी मानवाचे अस्तित्व होते. तसेच पृथ्वीवर विभिन्न ठिकाणी भिन्न भिन्न मानव संस्कृतीचे अस्तित्व होते. त्या काळी काही धार्मिक अज्ञात प्रणाली पालन केल्या गेल्या होत्या व त्यांनाही काही दार्शनिक मौलिक आधार होता.

लिखित ऐतिहासिक आधाराचा कालखंड गेल्या २५०० वर्षाच्या आजुबाजुचा असल्याने तेवढ्या भागावरच मी दृष्टी केंद्रित करतो.

विभिन्न धार्मिक प्रणाली, दार्शनिक विचार वा आधुनिक वैज्ञानिक शोध यांचा प्रारंभ देखील याच काळात झाला. अरस्त, कोपर्निकस, गॅलिलिओ, न्यूटन आणि आईन्स्टाईन यांचे संशोधन याच काळात झाले आहे.

शेवटी शांती विषयी विचार प्रकट करतो जी वैधानिक आवश्यकता आहे. गेल्या २५०० वर्षात किती रक्तपात झाला त्याची कारण मिमांसा करण्याची आवश्यकता नाही. त्या घटना कितीही महत्त्वपूर्ण असल्या तरी धर्म, दर्शन व विज्ञान इत्यादी बाबत विचार करण्यात काय अर्थ जर त्यापासून स्थाई शांती व आनंद मिळत नसेल? त्यामुळेच असा तर्क केला जातो की प्रत्येक धर्म, दर्शन, विज्ञान मानवाद्वारा शांतीच्या शोधार्थ विकसित केला गेला जी मानव वा आत्मा ची वास्तविक प्रवृत्ती आहे. धर्म, दर्शन आणि विज्ञान यांमधील फरक तेवढाच सत्य आहे जेवढी मानवाची त्याच्या धर्माविषयीची धारणा.

धार्मिक परंपरा, कुलाचार, दार्शनिक आणि वैज्ञानिक विचार बदलत जातात. कायमस्वरूपी काहीच स्थिर नाही. स्थिर शांती माणसाचा मूलभूत अधिकार आहे व हे पुस्तक त्या विचारा भोवती केंद्रित आहे. प्रत्येकाला येन केन प्रकाराने ती स्थिर शांती प्राप्त करून घेणे हे एकमेव ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे व त्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक आहे, जे त्याचे अंतिम निवासस्थान आहे.

यालाच योग संबोधले जाते.

या पुस्तकात याचबाबत विचार आहे की ते ध्येय कसे प्राप्त होईल.

आता पुस्तकाच्या मुख्य विषयाकडे वळतो. संपूर्ण ब्रम्हांड शक्तिने ओतप्रोत आहे. आधुनिक विज्ञान देखील त्याचे समर्थन करते. शक्तिची परिभाषा जरी मानवाच्या संकीर्ण बुद्धि च्या कक्षेत सीमित सांसारिक शब्दांनी परिभाषित केली असली तरी जीवाला सर्वव्यापी शक्ति विषयी तर्क करणे असंभाव्य आहे. मानवाचा अहंकार कोणत्याही तथ्याचा स्वीकार सहजा सहजी करण्यास तयार नसतो. पुढच्या प्रकरणात याची व्यापक व्याख्या केली आहे.

मानवाची बुद्धि त्याच शक्तिचे एक अंग आहे. जे सर्वत्र विद्यमान आहे. विज्ञान या सत्याच्या विचारापासून लांब राहिले व त्या बाबतचा विचार करण्याचे कार्य दर्शन, शास्त्र व धर्मावर सोडून दिले. विज्ञानाच्या क्षेत्रात मनोविज्ञान ह्या विषयी सुद्धा विचार करत नाही. खरे तर हा विचार त्यांच्या एकेंद्रिय सिध्दांत 'शोध' या दृष्टिकोनापासून दूर जातो. प्रत्येक वस्तू विषय हा या संसाराचे अभिन्न अंग आहे, असे असतांना, विषय वस्तू बाबत एकांगी विचार करून निष्पक्ष सिध्दांत कसा काय प्रस्थापित करता येईल ? ही मुळांत एक चूक झाली.

विज्ञान एका वेगळ्याच रस्त्याने अंतरिक्षात व कालाच्या अज्ञात खोलीत गढून गेले. आपल्याला कृष्ण विवरा बाबतचे सिध्दांत आणि त्याच्या केंद्रबिंदूच्या शोधात मंत्रमुग्ध झाले.

ब्रम्हांडाची उत्पत्ती आणि शेवट या बाबत विज्ञानाचे निष्कर्ष तेच आहेत जे प्रचीन ग्रंथात सांगितले गेले आहेत. याला थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करतो.

मुख्य शक्ति जी त्या अज्ञात एका पासून विलग झाली, ज्याला

'ईश्वर' या नावाने संबोधले जाते वा सर्वोच्य दिव्यता म्हटले जाते ब्रम्हांडाच्या रुपात प्रकट होते. या उत्पत्ती बाबत महाविस्फोटाच्या रुपात किंवा सृष्टिचा आरंभ वा अन्य शब्दप्रयोग केला जाऊ शकतो. मी कोणी विद्वान नाही जो की सांसारिक शब्दांचा कीस पाडण्यात समर्थ असेल. मी वैज्ञानिक देखील नाही, ज्याला गणिताची परिभाषा ज्ञात आहे व बिंदूची व्याख्या करू शकेल. कृष्ण विवर आणि सापेक्षतेच्या या युगांत असताना देखील प्रत्येकाला त्याचे पूर्ण ज्ञान आहे की भौतिक आधुनिक सौध्दांतिक आधार सुसंगत नाहीत. माझ्या अल्प ज्ञानानुसर सापेक्षता व क्वांटम यांत्रिकी शक्ति सिध्दांत एकमेकांचे विरोधी आहेत. त्यामुळे या पुस्तकांत ब्रम्हांडाच्या सुंदर दार्शनिक आणि तर्कसंगत भवनाचा विध्वंस करण्याचा कोणताही विशेष प्रयास केलेला नाही. मी दार्शनिक आणि सैध्दांतिक भौतिक मतावलंबी ची क्षमा याचना करतो, आपणाला जर हे पुस्तक कोणत्याही स्वरुपांत विरोधा भासी वाटत असेल तर.

वाचकांसमोर मी केवळ हेच तथ्य व्यक्त करू इच्छितो की मानव व त्याची बुद्धि ही दोन्हीही त्याच एकमेव ब्रम्हांडातर्गत स्थित आहे. मानवाचे अस्तित्व त्या अखिल ब्रम्हांडीय उर्जे पासून भिन्न नाही.

त्यामुळेच मानवाची बुद्धि जी स्थूल रुपांत अभिव्यक्त, अनादी अनंत शक्तिचेच एक रुप आहे. या शक्तिच्या उत्तम रूपाला कसे समजावता येईल ! या पुस्तकात पुढच्या भागात विस्ताराने हे स्पष्ट केले आहे की ही शक्ति आपल्या आदीकलीन रुपात सर्वोच्य दिव्याते सकट जाग्रत व शक्तिशाली आहे. हीच शक्ति सर्वशक्तिमान वा व्यक्तिचे स्वत्व आहे.

प्रत्यक्षात, मानवाची बुद्धि ही त्या दिव्य शक्तिचेच दुसरे स्थूल रुप आहे, जे अहंकाराच्या रंगाने रंगले आहे. वेगळ्या अस्तित्वाचा भाव इतर मानव व सर्वशक्तिमान हा भेदभाव अहंकारामुळेच उत्पन्न होतो. मानवी शरीरातील आत्मा सर्वोच्च लौकिक शक्तिच्या मायेत फसला जातो, जी या ब्रम्हांडाला उत्पन्न करते. या विचाराचे देखील विवेचन केले आहे. मानवीय बुद्धि आणि ही मायमय दुनिया यांना दोन वेगळ्या वस्तूच्या रुपांत श्रेणीबध्द करता येईल व त्यामुळेच एका निश्चित सीमेपर्यंत ब्रम्हांडाबाबत समजावणे शक्य होईल. त्यामुळेच सर्व योग ग्रंथामध्ये या दिव्य शक्तिच्या स्थूल रूपाला वरचे स्थान दिले आहे. त्यालाच 'महत' या नावाने संबोधले

गेले. खरेतर हे उच्चशक्तिचे रचानात्मक रुप आहे पण ते ईश्वर वा परमेश्वर नाही !

पुढे शक्ति स्थूल रुप धारण करते, परिणामी मेंदू व पाच इंद्रियाच्या रुपात प्रकट होते. जिथे स्वतंत्र इच्छेचा उगम होतो. मेंदू पासून शक्ति विविध जीवनांगात परिणित होते. शेवटी जीवन शक्ति मांस, रक्त, हाडे इत्यादी पासून मानवी शरीराच्या रुपांत प्रगट होते. या विषयी देखील थोडाफार प्रकाश टाकला आहे.

व्यक्तिगत शरीर संरचना पूर्ण झाल्यावर मानवी शरीराचे संतुलन गुदा आणि जननांगाच्या मधे केंद्रित होते. त्यानंतर शक्ति मेंदू व मेरूदंडाच्या साह्याने व्यक्तिच्या मन:पटलावर एक भ्रामक पडदा टाकते व तो कायम राखण्याचा प्रयत्न करते. याच प्रकारे सृजन मानवीय समाजावर केले जाते. यावर देखील मी प्रकाश टाकला आहे.

व्यक्तिगत शक्ति ही वास्तविक ब्रम्हांडीय शक्तिचेच लहान रुप आहे. म्हणूनच विश्वाला ब्रम्हांडाच्या रुपात व मानवाला पिंडांड रुपात संबोधले जाते.

याला असेही म्हणता येईल की, व्यक्तिला जर या शक्तिची वास्तविक प्रवृत्ती समजावी असे वाटत असेल तर 'स्व बोधाची' आवश्यकता आहे. स्व आणि शक्ति एकच आहे.

ब्रम्हांडाची उत्पत्ति समजून घेण्यासाठी बाहेर, अंतरिक्षात खोलवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता नाही. ब्रम्हांडातील अस्तित्वात असलेल्या सर्व शक्ति मानावत स्वत:च्या आत अस्तित्वात आहेत. मात्र आत्माबोधची ही प्रक्रिया घटीत होण्यासाठी बुद्धि चा विवेक, दृष्य पदार्थ आणि **प्रयोगशीलतेची** आवशक्यता आहे.

या व्यतिरिक्त, मानवी बुद्धि च्या पार असलेल्या त्या अलौकिक शक्तिला समजण्यासाठी, बुध्दीला संभव नसल्यामुळे, योगाभ्यासाव्दारे त्या मौलिक शक्तिला आपल्या समोर प्रगट करण्याची आवश्यकता आहे. मानवी बुद्धि इतर काही नसून शक्तिचेच एक रुप आहे. वास्तविक शक्तिची ही पुढची पायरी, जे स्थूल रुप आहे. जेव्हा ती मानवाच्या अवस्थेत प्रकट होते. व त्याचबरोबर भ्रामक संसाराला निर्माण करते. त्यामुळेच बुद्धि आपल्या स्वप्रयत्नाने मौलिक शक्तिचे वास्तविक स्वरूप समजू शकत नाही. ज्यावेळी

मन निस्तरंग अवस्थेत जाते त्यावेळेस बुद्धि देखील तर्कशून्य व सर्व विरोधी शस्त्र टाकून संपूर्ण समर्पण करते. दिव्यता अथवा परमशक्ति आपले स्वतःचे मौलिक स्वरूप, आपली वास्तविकता स्वतः प्रकट करते जे आतापर्यंत अज्ञात होते. आणि जे व्यक्तिच्या अंतरात अस्तित्वात आहे. ते कंदिलाच्या रुपात आहे, वरची काजळी साफ होताच आपले अस्तित्व प्रकट करते.

आत्मबोध, स्वबोध प्राप्त करण्याच्या प्रक्रियेला योग म्हटले जाते. या प्रकारची दिव्य प्रक्रिया सुरू करण्यासाठी, एखाद्या आदरणीय शिक्षक वा गुरुची, जो स्वतः स्वयंप्रकाशित असेल, त्याची आवश्यकाता असते. जो दुसऱ्या व्यक्तिच्या अंतरात असलेल्या मौलिक शक्तिमध्ये हस्तक्षेप करून त्याला मदत करण्यास समर्थ असेल. अशाप्रकारे तो व्यक्तिला पूर्व काळात घेऊन जातो व व्यक्तिचा मनोनाश करून अथवा मूल अवस्थेप्रत पोहोचण्याच्या प्रक्रियेला कारणीभूत होतो. परिणामस्वरूप आत्मबोधाची प्राप्ती होते. अलौकिक शक्ति, विनाशकारी रुपांत असतांना, मानवाच्या सर्व भावनासकट अहंकार मिटवते. ती आपले स्वत:चे वास्तविक स्वरूप देखील प्रकट करते. एका प्रकरणात यावर देखील संक्षेपात प्रकाश टाकला आहे कारण पुस्तकाच्या चौकटीत यापेक्षा अतीव गूढ सूक्ष्मता समजावणे असंभव आहे.

परम ज्ञानाची पहिली झलक जेव्हा प्रकट होते त्यावेळी धर्म, दर्शन आणि विज्ञान यातील फरक हळू हळू स्पष्ट होऊ लागतो. भौतिकातले नियम लागू होत नाहीत (आता उपयोगात येत नाहीत). ज्याप्रमाणे कृष्ण विवरातील विलक्षणता एका बिंदूमध्ये संकुचित होते. याचा अर्थ हा की संपूर्ण भौतिक जगाला नियंत्रणात ठेवणारे सर्व नियम आत्म्याला बंदिस्त राखण्यासाठीच्या आपल्या शक्तिचा ऱ्हास होऊ लागतो. हे केवळ मानवाला शक्य आहे कारण ही वैचारिक पात्रता केवळ मानवात आहे. माझ्या सीमित आधुनिक सामान्य विज्ञानानुसार हीच घटना सामान्यत: कृष्ण विवरांत घटित होते. जेव्हा एखादा तारा किंवा एखादी आकाश गंगा कृष्ण विवरात लाक्षणिक बिंदूंवर पडते त्या वेळी ब्रम्हांडाला नियंत्रित करणारे विज्ञानाचे वेगवेगळे नियम आता लागू होत नाहीत. विज्ञानाचे नियम भंग होण्याची एरवीची प्रेरणेची कारणे याची तुलना येथे केली आहे. त्याचप्रमाणे परमज्ञानाची स्फूर्ती येण्यासाठी योगाचे नियम मोडणे/भंग होणे आवश्यक

आहे. ही एक अति उच्च आध्यात्मिक अवस्था आहे ज्या मध्ये अलौकिक शक्ति स्वत:ला त्या योग्यासाठी प्रकट होणे थांबते. माझ्यावर विश्वास ठेवा ज्या आस्थेने मी माझे हृदय या पुस्तक रूपात प्रकट करत आहे, जिथे मानवी सैद्धांतिक रुप त्या बिंदूला समजू शकत नाहीत, जिथे योगाचे नियम भंग होतातच, पण त्या नियमांचे भंग होण्यानेच स्वबोध होतो. आणि हा आत्मबोध केवळ परम दिव्यतेच्या इच्छेने होते. प्राचीन ग्रंथानुसार अशाही काही घटना घडल्या आहेत की एखादा योगी या अलौकिक शक्तिचा दुरुपयोग केल्याने त्या उच्च आध्यात्मिक अवस्थेपासून घसरला आहे.

मन जेंव्हा निरपेक्ष शांत अवस्थेत पोहोचते तेव्हा व्यक्ति मनाला अंतरातील अनंत असीमते मधे बुडत्याचा अनुभव करते. ज्या प्रमाणे कृष्ण विवरांत एखादा तारा वा आकाशगंगा विलक्षणतेच्या त्या बिंदू मधे पडते, याचा उल्लेख वर केलेला आहे.

दोन्ही घटनांमध्ये प्रेरक शक्ति एकच असते. भौतिक जगाला नियंत्रित करणारे नियम लागू पडत नाहीत. त्याचप्रमाणे योग्याला विज्ञानाचे नियम लागू पडत नाहीत.

ज्या कालांत, ब्रम्हांडीय शक्तिची प्रक्रिया व्यक्तिच्या मेंदूमध्ये बदल घडवत असते त्या कालावधीत त्या व्यक्तिला अनेक प्रतिक्रिया अनुभवाव्या लागतात. या प्रतिक्रिया मानसिक, शारीरिक तसेच बाह्य दैनंदिन जीवनाशी संबंधित असतात. त्यामुळे या पुस्तकांत जी चर्चा केलेली आहे ती केवळ सिद्धांत नसून वास्तविकता आहे.

या पुस्तकात, सिद्धांता बरोबर प्रत्यक्ष व्यक्तिगत अनुभवांची देखील चर्चा केलेली आहे.

इंग्रजी पुस्तकाचे शीर्षक याच वास्तविक अर्थाप्रती निवडले आहे. अनेक संस्कृत ग्रंथांमध्ये उद्घृत केले आहे की दिव्य प्राणी वा देवता यांना देखील अंतिमतः उद्धारासाठी मानवरुपांत जन्म घ्यावा लागतो. त्यामुळेच मूळ इंग्रजी पुस्तकाचे शीर्षक “द पावर अननोन टू गॉड" निवडले आहे.

या पुस्तकात उद्धृत केलेले साहित्य दुर्लभ आहे. असे म्हणण्याचे कारण असे की, योग परंपरेनुसार कुंडलिनी वा ब्रम्हांडीय शक्तिची जागृती

कालात आलेले व्यक्तिगत अनुभव सामान्य जनांसमोर प्रकट करू नये कारण आध्यात्मिक दृष्टीने साधकासाठी ते हानिकारक असते. या परंपरेचे उल्लंघन केवळ विशुद्ध अंत:करणाने परोपकाराच्या दृष्टिकोनातून केलेले आहे, जेणे करून साधक योगी घाबरून जाऊ नये जरी अस्पष्ट तर्कहीन प्रतिक्रिया त्याच्या शरीर मन आणि दैनंदिन जीवनांत विकसित झाल्या तरी. या मागील माझा प्रयत्न साधकाला सावध करण्यासाठी आहे की अशा अस्पष्ट तर्कहिन प्रतिक्रिया वास्तवात होतात व शास्त्र आणि शैक्षणिक वादविवाद हा न संपणारा विषय होतो.

हे पुस्तक प्रामुख्याने सिद्ध माहायोग साधकांच्या लाभार्थ लिहिले आहे. या योग प्रणालीचे अनुकरण गुप्त शक्तिपात पद्धतिचे अनुयायी करतात. तरीही इतर योग प्रणालीतील साधकांसाठी देखील सहाय्यक होईल कारण कुंडलिनी शक्ति जागृती सर्व प्रणालीत एकच आहे. त्यामुळे हे पुस्तक कोणत्याही योग प्रणालीतील साधकांना वाचता येईल. एक प्रकारे सामान्य व्यवहारिक गाईड च्या रुपात कामाला येऊ शकते. सामान्यत: योगा सबंधी अनेक प्रश्नांची उत्तरे यातून प्राप्त होतील.

हे पुस्तक कोणत्याही सामान्य वाचकासाठी सुद्धा उपयोगी आहे कारण ज्या विषयाशी निगडित आहे ते मानवी जीवनाचे सार आहे. योग्य प्रेरणा एखाद्या नाटकातील परिवर्तना प्रमाणे जीवनाची दिशा सकारात्मक रुपांत बदलू शकते. असेही होऊ शकेल की सामान्य वाचक याला पूर्णपणे आत्मसात करू शकणार नाही तरीही, थोडीफार रुची निर्माण झाली, तर वाचकाला योग्य दिशेने प्रेरित करण्यास समर्थ होईल. माझ्या व्यक्तिगत अनुभवाचे वर्णन करण्या अगोदर सामान्य वाचकसाठी या विषयावर संक्षिप्त प्रकरणे जोडली आहेत ज्याचा त्यांना लाभ होऊ शकेल.

एखादा वाचक जरी योग्य दिशेने प्रेरित झाला तरी मी समजेन की पुस्तक लेखनाचा माझा उपक्रम सफल झाला.

माझे, परम पूजनीय गुरु श्री. स्वामी सहजानंद तीर्थ, यांना विनम्र प्रणाम करून, मी ही प्रार्थना करतो की वाचकाला दिव्यतेच्या शोधार्थ योग्य दिशा व प्रेरणा लाभो.

- **लेखक**

संक्षिप्त योग प्रणाली

ब्रम्हांड किंवा या प्रत्यक्ष जगांत आणि त्याही पलीकडे जे परम सत्य विद्यमान आहे तीच सर्वोच्य दिव्यता आहे.

प्रत्येक धर्म त्या परमोच्य सत्याविषयी अनादी कालापासून सांगत आला आहे. जरी विविध धर्मियांची त्या परम सत्याची व्याख्या वेगळी असली तरी मुळांत ती दिव्यता एकच आहे. ज्या प्रमाणे एखादी व्यक्ति अन्य सांस्कृतीतील व्यक्ति जैविक रुपांत भिन्न नसतात त्याच प्रमाणे एक दर्शन, विचार वा सिद्धांत जो स्वतःच आंतरिक दिव्यतेशी संबंधित आहे, तो इतर जीवाद्वारे वास्तवात अनुभवले आहे त्यापेक्षा भिन्न असू शकत नाही. मौलिक स्तरावर, सर्व अनुभवात एकच अंतर्निहित एकता आढळते जरी प्रत्येक मानवाची सत्या बद्दलची धारणा इतरांच्या वास्तविकता वा परमात्मा विषयी त्यांची धारणा भिन्न असेल.

धर्मातील संघर्षाची उत्पत्ती भाषेच्या विविधतेमुळे असण्याची शक्यता आहे.

आधुनिक विज्ञानाच्या सफलते मुळे ब्रम्हांडाला समाजण्यासाठी, एक वाक्यता आणण्यासाठी थोडेफार श्रेय दिले जाऊ शकते. तथापी ही वैज्ञानिक एकताच, एकमेव, या धरतीला शांती आणि सद्भाव निश्चित करण्यासाठी पुरेशी नाही. मानव, जाती- धर्मा च्या नावाखाली भांडणे किती निरर्थक आहे हे समजू शकत नाही व हा संघर्ष अनादी काळापासून चालू आहेत.

विश्वातील धर्म, दर्शन, सिद्धांत रुढी आणि विज्ञान यांच्यातील एक वाक्याता आणि स्थाई शांती वा प्रसन्नतेसाठी आवश्यक बाब ठरू शकत नाही.

मग याचे उत्तर काय ?

या पृथ्वीवर परम शक्तिची अभिव्यक्ति या ग्रहगोलावर परम शांती आणि सद्भाव निर्माण करणार का?

या पृथ्वीवर दिव्य शक्ति ने विभिन्न अवतार धारण केले नाहीत का ? उदा. राम, कृष्ण, बुध्द, इसा मसीह, अल्लाह.

या अवतारांमुळे काय परिणाम झाला ? पूर्वीच्या तुलनेत मानव या अवतारांची प्रत्यक्ष उपस्थिती असताना देखील सुखी, प्रसन्न झाला ? याचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल. प्रत्यक्षात मानव पहील्यापेक्षा जास्त दुःखी झाला. परमदिव्यतेच्या नावाखाली विविध धर्मांच्या नावाआड मानवाने एकमेकांत फूट पाडली. एक गोष्ट लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे की मानवाच्या शरीरातील आत्मा व अखिल ब्रम्हांड व्याप्त आत्मा एकच आहे. दिव्यातेला पृथक करता येत नाही. आज विश्वात जेवढ्या भिन्न धार्मिक प्रणाली अस्तित्वात आहेत, एकाच उच्च दिव्य ध्येयासाठी पोहोचणाऱ्या विविध वाटा आहेत. आणि तेच परम दिव्यता आहे. या परिस्थितीत एकच तर्क करता येईल की कोणतीही एक प्रणाली वा तिचा वाटसरू असा दावा करू शकत नाही की त्यांचाच एकमेव व योग्य मार्ग आहे.

पुढील समानतेच्या आधाराने याचे समाधान करता येईल.

पर्वत शिखरावर पोहोचणे हे एकमेव ध्येय पर्वतारोहीच्या समोर असते. त्या ठिकाणावर पोहोचण्यासाठी त्याने वापरलेली साधन सामुग्री व मार्ग कोणता हे महत्त्वाचे नसून गंतव्य स्थानी पोहोचणे हे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे प्रत्येकाला आपला एकमेव मार्ग आहे असा दावा करता येईल ? हाच तर्क इतर मार्ग अवलंबणारे का देखील करू शकतात. प्रत्येक जण शिखरावर उभा आहे आणि आपल्या मार्गाला योग्य आहे असा डाव करू शकतो. ही वास्तविकता तीच व्यक्ति करू शकते. जी त्या परमसत्याच्या त्या दिव्याते पर्यंत पोहोचली आहे, कोणीही एवढा सक्षम नाही की त्या बिंदूवर दुसऱ्याला प्रश्न विचारील ?

या संसारात कोणीही व्यक्ति खऱ्या अर्थाने केवळ एवढ्यानेच खात्रीपूर्वक बोलू शकत नाही की तो एका विशिष्ट धर्मांच्या मर्यादेत येतो कारण की तो त्याचे पालन करतो. अशा प्रकारचे वर्तन केवळ धर्मांतर करण्याने आवश्यक असणारे बाह्य आवडंबर पांघरतो. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ति खऱ्या अर्थाने असा दावा करू शकत नाही की तो अमुक एका धर्माचा अनुयायी आहे कारण तो तशाच प्रकारचे अनुशासन करणाऱ्या माता पित्याच्या घरी जन्माला आला आहे. विभिन्न धर्मावलंबी माता पिता कसा निर्णय घेऊ शकतील की त्यांच्या मुलांनी कोणता धर्म स्वीकारावा ? मुलांनी कोणत्या धर्माचे पालन करावे याचे स्वातंत्र्य त्या मुलांचा मूलभूत अधिकार नाही का ? त्या मुळेच एखाद्या धर्माचे पालन करणे वा जन्म घेणे असा शिक्का त्या व्यक्तिवर लावता येणार नाही.

माझ्या सांगण्याचा एवढाच प्रयत्न आहे की परधार्मियांशी विवाह, धर्मांतरण करावे वा न करावे असे नसून, एखादी व्यक्ति एखाद्या विशिष्ट धर्माच्या संबंधात आत्यावर त्यांच्या नियमावली नुसार त्याने आत्मबोध प्राप्त केला आहे. अंतिम प्राप्तव्यावर लक्ष केंद्रित करण्यावर असून साधन प्रणाली वरून झगडा करणे हे नाही.

वाचकांस सांगू इच्छितो, आत्माबोधाच्या ध्येयाच्यासिद्धतेआधीच धर्माच्या नावाने झगडणे निरर्थकताच प्रदर्शित करते. असे वाटते की विविध धर्मांच्या नावाखाली देवतांचे विभाजन त्या दिव्य शक्तिनेच जाणून बुजून केले असावे. असे ही असेल, की परमेश्वराने विभिन्न काळांत विभिन्न क्षेत्रातील मानवासाठी त्यांच्या आवश्यकतेनुसार प्रकट झाले कारण विभिन्न सामजिक परिस्थिती त्यानेच निर्माण केल्या. एवढे मात्र खरे की प्रत्येक धर्मातील मंडळी आपली श्रेष्ठता सिद्ध करण्याचा सतत प्रयत्न करत असतात. त्यामुळेच धर्मांच्या नावाखाली एवढे संघर्ष पाहण्यात येतात.

कदाचित, एखादी मानव जात असे म्हणेल की आम्ही अगोदरच सुखी-समृद्ध आहोत त्यामुळे दिव्यतेशी संबंधित नवीन विचारांची आम्हाला आवश्यकता नाही. अशी मंडळी खरोखरच धन्य आहेत जर त्यांच्या कथनात थोडा जरी सत्त्याचा अंश असेल !

आजच्या युगांत परमेश्वर व परम दिव्यतेचा विश्वात सर्वत्र व्यापार केला जात आहे. लोकांवर खरोखरच त्या दिव्यत्वाचा प्रत्यक्ष अनुभव प्राप्त झाला आहे अथवा नाही याने काही फरक पडत नाही कारण

सृष्टी स्वतःच एक भ्रामक प्रवृत्ती आहे. त्यामुळे दिव्यता सुद्धा त्यांना त्यांच्या वृत्तीनुसार जाणवते.

योगाच्या महान परंपरांचे सर्वाधिक पतन झाले आहे.

यावर उपाय काय ?

उपाय मानवाच्या अंतरातच उपलब्ध आहे.

तो स्वत:च त्या दिव्यतेची अभिव्यक्ति आहे.

याला आपण आत्मबोध, दिव्यतेचा प्रत्यक्ष अनुभव वा मोक्ष किंवा परमेश्वरी कृपा म्हणू शकता. ते प्रत्येकाचे आपापले मत असेल.

जरी एखादी आध्यात्मिक व्यक्ति इतरांवर आपला प्रभाव पाडण्यास समर्थ असली तरीसुद्धा आत्मबोध हा संपूर्णतः निजी मामला आहे.

जसे एका दिव्याने लाखो दिवे स्वत:चे तेज कमी न होता पेटवता येतात त्याचप्रमाणे एका प्रबुद्ध व्यक्तिकडून लाखो लोकांच्या मनात आत्मजोत प्रज्वलित करण्याची क्षमता असू शकते. परंतु व्यक्तिगत अंतिम मोक्ष प्राप्त करण्यासाठी ती दिव्यता त्याच्या स्वत:च्या अंतरात प्रकट होणे आवश्यक आहे.

स्वतःच्या अंतरातल्या दिव्यतेच्या अनुभूतीच्या प्रक्रियेला योग असे म्हटले जाते. एकदा का दिव्यता मानवाच्या अंतरात प्रगट झाली, की परमेश्वराच्या दिव्यतेमध्ये मिलन होणे स्वाभाविक होते. परंतु हे मिलन ही अंतिम अवस्था आहे.

या व्यतिरिक्त सर्व योग ग्रंथ या तथ्याशी केंद्रित आहेत की प्रत्येक जीव हा त्या मूळ रूपांतील परमेश्वराच्या दिव्यतेचा एक अंश आहे.

स्थाई व प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी एकमात्र उपाय आत्मबोध हा आहे, कारण त्यामुळेच हे स्पष्ट होते की दिव्यता हा त्यांचा स्थाई स्वभाव आहे. एकमात्र स्वजागृत मानवच मानवजातीसाठी काही काम करू शकतो, कारण एक वा अनेक माणसांना जागृत करून त्यांना स्थाई शांती व आनंद प्रदान करण्यास समर्थ असतो. अशा व्यक्तिला संत, ऋषी, गुरु, शिक्षक वा आपल्या इच्छेनुसार नामकरण केले जाऊ शकते. नावाचे महात्म्य नसून स्वजागृत असणे ही आवश्यक बाब आहे.

कोणत्याही मानवासाठी आत्मबोधाच्या दिशेने वाटचाल

करण्यासाठी एक दिशा आहे, एखाद्या योग्य शिक्षका द्वारे, जो स्वतः स्वजागृत आहे व आपल्या अंतरातील दिवा पेटवू शकेल. जी व्यक्ति स्वतः अंधकारात आहे, ती व्यक्ति, दूसरा जो अंधारात आहे त्याला मार्गदर्शन करू शकत नाही.

कारण प्रत्येक मानवाच्या अंतरात ती दिव्यता अस्तित्वात आहेच, बाह्य साहाय्याची आवश्यकता नाही. केवळ प्रारंभिक प्रज्वलनाचीच आवश्यकता असते व एका विवक्षित बिंदूपर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याची ! पांगुळ गाड्याच्या माध्यमाशिवाय बालक चालणे शिकत नाही.

पुढील अध्यायांत या पांगुळगाडा व बालकाच्या धारणांसंबंधी विस्तृत चर्चा करेन.

ब्रम्हांड (ज्यात मानवजात संमिलीत आहे) परमेश्वराच्या मौलिक शक्तिचे स्थूल प्रतीक आहे. असेही म्हणता येईल की दिव्यता ब्रम्हांडाच्या रुपात प्रकट होते वा या प्रत्यक्ष जगात प्रगट होते किंवा त्यापेक्षा वेगळे व एकत्र आणि सर्वव्यापी सुद्धा आहे.

जिथपर्यंत मानवाचा प्रश्न आहे, एकच मौलिक तेज स्वतःच्या अंतरात अस्तित्वात आहे आणि तेच मानवी शरीराच्या रूपात प्रकट होते. परिणामस्वरूप दोन स्पष्ट समांतर रचना अस्तित्वात आहेत. एक मानवाच्या सामूहिक स्तरावर व दुसरे व्यक्तिगत स्वरूपावर. यावर मी नंतर विचार प्रगट करीन.

केवळ परमात्मा किंवा सर्वोच्च ब्रम्हांडीय शक्तिचेच अस्तित्व आहे, आणि त्या व्यतिरिक्त काहीही नाही. त्यामुळे या पुस्तकाचा केंद्रबिंदू परम दिव्यतेप्रती स्व समर्पणाची आवश्यकता वा स्वतःच्या अंतरात त्याचे प्रकटीकरण यावर आहे. या दोन्ही बाबी एकच आहेत.

परम दिव्यता ही शक्ति आहे त्याच प्रकारे ती शक्ति परमात्मा आहे.

परम शक्ति ब्रम्हांड आणि नंतर मानवाच्या सामुहिक अंतरात्माच्या स्वरूपात प्रकट होते. मात्र ही शक्ति (मानव जातीच्या निर्मिती नंतर किंवा दिव्यता मानवाच्या रुपांत प्रकट झाल्या नंतर) निष्क्रिय होते आणि या विशाल ब्रम्हांडाच्या आंत खोलवर स्थित आहे. सैद्धांतिक रुपात या ब्रम्हांडात शक्तिचे निश्चित स्थान निर्धारित करणे शक्य

नाही. शक्तिलाच ते प्रकट करण्याची आवश्यकता आहे. व ते एक असे रूप आहे जे मानवाच्या बुद्धि च्या आकलन शक्तिच्या पलिकडे आहे. तरी एखादा योगी जो या अभ्यासात उच्च स्तरावर आहे तोच या शक्तिला समजण्यास समर्थ आहे. निष्क्रिय शक्ति मानवाचा सामुहिक अंतरात्मा भ्रामक संसाराला प्रक्षेपित करतो व तो सतत चालू ठेवण्याचा प्रयत्न करते.

याचा अर्थ असा झाला की ईश्वराची दिव्यशक्ति मानवाच्या शरीराच्या रुपांत प्रकट होते, नंतर निष्क्रिय होते आणि मेंदू व मेरुदंडाच्या आधारावर स्थित होते ज्याचे स्थान गुदा व जननांग यांच्या मध्ये आहे. आणि ती व्यक्तिच्या मन:पटलावर भ्रामक संसार प्रक्षेपित करते आणि तो तसाच राखते.

शक्ति (जी मानवाच्या शरीराच्या रुपांत प्रकट झाली) जेंव्हा एखाद्या आदरणीय शिक्षकाद्वारे छेडली जाते, उलट दिशेने कार्यरत होते ज्यामुळे मनमानसाचा नाश होतो व ती भूतपूर्व स्वरुपांत परिवर्तित होते. व्यक्तिगत स्तरावर सृजन पूर्ववत होते, परिणामी व्यक्ति स्वजागृत होतो आणि दिव्यते मध्ये विलीन होतो.

इथे वाचक असं विचार करू शकतो की सैद्धांतिक रुपांत असे शक्य होऊ शकेल का, की संपूर्ण मानव समाज आत्मबोधाची ही अवस्था प्राप्त करेल ? प्राचीन ग्रंथानुसार, कालौघातात भगवंताने केलेली निर्मिती (सामुहिक स्तरावर) प्रत्येक युगांतरी नष्ट केली जाते. या ठिकाणी वाचकांना सृष्टी चक्राची प्रकृतीच्या कृतीची आठवण करून देऊ इच्छितो. प्राचीन ग्रंथानुसार सृजन (मानव जातीचे सामुहिक स्तरावर) वेळो वेळी सर्व शक्तिमानाद्वारे केले जाते.

याविषयी मी पुढे सांगणार आहे, ते माझे स्वतःचे मत आहे. मी इतका जाणकार नाही की अशा गंभीर प्रश्नांवर मत प्रदर्शित करू शकेन.

एखाद्या व्यक्ति बाबत जर सृजन (न केलेले) केले जाते याचा अर्थ आत्मबोध फार नियंत्रित पद्धतीनेच केल्याने होतो. हे केवळ गुरुकृपा व त्याबरोबर योगाचा अभ्यास जो त्या अंतिम अवस्थेप्रत पोहोचवते. सृजन व्यक्तिगत स्तरावर कसे पूर्ववत होते याचे विवरण एका प्रकरणात केले आहे.

एरवी, भगवान सृजन एका विस्तृत लौकिक स्तरावर पूर्ववत करते, परंतु मानवाद्वारे सामूहिक आत्मबोधाची घटना घडू शकत नाही.

कारण सरळ आहे.

<u>एक:</u> एकीकडे विज्ञानाचे नियम भंग होण्याचा व त्याचवेळी वैश्विक भ्रमाचे वेळी योगाच्या नियमांचे भंग होणे ह्या दोनही घडामोडी एकाच वेळेस घडत असल्याने मानवाला हे दोन्ही अनुभव एकाच वेळेस घेण्यास सवड मिळत नाही. (विज्ञान आणि योगाचे नियमांचा भंग होणे याचा काय अर्थ आहे त्याबाबत पुढील अध्यायात समजावले आहे)

<u>दोन</u>: आत्मबोध दिव्य शक्तिच्या इच्छेनुरूपच होऊ शकते. आणि सर्वव्यापक स्वरुपांत जाणतात की परम दिव्यता रहस्यमय प्रवृत्तीची आहे.

मी याविषयी अधिक स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

जिथपर्यंत व्यक्तिगत संबंध आहे, हा बोध/ज्ञान वा स्व अनुभूति त्या दिव्यते अतिरिक्त दुसरे काही नाही. हा त्याचाच (बोध) परिणाम असतो, तेच परम शक्तिचे प्रकृतीचे प्रत्यक्ष ज्ञान, कारण परम शक्ति प्रत्येक व्यक्तिचा स्व आहे.

त्यामुळे मानवाला सर्वोच्च शक्तिचा स्त्रोत या ब्रम्हांडात कुठेही शोधण्याची आवश्यकता नाही. ती स्वतः अंतरात स्थित आहे. हाच स्व आहे.

शक्ति जागृती नंतर तिचा प्रवास मेरुदंडाच्या आधाराने सहस्त्राराच्या दिशेने सुरु होते. ज्या वेळी शक्ति सहस्त्रराच्या दिशेने वर चढण्यास सुरू होते त्या वेळी हे शक्तिचे आरोहण व्यक्तिला प्रत्यक्ष अंतरात जाणवते.

आधुनिक विज्ञानाकडे या प्रक्रियेचे कोणतेही तर्कसंगत उत्तर नाही. व्यक्तिला या गोष्टीवर विश्वास ठेवण्यासाठी आपल्या शरीरांतर्गत शक्तिच्या प्रवाहाचा अनुभव घेणे आवश्यक आहे.

या व्यतिरिक्त, केवळ शक्तिसंचार शरीरात जाणवतो. एवढेच नसून शरीरातील सर्व नाडी जालात एक अद्‌भुत पेटारा उघडते. त्यानंतर व्यक्तिच्या ऐंच्छिक प्रयत्नाशिवाय मानवी मनाची सर्व ऐंद्रिय संवेदनांची स्वच्छता सुरु करते. एकप्रकारे मन आणि ब्रम्हांडीय शक्ति यांच्या दरम्यान आदान-प्रदान (जोडणी) सुरू होते.

शक्ति जेव्हा सहस्त्राराच्या क्षेत्रात कार्यरत होते मानसिकता एका उच्च पातळीवर स्थापित होते. पहिला परम ज्ञानाचा प्रकाश किरण जेव्हा व्यक्तिवर प्रकाशित होतो, जो परमसुखाचा स्वानुभव येतो, त्याचे सांसारिक भाषेत वर्णन करणे वा समजावणे अशक्य होते.

कोणतेही वैज्ञानिक ज्ञान, आधुनिक वा प्राचीन, ह्या मनाला अचंभित करणाऱ्या घटनांचे कोणतेही तर्कसंगत स्पष्टीकरण देऊ शकत नाही.हे घडते जेव्हा व्यक्तिची कुंडलिनी जागृत होते.

यालाच योग म्हटले जाते. परम शक्तिशी लय होण्याचे लौकिक तंत्र.

हे पुस्तक कुंडलिनी जागृति संबंधी माझ्या स्वतःच्या अनुभवाविषयी आहे. मी नि:संकोचपणे माझ्या अनुभवांचे वर्णन केले आहे. जरी, अशाप्रकारे अनुभवांचे वर्णन करणे हे योग संप्रदायाच्या नियमांचे उल्लंघन करणे आहे, हा प्रयास विशुद्ध अंतःकरणाने केवळ परोपकाराच्या उद्देशाने केला आहे.

इथे, सर्वसामान्य वाचकांसाठी सूचित करू इच्छितो की योगाचा संबंध आसन व प्राणायामाशी जोडून मर्यादित विचार केला जातो. परंतु ही सर्व तंत्र शक्ति जागृत करण्याचे साधन मात्र आहे. तंत्र स्वतः योग नाही. जरी, सर्व मुद्रा, प्राणायाम, आसन या विविध स्वतंत्र प्रणाली असल्या तरी त्यामागचा उद्देश तेव्हाच परिपूर्ण होतो जेव्हा कुंडलिनी वा ब्रम्हांडीय शक्ति जागृत होते.

याच प्रकारे ध्यान लावणे हे देखील एक तंत्र आहे ज्याचा उपयोग निष्क्रिय ब्रम्हांडीय शक्तिला सक्रिय करण्यासाठी केला जातो. एकदा का शक्ति सक्रीय झाली की त्याचा हेतू साध्य होतो.

इतरही तंत्र प्रयोग केले जाऊ शकतात, जसे भक्ती-संसारातील सर्व कर्तव्य कर्म अलिप्त राहून करणे.

प्रत्येक योग प्रणाली ब्रम्हांडीय शक्तिला सक्रिय करण्याच्या उद्देशाने केले जाते. हा नियम सर्व तंत्र प्रणालींना लागू आहे. तंत्र हे केवळ साधन आहे. व्यक्तिगत योग ब्रम्हांडीय शक्ति जागृती नंतर सुरू होतो. ही यात्रा एक परतीचा प्रवास आहे व तो तेव्हाच सुरु होतो जेव्हा व्यक्ति परतीच्या प्रवासासाठी सिद्ध होतो आणि चालण्यास सुरुवात करतो. योग याचा अर्थ मानवीय आत्म्याचा सार्वभौम आत्मा वा भगवान त्याच्याशी मिलन, वा संयोग.

ही प्रक्रिया तोपर्यंत सुरू होत नाही जोपर्यंत ब्रम्हांडीय शक्ति बाहेच्या दिशेने अहंकार, बुद्धि , मन आणि ज्ञानेंद्रियां द्वारे भ्रामक संसार

प्रक्षेपीत करत राहील. प्रथमतः लक्ष अंतरात केंद्रित करण्याची आवश्यकता आहे आणि कोणतीही व्यक्ति स्वतः हे करू शकत नाही. यावरही मी पुढे सांगणार आहे.

ब्रम्हांडीय शक्ति सक्रीय झाल्यावर परतीची यात्रा किंवा योग व मनोनाश सुरू होतो. या स्त्रोताला व्यक्तिचा स्व वा आत्मा म्हटले जाते, व तो परमेश्वराच्या प्रकृती समानच आहे. जसे अग्नी व ठिणगी कारण अग्नी व ठिणगी एकाच प्रकृतीची आहेत.

विभिन्न स्वतंत्र योग प्रणालींच्या रुपात या ब्रम्हांडीय शक्तिला जागृत करण्याचे विभिन्न प्रकारे उपाय केले जातात कुंडलिनी जागृत झाल्या नंतर सर्व योग प्रकार एकाच एकमेव भव्य पथावर आरूढ होतात.

सिद्ध महायोग

कुंडलिनी जागृत झाल्या नंतर जे सुरू होते - ती दिव्य प्रणाली वा मार्ग आहे ज्याला सिद्ध महायोग म्हटले जाते.

सर्व योग पद्धती तांत्रिक, धार्मिक, दर्शन, सिद्धांत रूढी इत्यादी ज्या काही आज जगात अस्तित्वात आहेत, मूळ रुपांत मानवाच्या देहात स्थित निष्क्रिय ब्रम्हांडीय शक्ति जागृत करण्यासाठी आहेत. ज्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रुपांत विविध तंत्रांचा उपयोग केला जातो त्याच्या विनाशाच्या दिशेने, परतीच्या प्रवासाच्या दिशेला सक्रिय करतात. मी एका प्रकरणात त्या प्रणालीच्या विभिन्न स्तराविषयी वर्णन केले आहे जे सामान्यतः शक्ति जागृतीसाठी उपयोगांत आणल्या जातात.

हे आत्मबोधाच्या उद्देहाने मानवी शरीरांतर्गत लौकिक तंत्र आहे. तांत्रिक स्वरूपात आत्मबोध अन्य मार्गाने असंभव आहे. खरे तर हे मानवजातीसाठी दिव्य आदी शक्तिने दिलेला प्रसाद आहे. ब्रम्हांडीय शक्ति जागरणाची क्रिया मानवी शरीरांत व्यक्ति अनुभवू शकते. या उपर जर या सिद्धांता विषयी काही शंका असतील तर त्याला आणखी काय हवे आहे ?

विनाश वा योगाची आवश्यकता का आहे ?

मनुष्याचे सृजन वा विकास ज्या ब्रम्हांडीय शक्ति द्वारा होते व जी शक्ति निष्क्रिय अवस्थेत अध:स्थित आहे तिच्या द्वारेच हे कार्य संभव आहे

व ती दिव्यता जी प्रत्येकाच्या अंतरात प्रकट होऊ शकते. यालाच आत्मबोध वा मोक्ष म्हटले जाते.

व्यक्तिच्या मानसिक धारणांचा विमोड कशा प्रकारे होतो याचे विस्तृत वर्णन मी नंतर करेन.

ब्रम्हांडाची ती सर्वोच्च शक्ति मानवाच्या रुपांत प्रकट झाल्यानंतर (ब्रम्हांडाच्या लघुररुपांत) सहस्त्रार व मुलाधार यांच्या आधाराने एक प्रकारे निष्क्रिय अवस्थेत असते. निष्क्रिय शब्दाचा प्रयोग एवढ्यासाठी योजला आहे कारण रचनात्मक सृजन अगोदरच पूर्ण झाले असते. प्रत्यक्षात मौलिक शक्ति ख़ऱ्या अर्थाने कधीच निष्क्रिय होत नाही. ती शक्ति मानवाच्या मन:पटलावर संसार प्रक्षेपित करत राहते आणि बुद्धि , मन अहंकार आणि पाचही इंद्रियांद्वारे त्याचे अस्तित्व टिकवून ठेवते.

ती शक्ति एखाद्या सक्षम शिक्षक वा गुरुच्या द्वारे जागृत झाल्यावर उलट दिशेने कार्यरत होते, परिणामी योग-साधकाची मानसिकता नष्ट होते. शक्ति शेवटी मुख्य स्त्रोत वा परमेश्वरांत विलीन होते. परिणामी मानवाचे मन परम ज्ञानाने ओतप्रोत होते. स्व अथवा दिव्यतेच्या प्रवृत्तीचे ज्ञान होते.

आता, ज्या मौलिक शक्तिने मानवाची निर्मिती केली त्याच्या बरोबर उलट क्रमाने वा विपरीत क्रमाने सृजनाला पूर्ववत करण्याची आवश्यकता आहे.

हेच जीवनाचे सार सर्व आहे जे प्राचीन काळापासून विश्वात विभिन्न प्रणालीद्वारे सांगितले गेले. त्यामुळेच परमेश्वराच्या कृपेशिवाय मानवाला स्वप्रयत्नाने आत्मबोधाची अवस्था प्राप्त करणे असंभव आहे.

एखादी व्यक्ति जरी (संसारात) शोधून काढली जाने उच्चस्तरीय धार्मिक प्रथांचे पालन केले आहे तसेच इतरही काही केले असेल तरी ते सर्व व्यर्थ जाईल. प्रथमतः ब्रम्हांडीय शक्ति एखाद्या आत्मोपलब्द आदरणीय गुरुच्या माध्यमाद्वारे जागृत करण्याची आवश्यकता आहे. तोपर्यंतचे सर्व प्रयत्न वास्तवात साधकाच्या मनांत एक अस्थायी शांती प्रदान करण्या व्यतिरिक्त काही होणार नाही.

या एकमेव कारणास्तव सर्व धार्मिक संप्रदायामध्ये सर्व शक्तिमानाप्रती आत्मसमर्पणावर जोर दिला जातो. कारण आत्मबोधाच्या दिशेने तो एकच उपाय आहे.

एकदा का ती ब्रम्हांडीय शक्ति मानवजात जागृत झाली तर अंतिम मोक्षासाठी ईश्वरा विषयी संबंधित सर्व विचार एका दिव्य विचारात संमिलित होतील जो आत्मबोधाच्या दिशेने घेऊन जाईल. थोडक्यात एवढेच की व्यक्तिची कुंडलिनी जागृत झाल्यावर दिव्यते विषयीचे सर्व विचारांत परिवर्तन होईल. मनांत विभिन्न धर्माविषयी कोणतीही शंका उरणार नाही.

आपण याला विशाल धर्म म्हणू शकता किंवा योग प्रणालिच्या ऐक्याचा सिद्धांत.

संसारातल्या सर्व भाषा मानवाच्या बुद्धि तून प्रकट झाल्या जे बुद्धि ने समजू शकत नाही त्याचे वर्णन करण्याची एक आंतरिक सीमा आहे.

त्यामुळेच सर्व धर्म, दर्शन, सिद्धांत, योग प्रणाली इत्यादी निष्क्रिय लौकिक शक्ति जागृतीसाठी व्यक्तिला मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने विविध मार्गांचे तंत्र सांगतात. या बिंदू पलीकडे सर्व शक्तिमानाची प्रत्येकाची धारणा एकाच राज मार्गाप्रत जोडणे सुरू होते. वाचकांना मी छातीठोकपणे सांगतो की हा केंद्रबिंदू नंतर मानसिकतेत फार झपाट्याने फरक पाडेल. दिव्यतेच्या संबंधी विचारांत एक सखोल बदल घडेल. या विचार धारणेवर सखोल चिंतन एका प्रकरणात केले आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास योग साधकाला हे काय झाले ते समजणार नाही. आवश्यक मानसिक परिवर्तन एका झटक्यात होते. सर्वोच्च शक्ति व्यक्तिला ऐच्छिक प्रयत्नाशिवाय आत्मबोधाच्या दिशेने घेऊन जाते.

सिद्ध महायोगाचा अनुयायांबाबत, ही अलौकीक शक्ति गुरुच्या वा सिद्ध शिक्षकाच्या कृपेने क्रियाशील केली जाते, जी मानवाच्या लाभार्थ, त्यांच्या माध्यमाच्या रुपांत कार्य करत असते. गुरु शक्तिपात वा ऊर्जेचे अवतरण या क्रिया प्रकारांचा उपयोग करून हस्तक्षेप करतो. पुढच्या प्रकरणात त्याबाबत उहापोह केला आहे.

हा योगप्रकार इतर योग संप्रदायाप्रमाणेच एखादा वेगळा प्रकार नाही ज्यात निष्क्रिय ब्रम्हांडीय शक्ति जागृत करण्यासाठी आपापल्या पद्धतीनुसार स्वतंत्र प्रयोग केला जातो. प्रत्यक्षात विभिन्न प्रकार एकाच भव्यदिव्य प्रकारात विलीन होतील वा कालांतराने समजेल की सर्व मार्ग एकाच दिव्यते कडे जात आहेत.

सर्व मानवजात ज्या एका दिव्य अत्युच्च सिद्धी च्या शोधार्थ

विविध शास्त्र, धर्म, दर्शन, सिद्धांत योग प्रणाली तांत्रिक पद्धती यांचा शोध घेत असते ती गोष्ट सिद्ध महायोगाच्या साधकाला उपलब्ध आहे. ह्या कारणामुळे त्याला दिव्य योग म्हटले जाते.

प्रत्यक्षात हा उच्च आध्यात्मिक पथ सरळ सरळ एका गुरुच्या कृपाप्रसादाच्या या माध्यमाद्वारे इच्छुक साधकाला प्राप्त होतो. जो बोध एका रात्रीत वा अनेक वर्ष देखील प्राप्त होऊ शकत नाही, शक्तिपात वा शक्तिचे अवतरण हा लाभ केवळ निष्क्रिय कुंडलिनी जागृती पर्यंतच सीमित आहे.

ही शक्ति जागृत झालेला साधक एका अशा रस्त्यावर येऊन पोहोचतो जो आपली पूर्वीची सांसारिक पद्धत अवलंबू शकत नाही संभवता अनंत जन्मापूर्वीचे स्वप्न आज साकारात येते. कुंडलिनी शक्ति जागृती ही एक अत्यंत दुर्लभ घटना आहे. खरे तर मानव समाजात ईश्वराचे पूजन अर्चना केवळ याच उद्देशाने केले जाते. सर्व योगप्रकार तांत्रिक उपाय केवळ याच उद्देशासाठी आहेत. प्रत्यक्षात कुंडलिनी जागृती शिवाय आध्यात्मिक दृष्टीने काही प्रगती होऊ शकत नाही. प्रत्यक्षात कोणीही माणूस सक्षम नाही की जो आपल्या जीवनकालात जागृती वा परमात्म्याचा कृपाप्रसाद प्राप्त करू शकेल. त्यामुळेच असे म्हणावे लागते की अनंत जन्माच्या प्रयत्नानंतर या स्वप्नाची चरमावस्था म्हणजे ईश्वर कृपा होय.

सांसारिक दृष्टीकोनातून असे म्हणता येईल भौतिक संसारात काही विशेष फरक पडेल. पण, साधकाला दिव्यदृष्टी द्वारे सर्व काही दिले आहे. मानव समाजात एक भ्रामक समजूत आहे की कुंडलिनी जागृत झाल्यावर सांसारिक जीवनात असाधारण परिवर्तन यावे / व्हावे. वाचक या तत्त्वाशी सहमत असतील की या संसारातील कोणतीही व्यक्ति ईश्वराच्या वाटेने जातो, तो खरे तर भौतिकातील वस्तूच्या मागणीसाठी जातो. एखादीच व्यक्ति अशी सापडेल जी केवळ आध्यात्मिक दृष्टीने परमेश्वराची कृपा प्राप्त होण्यासाठी ईश्वराचा दरवाजा ठोकत असेल. जेव्हा केंव्हा परमेश्वर आपला दिव्य कृपाप्रसाद वर्षा करतो ती कुंडलिनी जागृती च्या रूपात होते. दिव्यतेचा मानवाच्या क्षूद्र संसारातील वस्तूच्या भ्रामक मागण्यांशी कोणताही संबंध नाही.

कोणीही सहजासहजी या योग प्रकारात दीक्षित केले जात नाहीत. कारण व्यक्तिगत बौद्धिक पात्रता त्या योग्य नसते. या शिवाय योग्य वेळ

आल्याशिवाय त्याची पूर्तता होऊ शकत नाही. असेही असेल की या कारणास्तव या पद्धतीचे अस्तित्व चालू सामाजिक स्थितीच्या आधारावर दर सहाशे वर्षांत एकेकदा गुप्त व प्रगट रूपात सार्वजनिक केले जात असेल. असे शक्तिपात प्रकार पद्धतीत सर्वमत आहे. त्या परिस्थितीची कल्पना करू शकता, जिथे कोणीही या योग पद्धतीद्वारा गुरुकडे जावे परंतु, ते दीक्षित होऊ शकत नाहीत.

वाचकांना माझी प्रार्थना आहे की त्यांनी माझ्या चित्ताची दुःखद अवस्था समजून घ्यावी. किती बरे झाले असते की हे अशा पद्धतीने घडले नसते. संभवता ! मानवाची स्वतंत्र इच्छा केवळ एक भ्रम होता. सर्वेश्वराला संपूर्ण शरणागंती अतिरिक्त इतर काही नाही जे मोक्ष प्राप्त करण्यासाठी केले जाते. केवळ परमेश्वरी कृपाच मानवाला वाचवू शकते. खालील उदाहरणाद्वारे ते चांगले समजता येईल.

चिखलात लोळत पडलेले डुक्कर कधीही त्यातून बाहेर येण्यास तयार होत नाही जोपर्यंत त्याला जबरदस्त त्रास झाल्याने बाहेर पडावे लागते.

विहिरीतील बेडूक तोपर्यंत आपल्या विचारात मग्न असतो की त्याने सर्व विश्व पाहिले आहे जोपर्यंत त्याला कोणी उचलून समुद्रात फेकत नाही.

त्याच प्रमाणे माणूस एखाद्या खड्डयाला वा विहिरीला जीवन म्हणतो व त्यात जगत असतो.

आता त्यांच्या बाबतीत असेच काहीतरी असंभाव्य होण्याची आवश्यकता आहे, जेणेकरून अनंत परम सत्य समजण्यास सक्षम होतील. कुंडलिनी वा दिव्यशक्ति अगदी हेच करते. ज्या व्यक्तित ही दिव्य शक्ति जागृत झाली आहे त्याला जबरदस्तीने बाहेर काढून परम सत्य दाखवले जाते.

आधुनिक विज्ञानाला अज्ञात व असंभव, तर्कहीन सिद्ध महायोग सूर्याप्रमाणे प्रकाशित करून मानवतेवर परमज्ञान व शांतीची वर्षा करतो.

दुनियेला सोडून द्या.

चिंता करू नका. ब्रम्हांडात आपण कायम एकटेच राहणार. कारण तुमचा वास्तविक स्वभाव परम सत्य, परम अस्तित्व आणि परम आनंद आहे. सिद्ध महायोग याच गोष्टीचा दावा करते.

या पुस्तकात मी विज्ञान, दर्शन, धर्म, योगप्रकार व इतर काहीही

सर्व विलीन करण्याच्या दिशेने एक लघु प्रयास केला आहे.

मी माझ्या आंतरिक दुनियेचे दरवाजे उघडून एकमेव परोपकारी दृष्टिकोनातून माझ्या स्वतःच्या अनुभवांचे वर्णन केले आहे. संपूर्ण नम्रते सकट व निःसंकोचपणे मन मोकळे केले आहे.

दिव्य योग प्रकाराचे चार मार्ग

सर्व योगग्रंथात एकच उद्घोष केला आहे की आत्मबोध प्राप्तीसाठी प्रामुख्याने चार मार्ग आहेत जे प्रारंभिक अवस्थेत विभागले आहेत, जोपर्यंत कुंडलिनी जागृत होत नाही तोपर्यंत ही बाब वाचकांनी लक्षात ठेवावी. विश्वभर ईश्वराची पूजा अर्चना (योग, तांत्रिक व अन्य प्रकार) कोणत्याही व्यक्ति द्वारे केली जाते ते सर्व प्रयास, केवळ कुंडलिनी जागृतीच्या उद्देशानेच केली जाते. योग शब्द हे व्यक्त करतो की हे सर्व प्रयास, परिणामकारक व सूक्ष्म आहेत. खरा प्रयत्न व्यक्तिगत कुंडलिनी जागृती नंतर सुरू होतो. त्यांतही एक अडचण आहे. व्यक्तिगत कुंडलिनी जागृत झाल्यावर त्या व्यक्तिसाठी खरेतर स्व प्रयत्नाने काहीच करणे शिल्लक राहत नाही. सर्व कर्म तर प्रत्यक्षात ईश्वरीय शक्ति द्वारे केली जातात. त्यामुळेच कुंडलिनी जागृती व आत्मबोधाची प्रक्रिया ही पहिली पायरी आहे. म्हणूनच त्यापूर्वीच्या सर्व प्रयत्नांना प्रारंभिक म्हणून संबोधले आहे.

पहिला मार्ग आत्म-समर्पण त्यालाच सर्वशक्तिमानाची भक्ति म्हटले जाते.

यांत व्यक्ति सर्व कार्य सर्व शक्तिमानाला भेट रुपांत अर्पण करते. अशा मनःस्थितीत मानवातील सर्व संवेदना एका तीव्र ओघात समर्पित होतात. या प्रकारे व्यक्ति विचाररहित अवस्थेकडे अग्रसर होऊ लागतो, जो

योग प्रकाराचा अंतिम उद्देश आहे.

सामान्यतः हा मार्ग सर्वात तीव्र मार्ग आहे जो आत्मबोध प्राप्त करून देतो. वाचकांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की या मार्गाचे अवलंबन करता भाग्य तीव्र गतीने बदलते जर ते त्या दिव्यतेच्या अधीन असेल तर ! या प्रयोगाला देखील सुरक्षित मानले जाते, कारण भगवंत आपल्या भक्ताला कधीही दूर लोटत नाही. तसेच मार्ग सोडून भरकटणे वा खालच्या पातळीवर उतरण्याची अनुमती नसते.

आत्मबोधाच्या उद्देशाने केलेले आत्मसमर्पण त्याच लोकांसाठी उपयुक्त ठरते जे भावनात्मक व अति संवेदनशील असतील.

दुसऱ्या टप्प्यात, याच सांसारिक जीवनात सर्व चांगल्या-वाईट कर्मांचा हिशोब पूर्ण करावयाचा असतो. त्याचा मानसिक व शारीरिक परिणाम सहन करून सर्व ऐंद्रीय संवेदनांना नष्ट करणे हे आद्य कर्तव्य ठरते यावर मी स्पष्टीकरण देऊ इच्छितो.

व्यक्तिगत संस्कारांचा ऐंद्रिय संवेदनांचा प्रभाव मानवाचे भविष्य निर्माण करण्याच्या व्यापारात बीज रुपांत कार्य करते. व्यक्तिच्या या प्रतिक्रिया नियतिच्या रुपांत अनुभवल्या जातात, परिणामी त्याविषयी परत नवे संस्कार मन:पटलात तरंगित होतात. त्याचा छाप पुढील संस्कार निर्मितीसाठी भविष्य निर्माण करतात. एक प्रकारे कार्य - कारण भावाचे एक चक्र सुरु होते. वाचकांनी एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक असते, ते, कर्म करण्यापूर्वी. एकदा का कर्म झाले की परिणामावर त्याचे कोणतेही नियंत्रण रहात नाही. त्या व्यतिरिक्त कर्माच्या परिणामाविषयी कोणतीही भविष्यवाणी संभवत नाही, कारण त्यावरचे त्याचे नियंत्रण संपलेले असते. या परिस्थितीत ऐंद्रीय संवेदना पूर्णपणे नष्ट करण्याची आवश्यकता असते. हे तेव्हाच संभव होईल जेव्हा आपण नियतिला केवळ अनुभवण्यात सक्षम असतां, जेणेकरून सर्व ऐंद्रिय संवेदना समाप्त होतील. त्याचबरोबर व्यक्तिला या बाबीवर देखील लक्ष ठेवण्याची गरज असते की नवीन संस्कार जमा होणार नाहीत. ही गोष्ट तेव्हाच शक्य आहे जेव्हा व्यक्ति आपल्या भावनात्मक आसक्ति व शंका रहित नियतिचा मूक साक्षीदार होतो.

येथे योग साधकांसाठी मी एक सल्ला देऊ इच्छितो. नवीन संस्कार (जस जशी नियति प्रकट होते) संपवणे अपेक्षाकृत थोडे सुविध होते.

ही गोष्ट यावर निर्भर करते की नियतिचा सामना करताना आपल्या भावनांना किती जपतो. कमीत कमी भावनात्मक प्रभाव याचा अर्थ संस्कार संपवणे अधिक सोपे जाते. हाच प्रकार योगात उलट प्रकारात संभवतो.

मार्ग पूर्णतः विषम आहे. व्यक्तिला सांसारिक जीवन जगताना क्षणोक्षणी सतर्क राहावे लागते. या पथावर चालताना त्यांना कधीही कोणत्याही स्तरावर कर्म करताना भावनात्मक रुपांत न जोडता राहता यायला हवे, अन्यथा केलेल्या कर्माचा संस्कार बुद्धि वर झाला की भविष्य निर्मितीसाठी कारणीभूत होतो.

या मार्गात बराच कालावधी जातो, कारण व्यक्तिला पूर्वजन्म संस्कारांना सामोरे जावे लागते. त्याचबरोबर वर्तमान जीवनातील नियतिच्या भौतिक अनुभवांपासून पूर्ण वैराग्य प्राप्त करावे लागते.

हा मार्ग लाभकारी असतो कारण व्यक्ति सतत नियतिचे भांडार नष्ट करण्यात प्रगती करतो. यदा-कदा व्यक्ति घसरला तर तो खोल दरीत जाऊन थांबतो व परत मार्गावर येण्यासाठी बराच काल व्यतीत होतो. मनांतील ऐंद्रीय प्रभाव गोळा करण्यासाठी कालव्यय बराच होतो. या काळांत व्यक्तिला आभास होऊ शकतो की तो मार्गावरून भरकटला आहे व त्याला सुधारण्याची आवश्यकता व त्याचा उपाय करू शकतो.

तिसरा ज्ञान मार्ग.

या प्रकारात वेगळी अडचण आहे. ईश्वरी शक्ति सांसारिक ज्ञानाच्या मार्गातून प्रकट होत नाही ! याचा अर्थ हा झाला की व्यक्तिला हा आभास होणे आवश्यक आहे की जेवढे सांसारिक ज्ञान आहे ते सर्व कुचकामी आहे. व्यक्तिला संचित ज्ञानाचा स्वीकार न करण्याची आवश्यकता असते. तरीही त्याला ते सर्व ज्ञान संचय करणे आवश्यक असते व त्याचमुळे त्याला बोध होतो की हे सर्व अर्थशून्य आहे. ही गोष्ट मी विस्ताराने समजाऊ इच्छितो.

विश्वातील सर्व भाषांमध्ये ज्ञान साहित्याचे विशाल भांडार उपलब्ध आहे जे त्या दिव्य शक्तिला व्यक्त करते. योगाच्या परिभाषेत ज्या व्यक्तिने या संपूर्ण ज्ञान सागराला समजण्याचा प्रयत्न केला, त्या व्यक्तिपेक्षा वेगळे काही नाही ज्याला त्या साहित्या विषयी काहीही माहीत नाही. कारण एकच दोघांपैकी कोणालाही ईश्वरी शक्तिचा प्रत्यक्ष अनुभव नाही.

दिव्यता स्वतःच्या अंतरात प्रकट करण्याची आवश्यकता आहे. ईश्वरीय शक्ति आपोआप बाहेरून शरीरात प्रवाहित होत नाही कारण ती

प्रत्येक जीवात अगोदर पासूनच अस्तित्वात आहे. जरी व्यक्तिगत परम ज्ञानाच्या उदयाबरोबर पवित्र ग्रंथा सहित अन्य संसारीक ज्ञान देखील एक मुख्य भूमिका निभावते, पण ती परोक्ष रुपांत.

आंतरिक सु-संबंध आणि तर्कयुक विचार व्यक्तिला या भ्रामक सांसारिक विषयांना अस्वीकार करण्यास प्रभावित करतात. या प्रकारे सर्वकाही अस्वीकार केल्यावर बुद्धि ला विचार करण्यासारखे काही शिल्लक उरत नाही. ज्या वेळी मन विचाराविना शांत होते त्यावेळी ते स्वतःच्या अंतरात असलेल्या आत्म्यासाठी एका आरशाच्या रुपांत कार्य करते परिणामी स्वंच्या अंतरात अध: स्तरावर आपण ज्याला आत्मा वा पर दिव्यता म्हणतो प्रगट होते. असे जेव्हा घडते तेव्हा असे प्रतीत होते की आरशा वरील धूळ साफ झाल्याने शेवटी आपल्या स्वयंचे प्रतिबिंब पाहू शकतो या बाबतीत मन आरसा आहे जेव्हा सर्व ऐंद्रिय प्रभावापासून वा विचारापासून शुद्ध केले गेले.

हा मार्ग बुद्धिजीवी प्रवृत्तीच्या व्यक्ति साठी उपयुक्त ठरतो. जी व्यक्ति या मार्गाचा अवलंबन करते तिला ज्ञानाचा एक विशाल संग्रह गोळा करावा लागतो व त्याच बरोबर शाश्वत सत्याला लक्षात घेऊन निरंतर आंतरिक संघर्षाच्या माध्यमातून नकारावे लागते.

ही फार श्रम-साध्य प्रक्रिया आहे व बराच कालव्यय होतो.

एक वेळ अशी येते, की व्यक्तिच्या बुद्धि ला हे समजू लागते की हे वास्तवात सर्व शक्तिमान आहे. कारण बुद्धि ने विभिन्न शास्त्र आणि वैज्ञानिक ज्ञानाच्या रुपांत माहिती गोळा केलेली असते त्यामुळे तो संभ्रमात असतो की सृष्टी विषयी तो सर्व काही जाणतो. याठिकाणी बुद्धि ची तुलना त्या बेडका बरोबर करता येईल जो राहतो विहिरीत पण विचार करतो की त्याने पूर्ण संसार पाहिला, जोपर्यंत त्याला समुद्रात फेकले जात नाही तोपर्यंत.

पुढच्या पायरीवर एक अशी स्थिती येते जेथे बुद्धि संभ्रमित होते की ती परमावस्था नाही. येन केन प्रकारे त्या बिंदूपर्यंत पोहोचते जिथे व्यक्ति अभिमान राहित होते. ती एक ब्रम्हांडीय घटना व्यक्त होते. शेवटी ती व्यक्ति जिच्यात प्रचंड ज्ञानार्जन केल्याचा अहंकार झळकत होता त्याच्यापुरते काहीतरी घडते. व्यक्तिचा संपूर्ण अहंकार गलीत होतो आपल्या संचित क्रियमाणाच्या आधाराने विशिष्ट रूपात विनम्र होतो.

शेवटचा मार्ग आंतरिक नियंत्रणाच्या आधाराने आहे. हा मार्ग मूलतः चिंतनाच्या संबंधाने संपादित होतो.

यात मन एखाद्या चकव्या मध्ये अडकते व निर्विचार अवस्थेप्रत पोहचते. ही अवस्था बहुधा मनाला एखाद्या वस्तूच्या रुपांत, आकारात व ध्वनी वा एखाद्या गोष्टीचा उपयोग करून त्या वस्तू प्रती लक्ष केंद्रित करून प्राप्त केले जाते. हळूहळू मन त्या वस्तूवर आपले लक्ष केंद्रित करण्यास शिकते. त्यापुढे एक स्थिती अशी येते जिथे बुद्धत्व पूर्णतः रिक्त होते, परिणामी वैचारिक, भावनिक इत्यादी कोणत्याही प्रकारच्या परिवर्तनापासून पूर्णपणे वीतराग होते.

या मार्गात, अंततः मनाची एकाग्रता साधण्यासाठी कोणत्याही वस्तूवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता उरत नाही, आणि शेवटी मन निर्विचार शांत अवस्थेप्रत पोहोचते.

हा मार्ग वैज्ञानिक प्रवृत्तीच्या लोकांसाठी फार उपयुक्त आहे. प्रत्यक्ष प्रयोगाने ते दिव्यतेला सत्यात उतरवू इच्छितात. ही मंडळी या प्रकारात मोडतात जे प्रत्येक पावलागणिक दिव्यतेला अनुभवू इच्छितात. हा मार्ग साधारणपणे एखाद्या योग्य शिक्षक वा गुरुच्या मार्गदर्शनाशिवाय अभ्यासू मंडळीसाठी घातक ठरू शकतो. या लोकांसाठी एक धोका असा आहे की कुंडलिनी शक्ति अनियंत्रित प्रकारे क्रियाशील होऊ शकते, परिणामी साधक या शक्तिला सहन करण्यास असमर्थ ठरू शकतो. अंततः प्रत्यक्षात शारीरिक व मानसिक रुपांत अस्वस्थ होऊ शकतो.

यासाठी वाचकांनी वरील परिच्छेदावर विशेष भर देण्याचा आग्रह केला आहे, यदा कदा ही मंडळी योग्य देखरेखी शिवाय या प्रकारच्या ध्यानाचा अभ्यास करत असतील तर !

खालील उद्धृत केलेली गोष्ट वास्तवात कुंडलिनी शक्ति च्या कोणत्याही अभ्यास क्रियांशी संबंधित नाही मी खालील परिच्छेदात उल्लेखित कथनाच्या महत्त्वावर विशेष भर देण्यासाठी ब्रम्हांडीय शक्तिच्या संबंधी एक भयावह अनुभव सांगू इच्छितो. हा अनुभव प्रत्यक्षात ब्रम्हांडीय शक्तिच्या मौलिक रुपाशी कोणत्याही प्रकारे संबंधित नाही. मात्र तो मानवाच्या शरीरातील जीवनशक्तिशी संबंधित आहे जो मौलिक ब्रम्हांडीय शक्तिच्या रूपाचे थोडे स्थूल रूप आहे. नंतरच्या एका प्रकरणात

शक्तिची विविध रूपातील व्यक्ततेचे विस्तृत विवरण केले आहे.

सिद्ध महायोग परंपरेत दीक्षित होण्याच्या जवळजवळ चार वर्ष अगोदर माझ्यावर मनला आश्चर्यचकित करणारा अनुभव आला.

मला कोणीतरी सांगितले की हैदराबाद शहरात एक महिला आहे जी लोकांना 'रेकी' - प्राणिक चिकित्सेची पूर्वतयारी पद्धतीमध्ये दीक्षित करते. दीक्षा पद्धती साठी मी भेटण्यासाठी वेळ निश्चित केली व तिच्या घरी पोहोचलो.

तिथे, मला एका खोलीत बोलावले गेले, एका खुर्चीवर डोळे बंद करून बसण्यास सांगितले. रेकी मास्टर, एक महिला, ध्यानमुद्रेत माझ्या पासून थोड्या अंतरावर बसली होती. अन्य एक महिला, जी परिचारिका होती, तिला माझ्या डोक्यावर हात ठेवण्याचा आदेश दिला गेला. या बिंदूच्या माध्यमाद्वारे माझ्या शरीरात ब्रम्हांडीय शक्ति हस्तांतरित करण्याचा एक प्रयास केला गेला. मला या घटनेच्या आधी सांगितले गेले होते की व्यक्तिला रेकी दीक्षेच्या कालांत स्पष्टपणे शरीरात शक्तिचा प्रवाह अनुभवाला येतो.

स्वाभाविकपणे मी तशा प्रकारच्या अनुभवाची प्रतीक्षा करत होतो. या बैठकीनंतर मला माझ्या अनुभवाविषयी विचारले गेले. मी रेकी मास्टर ला सांगितले की काहीही झाले नाही. माझे हे उत्तर ऐकून मला रेकी प्रकाराबाबत कोणतेही मत नक्की करू नये आणि चार दिवसानंतर परत एक प्रयत्न करण्यासाठी येण्यास सांगितले.

या घटनेच्या दोन दिवसांनंतर, रात्री गादीवर पडलो होतो आणि एक पुस्तक वाचत होतो. अचानक मी माझ्या डोक्यावर चक्राकार गतीला अनुभवू लागलो. माझे लक्ष पुस्तकावरून हटले आणि मानसिक रुपांत त्या घटनेचे निरिक्षण करु लागलो. शक्तिची चक्राकार गती अधिक तीव्र झाली आणि डोक्याच्या वरील भागातून डोक्यात प्रवेश करू लागली.

त्यानंतर शक्ति पटापट खालपर्यंत शरीरातील सर्व भागात प्रवाहित झाली. शक्तिला मी आपली बोटे आणि पायाच्या बाहेरील भागात वाहताना अनुभव करत होतो मी अगदी स्पष्टपणे त्या शक्तिला आपल्या शरीराच्या बाहेर वाहण्याच्या स्पर्शाला अनुभव करत होतो. काही मिनिटांत शक्तिचा प्रवाह अजून तेज झाला, आणि मला माझ्या डोक्यात

असहनीय अनुभूतीचा अनुभव येऊ लागला. यानंतर प्रवाह फारच असहनीय झाला.

कसाबसा मी बिछान्यातून उठलो त्यानंतर शक्ति प्रवाह थोडा कमी झाला. परंतु माझ्या शरीरांतर्गत शक्ति प्रवाहाची अनुभूती बंद झाली नाही. परिणामस्वरूप रात्रभर मला झोप लागली नाही. शक्ति संचार माझ्या डोक्यात रात्रभर सुरुच होता. दुसऱ्या दिवशीही ती अनुभूती सुरुच होती आणि संध्याकाळी भटकण्याच्या इराद्याने बाहेर पडलो.

एका दाट रहदारीच्या रस्त्याने जात होतो. अचानक मला वाटू लागले की मी आता रस्त्यात पडणार. मला चक्कर येऊ लागली आणि डोळ्यासमोर अंधारी आली. त्यात रहदारीच्या रस्त्यावर ! डोळ्या पुढची अंधेरी काही क्षणापुरतीच होती. या प्रकारामुळे घाबरून मी आपल्या खोलीच्या दिशेने वाट चालू लागलो.

परतीच्या प्रवासात मला जाणवले की मी कधीही बेशुद्ध होऊ शकतो. कसातरी मी खोलीपर्यंत येण्यात सफल झालो. माझ्या डोक्यातील असहनीय सरसर दुसऱ्या रात्रीही तशीच होती आणि मी झोपू शकलो नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी रेकी मास्टर ला भेटण्यासाठी गेलो आणि जे अनुभवत होतो ते निरूपण केले.

तिने जे मला सांगितले त्याने मी अंतरात हडबडलो.

तिने मला सांगितले की मागच्या भेटीत मी तुम्हाला रेकी प्रकारात दीक्षित करण्यात असफल झाले. काहीतरी कारणाने तुमच्या बाबतीत ते सफल झाले नाही. रेकी मास्टरने ही घटना फार गंभीर स्वरुपांत घेतली. तिने मला सांगितले की मी गेल्यानंतर, ती ज्या देवीची पूजा-अर्चना करते, ती तिच्या चरणी नतमस्तक झाली. या शर्मनाक परिस्थीतीतून स्व:तला वाचवण्यासाठी देवीची प्रार्थना केली होती. याशिवाय ती संकल्पाने मला रेकी प्रकारात दीक्षित करण्याचा प्रयत्न करत होती. याचा अर्थ असा की ती लांबून परोक्ष रुपांत प्राणिक शक्ति हस्तांतरण करण्याचा प्रयास करत होती.

रेकी प्रकाराची जी थोडी माहिती मला आहे त्यानुसार अशा प्रकारे दीक्षित करणे शक्य होते. प्रत्यक्षात मी त्याचा अनुभव घेत होतो.

या प्रकरणा बाबत व त्याच्या परिणामा बाबत मी जास्त विचार करू इच्छित नाही. परंतु या प्रकारा नंतर बऱ्याच वर्षा नंतर सुद्धा मला

असे जाणवत होते की माझे शरीर शक्तिची एक कचरा पेटी झाली होती. कमीत कमी तोपर्यंत जोपर्यंत सिध्द महायोग संप्रदायात मी दीक्षित झालो नाही. शक्ति निरुद्देश्य माझ्या अंगोपांगात प्रवाहित होत होती. त्याचा माझ्या डोक्यावर कोणताही प्रभाव पडत नव्हता. त्यामुळे कधी कधी चीड येत असे. सर्वात वाईट गोष्ट ही की मी त्या बाबतीत काहीही करण्यास असमर्थ होतो. या एकंदर प्रकारा बाबत मी कोणाशी बोलावे तशा प्रकारचा कोणी ओळखीचा नव्हता. माझ्या सांगण्यावर कोण विश्वास ठेवणार? अशा प्रकारे बरीच वर्ष शरीरातील शक्तिच्या असामान्य प्रवाहाबरोबर राहावे लागले.

त्यामुळेच एखाद्या योग्य गुरुं च्या उचित मार्गदर्शना विना ध्यानाचा अभ्यास करण्याच्या धोक्या बाबत जोर देऊ इच्छितो. ब्रम्हांडीय शक्तिचे अशाप्रकारे अनियंत्रित सक्रिय होणे शक्य आहे.

वाचकांना जागृत करण्यासाठी वरील अनुभव सांगितला आहे ब्रम्हांडीय शक्तिला कोणत्याही प्रकारे छेडण्याचा प्रयास करण्या अगोदर योग्य ती काळजी घेतली पाहिजे. या कथना मागे वाचकांना घाबरवण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. खरे तर, तीच ब्रम्हांडीय शक्ति, नियंत्रित परिस्थितीत जागृत केली असता, आत्मबोधाच्या दिशेने घेऊन जाते.

चार प्रारंभिक पथा विषयी मी जे सांगितले त्या दिशेला मी परत येतो.

या पैकी कोणत्याही मार्गाची आपण निवड करा, कुंडलिनी शक्ति कधी न कधी जागृत होईल. ही ब्रम्हांडीय शक्ति विभिन्न योग प्रणालीत विभिन्न नावाने ओळखली जाते.

प्रत्यक्षात, व्यक्ति मध्ये ज्या बिंदूवर कुंडलिनी शक्ति क्रियाशील होते. त्याच बिंदू मध्ये सर्व मार्ग लय पावतात. विविध मार्ग जेंव्हा एकत्र होतात तेंव्हा एक राजमार्ग तयार होतो. या विषयी एका प्रकरणांत त्याचा जास्त उहापोह केला आहे.

हा प्रवास प्रारंभिक अवस्थेत निष्क्रिय ब्रम्हांडीय शक्तिला सक्रिय करण्यासाठीच विविध मार्ग अन्यांन्य साधकांद्वारे केला जातो. व्यक्तिगत शक्ति जेंव्हा सक्रिय होते, तेव्हा योग्याची दिव्य प्रक्रिया सुरू होते.

व्यक्तिला त्या प्रवाहात सोडले जाते जो त्याला स्त्रोताच्या

परतीचा मार्ग दाखवतो. अर्थात परम दिव्यता, ईश्वर वा सर्व शक्तिमान च्या दिशेने.

परतीच्या प्रवासात, व्यक्ति बरोबर, अपरिचित मार्गावर काय घडते हेच या संपूर्ण पुस्तकांत आहे.

कुंडलिनी शक्ति

विश्वभर कुंडलिनी शक्ति विषयी भरपूर शास्त्र साहित्य उपलब्ध आहे. संस्कृत ग्रंथानुसार त्याची एक हजार नावे आहेत. त्यामुळे संस्कृत शब्द कुंडलिनी चा अर्थ समजवण्यासाठी कोणत्याही विद्वत्ता पूर्ण विवरणात शिरणार नाही. सरळ सरळ मूळ मुद्द्यावर येतो.

कुंडलिनी शब्दाचा अर्थ आहे चक्राकार. ब्रम्हांडाची ती मुख्य शक्ति आहे, वा आपण असे म्हणू शकतो की मुख्य शक्तिची स्थूल अभिव्यक्ति.

परंतु असा विचार न करावा की ब्रम्हांच्या आकाराची वैज्ञानिक गणिताने त्या शक्तिला आवर घालता येईल.

या शक्तिची प्रवृत्ती न सोडवता येण्यासारखी व रहस्यमय आहे. याच्या आकराबाबत कोणताही तर्क वितर्क चालणारा नाही.

या शक्तिची वास्तविक प्रवृत्ती स्वतः शक्ति द्वारेच प्रकट होते. आणि केवळ अती उन्नत योग्यांनाच ते शक्य आहे.

मी एक शब्दप्रयोग करतो, आणि पाहूया वाचक याचा अर्थ लावू शकतात की नाही - 'शक्ति ज्ञानवती आहे'.

ही शक्ति ब्रम्हांडात सर्वोच्च आहे. मानव त्या शक्तिमानाप्रमाणे सचेत आहे. सरते शेवटी ती मौलिक शक्ति आपल्या मूळ अवस्थेत शक्ति आहे.

ती सर्वोच्य शक्ति शक्तिमाना पासून भिन्न नाही. तो स्वतः शक्तिमान आहे जो शक्तिच्या रुपात प्रकट झाला आहे.

त्यामुळेच वाचकांना मनातील आधुनिक विज्ञाना विषयी सर्व विचारांना दूर ठेवण्याचा इशारा दिला जातो कारण ते केवळ भौतिक रूपा संबधी आहेत. अशा प्रकारे, वाचक पुस्तकाला चांगल्या पद्धतीने समजू शकतील. मी जे अगोदर म्हटले आहे शक्ति स्वतः ज्ञानवती आहे, या अर्थाने हा जो अंश आहे त्याची बुद्धि साधारण मानव बुद्धि पेक्षा श्रेष्ठ आहे.

आपल्या मूळ रुपांत शक्ति सर्वज्ञ व सर्व ज्ञानमय आहे. प्राचीन योग ग्रंथानुसार सर्वज्ञते मध्ये दोन विशेषता मानतात. एक स्थिर भाग व दुसरा गतिशिल भाग. स्थिर भाग परिवर्तन रहित वा अनंताच्या सिद्धंताशी संबंधित आहे तर दुसरा भाग गतिशील जो सदा परिवर्तित होणाऱ्या ब्रम्हांड शक्तिशी. प्रत्यक्षात ही दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. व एका अर्थाने एकच आहेत. याच शक्तिला साधकाने आपली वास्तविक प्रवृत्ती प्रकट करण्याची आवश्कता आहे. हे केवळ त्याच योग्याच्या बाबतीत घडू शकते जे योगाच्या त्या अत्युच्च पायरिवर पोहोचले आहेत. जेथे बुद्धि जाणकार, बुद्धि जाणण्याची वस्तू आणि बुद्धि प्रयोगशाळा सुद्धा आहे.

ही सर्वोच्च ऊर्जा वा परा शक्ति (योग ग्रंथानुसार) गोचर ब्रम्हांडाच्या रुपांत दोन स्तरावर प्रकट होते.

या प्रकटीकरणचे एक रूप सामूहिक स्तरावर आहे तर दूसरे रूप व्यक्तिगत स्तरावर. सांगण्याचा भाव हा आहे की एकीकडे ब्रम्हांड ज्या रुपांत आहे तसे च्या तसे सर्व मानवाच्या सामुहिक अंतरात्मा मधे अस्तित्वात आहे, त्याच बरोबर दुसरीकडे व्यक्तिगत स्तरावर ते वेगवेगळे भासमान आहे. जरी दोन्ही संसार एक प्रकारे असे एकमेकांशी संलग्न आहेत की असे वाटते की वास्तविकता एकाच आहे, जिला एकाच प्रकारे सर्व जण अनुभव करतात.

विचार थोडे विस्ताराने प्रकट करतो.

व्यक्तिगत स्तरावर वास्तविकतेच्या जाणिवेची सत्यता त्या व्यक्तिच्या मनांत जे ऐंद्रिय प्रभाव एकत्रित झालेले आहेत त्यावर आधारित आहेत. जरी, ज्या प्रकारे एका व्यक्तिला संसार जाणवतो ती जाण त्याच्या आजूबाजूच्या माणसांत देखील तसेच जाणवते, याला कारण जैविक संरचना सर्वाची सारखीच आहे. त्यामुळेच सर्व व्यक्तिगत संसार एक दुसऱ्याशी जोडलेले आहेत असे जाणवते. या व्यतिरिक्त सर्वांची वेशभूषा,

आचार, विचार, वास्तविक सत्य प्रतीत होते आणि ही भावना सामूहिक भावात अधिक मजबूत होते. तरीदेखील प्रत्येकाची विचार पद्धती व्यक्तिगत व अपूर्व असते. त्यामुळेच व्यक्तिगत संसारासंबंधीची जाणीव देखील अपूर्व असणार. वाचकांनी हे विधान सावधतेने समजण्याचा प्रयत्न करावा. एका व्यक्तिला जे योग्य वाटते ते इतरांना नसू शकते.

हा केवळ लौकिक भ्रम तर नाही ?

आता मी या मुद्याकडे वळतो की मनुष्य कसा वास्तविकतेच्या भ्रामक भावाने प्रभावित होतो. मौलिक शक्ति अशाच प्रकारे कार्य करते की लोकांच्या वास्तविक धारणेला प्रभावित करत राहील. ही शक्तिच या भ्रामक दुनियेला प्रक्षेपित करते आणि तशीच राखण्याला जबाबदार आहे. ज्याला माणूस वास्तविकतेच्या रुपांत पाहतो.

प्रत्यक्षात, हा भ्रामक संसार प्रगाढ निद्रेत अव्यक्त अवस्थेत विलीन होतो आणि जेव्हा व्यक्ति जागी होते. त्यावेळी त्याचे पुननिर्माण होते. जिथ पर्यंत 'सामूहिक संसारा' शी संबंध आहे, हे एका युगात एकदाच विलीन होते, नंतर परत नव्याने त्याचे निर्माण कार्य सुरू होते.

याला अजून विस्ताराने सांगावेसे वाटते.

बाह्य संसार मूलतः आंतरिक संसार, जो मनांत आहे त्याचेच बाह्य प्रक्षेपण आहे. त्यामुळे व्यक्ति दैनिक आधाराने वास्तविकतेला कसे अनुभवतो, हे पूर्णपणे त्याच्या धारणे (इंद्रियां द्वारे निर्माण केली गेलेली) वर अवलंबून आहे - शारीरिक व मानसिक दोन्हीही. ज्या त्या व्यक्तिच्या मनावर प्रतिबिंबित झालेल्या आहेत (या जीवनांत व अनंत पूर्व जन्मात) वाचकांना हे समजावण्याचा प्रयत्न करत आहे की प्रत्येक व्यक्ति अनेक जन्म घेऊन जीवन जगला आहे. व हे रहाट गाडगे तो पर्यंत चालू राहणार जो पर्यंत त्याला आत्मबोध होणार नाही. या प्रकारे बाह्य संसाराचा अनुभव संपूर्णतः त्या व्यक्ति साठी अपूर्व आहे जो तो अनुभवत आहे. या अर्थाने हे तथ्य केवळ त्याच व्यक्तिसाठी वास्तविकता आहे.

उदा. एखादी व्यक्ति दैनिक जीवनात विभिन्न लोकांच्या संपर्कात येऊ शकते. सर्व लोकांचा ज्या व्यक्तिशी संपर्क होतो केवळ एक माध्यम आहे ज्या द्वारे व्यक्ति आपल्या स्वयंच्या व्यक्तिगत बाह्य संसाराला अनुभवतो. या व्यतिरिक्त, बाह्य संचार कोणत्याही रुपांत व्यक्तिला

प्रभावित करू शकत नाही. आपल्या वैचारिक मतानुसार व्यक्तिची प्रतिक्रिया पुन: मनांत आहे त्यावर आधारित आहे, सर्व संस्कार वा धारणा ऐंद्रीय प्रभावाशी संबंधित आहेत. त्यामुळे त्या संसारात कोणतीही व्यक्ति, जे काही त्याच्या संबंधी घडत आहे, त्या साठी अन्य व्यक्तिला दोषी ठरवता येत नाही. हे एक कटुसत्य आहे जे लोकांनी स्वीकारण्याची आवश्यकता आहे. एक माणूस एखाद्या अन्य प्रकारे बनवला गेला नाही. ना एक व्यक्ति दुसऱ्या दुसऱ्याला सहाय्य करू शकतो (जो पर्यंत मौलिक शक्ति द्वारे एका माध्यमाच्या रुपांत कार्य करणे पूर्वनियोजित नसेल) आणि कोणालाही कोणाची आवश्यकता नाही.

मी आशा करतो की वाचक आता सरलतेने बाह्य संसाराच्या भ्रामक प्रवृत्तीला समजू शकेल. हे वास्तविकतेवर आधारित नाही. सृष्टीचे अस्तित्व आमच्या आजूबाजूच्या संसाराचा आधार व्यक्तीच्या स्वंयंच्या आत निहीत आहे, आणि मन व पाच ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून अनंतावर प्रक्षेपित केले जाते. तेंव्हा मनातील विचार इंद्रियांच्या माध्यमातून बाहेर अनंताच्या दिशेने प्रक्षेपित होतात, परिणामी व्यक्तिगत स्तरावर एका संसाराची रचना होते.

व्यक्ती जेंव्हा स्वप्नावस्थेत जाते, एका नव्या संसाराची निर्मिती होते. स्वप्न बदलताच नवीन संसार निर्माण होतो. स्वप्नावस्थेत असेपर्यंत स्वप्नातील संसार तेवढाच वास्तविक असतो जेवढा बाह्य भौतिक संसार. दोन्हीही दुनियेतील प्रवृत्ती एकच असते. प्रत्यक्षात जेंव्हा आम्ही जागृतावस्थेत असतो, आम्ही स्वप्नावस्थेत दुनिये बाबत तील या तथ्याचा स्वीकार करत नाही. आणि केवळ अलौकिक अनुभवाच्या रूपात उपेक्षीत करतो.

व्यक्ति जेंव्हा निद्रावस्थेत जाते, बाह्य संसार जो जागृत वा स्वप्नावस्थेत सत्य रुपांत अस्तित्वात होता पूर्णपणे विलीन होतो. व्यक्तिला निद्रावस्थेत कोणत्याही अस्तित्वाचे कोणतेही भान राहत नाही. निद्रावस्थेत व्यक्तिचा अहंकार पूर्णतः विलीन झालेला असतो. त्यामुळे कोणतेही वेगळ्या अस्तित्वाचा (स्वप्न वा संसाराच्या बाह्य भौतिक

संसाराच्या रुपांत) 'आहं भाव' वा परमेश्वरा पासून वेगळी ओळख, कोणतीच भावना नसते.

व्यक्ति जेंव्हा जाग्रत अवस्थेत परत येते बाह्य संसारची रचना पुन्हा प्रस्थापित होते. परंतु व्यक्तिच्या ज्ञानाच्या स्तरावर कोणताच फरक पडत नाही ज्या ज्ञानासहित व्यक्ति निद्रावस्थेत जातो त्याच त्या संसाराच्या स्मृती सकट परत येतो.

त्याच प्रकारे जेंव्हा व्यक्ति स्वप्नावस्थेतून जाग्रत अवस्थेत येतो, तो स्वप्नातील संसाराच्या स्मृती आपल्या बरोबर घेऊन येतो. परंतु आपण सर्व हळु हळु स्वप्न दुनिया विसरून जातो बरोबर त्याच प्रकारे सर्वजण आपले दैनिक बाह्य जीवन विसरतो. याच कारणामुळे आम्हाला आपले पूर्वायुष्य आठवणीत राहत नाही. जसा जसा काळ सरतो आपल्या सर्व आठवणी अंधुक होत जातात. ही एवढी सरळ बाब आहे.

तर, व्यक्तिगत स्तरावर याच भ्रामक संसाराला सांसारिक भाषेत 'जीवन' म्हटले जाते. त्यामुळे सर्वोच्च मौलिक शक्ति (जी सर्व शक्तिमान वा व्यक्तिगत स्वयं च्या अंतरातील आत्मा मधून बाहेर पडली) ला व्यक्तिगत स्तरावर वा सामुहिक स्तरावर सृष्टी म्हटले जाते. या ठिकाणी मी वाचकांचे लक्ष ब्रम्हांडात प्रकट रुपांत प्रकट मौलिक शक्तिच्या एका महत्त्वपूर्ण अंगाकडे आकर्षित करू इच्छितो. शक्ति कधीही आपल्या मूळ स्त्रोता पासून वा शक्तिमान वा ईश्वर व आत्मा पासून वेगळी होत नाही.

जीवन मुळांत भ्रामक रुपांत (व्यक्तिगत स्तरावर) या शक्तिची अभिव्यक्ति आहे, जी सतत परिवर्तित होत असते. खेळ चित्रपटाच्या पडद्यावर चित्रित होणार ज्या फिल्मच्या प्रक्षेपणा प्रमाणे आहे. परंतु प्रोजेक्टर, प्रकाश आणि पडदा सर्व आंशिक रूपात असतात ज्याची सामूहिक स्तरावर सर्वशक्तिमान प्रतिनिधित्व करतो, आणि व्यक्तिगत स्तरावर आत्मा वा स्व.

संक्षेपांत जेंव्हा गुरु सर्वोच्य मौलिक शक्तिला त्याच्या निष्क्रिय स्थितीच्या उलट दिशेने वळवतो, तो हळू हळू त्याच स्त्रोताच्या दिशेने वाटचाल करू लागतो ज्या प्रकारे या संसाराचे निर्माण कार्य सुरू झाले होते. प्रदीर्घ कालावधीच्या योगाभ्यास केल्यावर व्यक्ति समाधी वा निर्विचार अवस्थेप्रत प्रवेश करू लागतो. पडद्यावर सुरू असलेला चित्रपट

वा जीवन (वा व्यक्तिगत स्तरावरील सृजन) पूर्ववत होते. परिणामी व्यक्तिला स्व वा परमज्ञान प्राप्त होते.

ही शक्ति मानवाच्या सहस्त्रार व मेरुदंडाच्या आधारावर गुद आणि जननांगा च्या मध्ये स्थित आहे.

ही शक्ति एकीकडे (सामूहिक स्तरावर) मानवाच्या मनावर भ्रमाचा संसार प्रक्षेपित करते तर दुसरीकडे व्यक्ति आणि मानसिकतेवर. सर्व शक्तिमान स्वयं ला 'ब्रम्हांडाचा स्वामी' च्या रुपांत विचार करत असेल. बरोबर त्याच प्रकारे मानव विचार करतो कारठा तो आपल्या शरीराचा मालक आहे. सर्वोत्तम मौलिक शक्तिच्या भ्रामक प्रभावामुळे ईश्वराला बऱ्याच संस्कृत ग्रंथात 'ब्रम्हांडाचा स्वामी' वा जगन्नाथ म्हटले जाते. हेच कारण असावे की या शक्तिला संस्कृत ग्रंथात सामान्यतः 'भव्य लौकिक भ्रम' वा महामाया असे संबोधले जाते. त्यामुळे मी ब्रम्हांडाच्या या सर्वोच्च मातेला विनम्र नमस्कारा सहित 'भगवंताची अज्ञात शक्ति' (द पावर अननोन तो गॉड) नामकरण करून आपली श्रद्धा अर्पित केली.

मानव मूळतः सर्वशक्तिमान वा ब्रम्हांडाचे एक लघु प्रतिरूप आहे. या दृष्टीने पाहिले तर हा सर्व शक्ति मानाचा सर्वोच्च ज्ञानवती ब्रम्हांडीय शक्तिचा खेळ आहे. हा संपूर्ण खेळ स्वतः स्वयं परमत्म्यानेच घडवला. याच कारणामुळे दिव्य शक्तिच्या प्रकृतीला समजणे तसेच अत्माबोधाची अवस्था प्राप्त करणे फार कठीण आहे.

प्रथमतः ही सर्वोच्य शक्ति ईश्वरापासून निर्माण होऊन सामूहिक ब्रम्हांड निर्माण करते; नंतर ईश्वर मानवाच्या अनेकविध रुपांत प्रकट होतो; पुढे ईश्वराची ती सर्वोच्य शक्ति व्यक्तिगत स्तरावर सर्व मानवांचे अंतरात अनंत संसार निर्माण करते. सृष्टीतील हे विभिन्न स्तर अशाप्रकारे एकमेकांशी जुडलेले आहेत. असे वाटते की हे सर्व वास्तव आहे परंतु हा संपूर्ण भ्रम आहे. ही सर्वोच्य शक्ति अनेक देवता निर्माण करते आणि या विशाल अनंत ब्रम्हांडात वेग वेगळया कार्याचे उत्तर दायित्व त्यांच्यावर सोपवते. सरते शेवटी ही सर्वोच्य शक्ति (संस्कृत ग्रंथानुसार) या अनंत ब्रम्हांडाच्या खोलवरील अंतरात या सर्व सांसारिक प्रपंच्या पासून दूर 'आनंद सागर ला' वेढलेल्या मणिद्वीप वा रत्नजडित टापूत निवास करते.

वरील विधानाचा काय बोध झाला ? समजण्यास कठीण असले तरी आत्मबोध सैद्धांतिक रुपांत कधीही कोणत्याही क्षणी होऊ शकतो. आत्मबोधाचा हा परिणाम आहे की सर्वोच्य ज्ञानवती शक्तिच्या वास्तविक प्रकृतीचे ज्ञान होणे.

ही शक्ति अंतरिक्ष आहेत. शक्ति काळ आहे. हीच जीवन शक्ति आहे. ते एक परम सत्य आहे परम चेतन आहे. हीच शक्ति मन आहे परम आनंद आहे. तीच बुद्धि व तोच अहंकार. ती प्रेम आहे. माझी विनम्रता आहे. शक्ति माझा श्वास आहे.

त्या शक्तिला माझे शतशत प्रणाम.

ही शक्ति रहस्यमयी आहे. अंततः शक्ति अपार आहे.

मानवात शक्ति सहस्रारात असते मेरुदंडाच्या माध्यमात खाली उतरून मुलाधारात विश्राम करते.

याला कुंडलिनी म्हटले गेले आहे. ती चक्राकार आहे.

गुरु जेंव्हा व्यक्तिगत या शक्ति बरोबर हस्तक्षेप करतात तेव्हा प्रवास उलट दिशेने सुरू होतो व मनोनाशाच्या दिशेने वाटचाल सुरू होते, परिणाम स्वरूप आत्मबोध होतो. मानवाचे दिव्यते बरोबर मिलन होते. जस जशी शक्ति व्यक्तिच्या सहस्त्राराच्या दिशेने आरोहण करते, मनाला उच्च पासून उच्चतर स्तरावर घेऊन जाते.

ही शक्ति कशा प्रकारे विपरीत दिशेने व्यक्तिला अमरतेकडे घेऊन जाते त्याला योग म्हटले आहे.

शक्तिपात

शक्तिपात शब्दाचा मुलार्थ शक्तिचे अवतरण. ही मुख्यत्वे मानवी शरीरात निष्क्रिय ब्रम्हांडीय शक्तिच्या जागृती साठी शक्तिपात पद्धतीचा प्रयोग करण्याची पद्धती आहे.

शक्तिपात ची प्रक्रिया कोण करू शकते ?

आणि ती प्रक्रिया कोणावर केली जाते ?

शक्तिपात प्रक्रिया केल्यावर काय घडते ?

हे प्रश्न त्या सामान्य वाचकांसाठी आहेत जे या विषयाशी परिचित नाहीत, त्यांच्या माहितीसाठी थोडक्यात सांगतो.

गुरु वा योग्य शिक्षक ज्या व्यक्तिवर आपली कृपा करण्याचा निर्णय घेतात त्यावर शक्तिपात प्रक्रिया करतात.

परंतु कोणत्याही गुरुला एखाद्या व्यक्तिवर शक्तिपात प्रक्रिया करण्यासाठी बाध्य करता येत नाही. कारण एकमेव गुरुच, शुध्दत्व प्राप्त मानवाच्या रुपांत सर्वोच्च दिव्य शक्तिची अभिव्यक्ति आहे. त्यामुळेच त्यांना बाध्य केले तर प्रक्रिया कामास येत नाही.

या विषयी जरा विस्ताराने समजावतो.

तांत्रिक रूपात एखादा गुरु मानव रुपांत असू शकतो. कारण, हे पूर्वनिर्धारित आहे की मानवतेच्या लाभार्थ पृथ्वीवर दिव्यतेचा आधार

असतात. गुरु मुख्यत्वे मानवाच्या मुक्तीसाठी परमेश्वरा तर्फे दिलेला एक उपाय आहे. जरी, तांत्रिक कारणामुळे (योगाच्या दृष्टीने) गुरुला योगाच्या नियमांतर्गत रहावे लागेल जेणेकरून तो मानवाच्या रुपांत अस्तित्वात असेल. अशा परिस्थितीत गुरुला शक्तिपात प्रक्रिया करण्यास जबरदस्ती केली गेली तर, परम दिव्यता स्वत:च त्याची स्वीकृती देणार नाही. या व्यतिरिक्त सर्व योग ग्रंथ एकमताने घोषित करतात की शक्तिसंपन्न, शिक्षक वा गुरु काही विशेष अधिकार संपन्न असतात.

वाचक उत्सुक असतील की मला गुरुच्या विशेष अधिकारांविषयी काय म्हणायचे आहे ?

सर्व ग्रंथानुसार केवळ गुरुच स्वतः परम दिव्यातेच्या प्रकोपा पासून व्यक्तिला वाचवू शकतो. स्वयं परमेश्वराने अनादी कालापासून एकमेव गुरुलाच हा विशेषाधिकार दिला आहे.

परंतु, ईश्वर वा सर्व शक्तिमान वा परम दिव्यता व्यक्तिला गुरुच्या प्रकोपा पासून वाचवू शकत नाही. तरीसुद्धा सर्व योग ग्रंथानुसार केवळ गुरुलाच हा विशेषाधिकार स्वतः परम दिव्यतेने अनादी कालापासून दिलेला आहे.

भगवंताला उल्लू बनवता येत नाही कारण त्याचेच पूर्ण अस्तित्व या ब्रम्हांडात एकमेव परम सत्य आहे, ना की अहंकाराने रंगलेली स्वतंत्र मानवी इच्छा. दिव्य स्वतंत्र इच्छा निश्चितच आहे जर ती अहंकाराने रंगलेली नसेल. जेव्हा ती अहंकाराने रंगते ती अंती एक भ्रम सिद्ध होते.

जेंव्हा कोणी गुरु एखाद्या व्यक्तिवर शक्तिपात प्रक्रिया करतात, ज्यावर आपली कृपा वर्षा करतात (वा परमेश्वर कृपा वर्षाव करण्याचा निर्णय घेतो) तेव्हा गुरु प्रत्यक्षात एक मानव रुपात सर्व शक्तिमानासाठी माध्यमाच्या रुपांत कार्य करत असतात. गुरु व्यक्तिवर आपली शक्ति स्थानंतर करतात आणि निष्क्रिय परम शक्ति मध्ये हस्तक्षेप करतात, हा सुद्धा भिन्न रुपांत प्रकट झालेला सर्व शक्तिमानाचा स्व आहे.

उत्पत्ती व नाश करणे हे पूर्णतः एकमेव स्वयं शक्ति मनाच्या अधिकारात आहे. सांसारिक शब्दावली, शब्द प्रयोग त्या दिव्यतेला कोणतेही नाव देऊ शकता. काही धर्मात सर्व शक्तिमानची पूजा पुरुष, प्रेमी, पिता रुपांत केली जाते. काही धर्मानुसार परम दिव्यातेची पूजा

महिला रुपांत मातेच्या रुपात केली जाते. आधुनिक वैज्ञानिकांविषयी मला माहीत नाही ते दिव्यातेचा उल्लेख शक्तिच्या चेतना रहित रुपांत करत असतील.

त्यामुळे जेंव्हा गुरु प्रतिप्रसव प्रणाली द्वारे उलट्या प्रक्रिये साठी मौलिक शक्ति मध्ये हस्तक्षेप करतात तेव्हा ते स्पर्श, शब्द वा दृष्टी द्वारा वा एखाद्या मंत्राच्या माध्यमातून स्वतःच्या दिव्य स्वतंत्र इच्छेद्वारा करतात. कधी कधी गुरु आवश्यकते नुसार एक वा दोन तंत्रांचा प्रयोग करू शकतात.

आता मी, हा प्रयोग कोणावर केला जातो यावर प्रकाश टाकतो.

प्रत्येक मनुष्य परमेश्वराच्या या कृपेस पात्र आहे का ? होय नक्कीच. धर्म, जाति, पंथ यांचा कोणताही अडथळा नाही. परमेश्वर कधीही कोणावरही कृपा वर्षा करू शकतो. या तथ्याशी सहमत होण्यासाठी विशेष तर्काची आवश्यकता नाही.

अशा परिस्थितीत परमेश्वर आपला कृपा प्रसाद सर्वांवर का प्रकट करत नाही आणि त्यांना जन्म मृत्यूच्या फे-्यातून का सोडवत नाही ?

यापेक्षा अधिक महत्त्वपूर्ण बाब अशी की परमेश्वर असे का करू इच्छितो ?

परमेश्वराने आपल्या दिव्य स्वतंत्र इच्छेचा प्रयोग करून गुरूंना मानव रुपांत प्रकट केले आहे. मानवाने परमेश्वरी इच्छे विरुद्ध आपल्या सांसारिक स्वतंत्र इच्छेचा उपयोग करण्याचा प्रश्न उठतोच कुठे ?

परमेश्वराचे अस्तित्व त्याच्याहून वेगळे आहे का ?

मानवाला या मूलभूत प्रश्नांचा स्वीकार करण्याची आवश्यकता आहे. समजा आपण जेव्हा आपल्या मनोरंजनासाठी एखादे खेळणे बनवतो आणि त्यात काही वैशिष्ठय निर्माण करता तरीसुद्धा त्याला काही नियमांच्या आधीन ठेवता. खेळण्याला तुम्हाला काही प्रश्न विचारण्याचा मूलभूत अधिकार नसतो. त्या खेळण्याचे अस्तित्व आणि तुम्ही स्वतः एकच आहात. तुमच्याशिवाय खेळण्याला काही अस्तित्व नाही जरी खेळण्याला त्याच्या स्वतःची वास्तविक प्रकृती समजण्याची क्षमता प्रदान केली आहे, ज्याला आम्ही आत्मबोध म्हणतो.

परमेश्वराने मानवाची रचना याच प्रकारे केली आहे. दिव्य मनोरंजनासाठी एक खेळणे. त्यामुळे एखादे खेळणे वा या संदर्भात एखाद्या

मानवाला सांसारिक स्वतंत्र इच्छेचा उपयोगाचा प्रश्न कुठे उरतो ?

मानवाजवळ जी स्वतंत्र इच्छा आहे ती परम सत्यात परिवर्तित होते. जेंव्हा मानव अहंकाराच्या कोणत्याही अंशात्मक मानसिक रुपा पासून विलग होण्याच्या नात्याने मानव म्हणून शिल्लक राहत नाही. अर्थात जेंव्हा आत्मबोध होतो तेव्हा. स्वतंत्र इच्छेची क्षमता अहंकाराच्या रूपात परिवर्तित होत नाही.

प्रत्येक मनुष्य परमेश्वराचेच अवतरण आहे. प्रत्यक्षात ती दिव्यता त्याच्या हृदयांत आहेच. त्यामुळेच दिव्य स्वतंत्र इच्छा मनाच्या माध्यमाद्वारे प्रकट होण्याचा प्रयत्न करते जरी अहंकाराने रंगलेली असली तरी.

हा समजून घेण्याचा एक महत्त्वपूर्ण विषय आहे.

स्वतंत्र इच्छा भ्रांतिमूलक असून सर्व शक्तिशाली समजली जाते, आणि सर्व मानव समाज क्षुद्र सांसारिक लाभासाठी (अहंकाराने रंगून) स्वतंत्र इच्छेचा प्रयोग करण्यावर जोर देतो. ना कोणी विचार करत न कोणाला इच्छा होते की त्याच्या स्वतःच्या अस्तित्वाविषयी जाणून घ्यावे की त्याची प्रकृती परिपूर्ण आहे की भ्रामक ?

कोणीही या स्वातंत्र्याच्या खोट्या भावनेतून बाहेर पडण्यास तयार नाही जी स्वतंत्र इच्छेच्या भ्रमाने पछाडली आहे. स्वतंत्र इच्छा निश्चितच संपूर्ण सत्य आहे, परंतु केवळ त्या समिकरणातून अहंकाराला बाहेर काढले असेल तर, तो पर्यंत तरी तो केवळ भ्रम आहे.

त्यामुळे एखादा माणूस परमेश्वराला हा प्रश्न विचारू शकत नाही की त्याची कृपा सर्वांवर का केली जात नाही. याच कारणामुळे गुरुला सुद्धा शक्तिपात प्रक्रियेसाठी बाध्य केले जाऊ शकत नाही.

मी आशा करतो की वाचक वरील परिच्छेदात जे लिहिले गेले आहे ते थोड्या प्रमाणात समजत असतील.

संस्कृत शास्त्रानुसार असे म्हटले जाते की जेंव्हा शिष्य तयार होतो तेंव्हा गुरु वा परमेश्वर लगेच प्रकट होतो.

हा एक प्राकृतीक लौकिक सिद्धांत आहे असे वाटते.

या विषयावर कोणतीही सांसारिक तर्कसंगत व्याख्या करता येणार नाही. याचा विचार करा वा सोडून द्या.

याविषयी मी अधिक चर्चा करू इच्छित नाही. माणसाची स्वतंत्र

इच्छा, जी अहंकाराने परिपूर्ण आहे, प्रत्येकाला कायमस्वरूपी कोणत्याही प्रयोगासाठी उपलब्ध आहे.

आता मी एखाद्या व्यक्तिमध्ये विश्वास निर्माण करण्याकडे ध्यान आकर्षित करू इच्छितो. बऱ्याच गोष्टी आहेत की आपण तशाच स्वीकारतो. आपण मानतो पाण्याने माझी तहान भागेल. भोजनाने माझी भूक मिटेल. अग्नीने ऊब उत्पन्न होईल इत्यादी. कधी कधी विश्वास प्रायोगिक सत्य स्थापित झाल्यावर होतो; आणि कधी कधी अंर्तज्ञाना मुळे. हा जो विश्वास आहे तो भले ही तार्किक वा तर्कहीन असू दे, जीवनाचा आधार आहे. असे बरेच अवसर असतीलही जे विश्वासाला प्रयोगाने सत्य प्रमाणीत केले जाऊ शकत नाही. जसे की मातेची आपल्या अपत्या-विषयीची आस्था, वा युद्ध भूमीवर प्रवेश करण्यापूर्वी एका सैनिकाचा विश्वास.

साधारणतः एखाद्या व्यक्तिच्या बौद्धिक पात्रतेवर आधारित शक्तिपाताद्वारे दीक्षा प्राप्त करण्यास पुरेसे असते. ज्यावेळी व्यक्ति परम दिव्यते प्रती पुरेसा विश्वास प्रकट करतो त्याला दीक्षा दिली जाऊ शकते.

विषयाला विस्ताराने समजावतो.

योग ग्रंथानुसार प्रत्येक मानवाचे मन तीन गुणांचे मिश्रणाने बनले आहे.

हे तीन गुण रजोगुण, तमोगुण आणि सत्वगुण.

रजोगुणांत गतिशीलता आहे. तामस सुस्त आणि सात्विक संतुलन आहे.

सर्व स्वरूपांचे सृजन राजस गुणामुळे होते, स्वरूपांचे विनाश तामस गुणामुळे आणि सर्व रूपांचे सातत्य वा जीवनाधार सात्विक गुणांमुळे संभवतो.

प्रत्येक मानवाचे मन दिव्य मौलिक शक्तिच्या या तीन गुणांवर आधारित एक अद्वितीय रुप संरचित आहे.

या व्यतिरिक्त, व्यक्तिमध्ये या योजनेत देखील सतत परिवर्तन होत असते. जे मनातील विचार व भावनांमध्ये विभिन्न संशोधनांना जन्म देते. ज्यावेळी हे तीनही गुण साम्यावस्थेत असतात, व्यक्ति वैश्विक शक्तिच्या बंधनावर विजय प्राप्त करून घेतो. तो मनाच्या एका शांत वा निर्विचार अवस्थेत प्रवेश करतो.

अशा परिस्थितीत सैद्धांतिक रुपांत आत्मबोध होणे शक्य आहे.

साधारण मानवात, संतुलनाची ही स्थिती त्याच्या जीवनात अनेक वेळा येते. परंतु ही फारच अल्प काळ असते आणि जेंव्हा घडते तेव्हा मनुष्य त्याला ओळखू शकत नाही. जसे एखाद्या निर्धनाने हिरा पाहिला नसल्याने त्याचे मूल्य जाणू शकत नाही - त्याच प्रमाणे आत्मबोधाची देखील प्राप्ती अकस्मात होत नाही.

आता मी व्यक्तिच्या मनाच्या तीन गुणांच्या विशेष रचनेकडे परत येतो.

एखाद्या क्रमिक धार्मिक उपक्रमाच्या अभ्यासाने वा योगाच्या प्रयोगाच्या सततच्या प्रयत्नाने मन हळू हळू संतुलित अवस्थेप्रत स्थिरता प्राप्त करते. जरी ती पूर्णतः स्थिर नसली तरी. कारण व्यक्तिगत मन सदा आंदोलित अवस्थेत झुलत असते.

मनाची ही अव्यवस्थित अवस्था बाह्य जगात वा दैनिक जीवनांत व्यक्ति द्वारे केलेल्या कार्यामधून प्रकट होते.

वाचक अशा प्रकारच्या व्यक्तिच्या चरित्राची कल्पना करू शकते का ?

प्रत्येक चांगल्या कामाबरोबर, व्यक्ति एक चुकीचे काम करतो. यामुळे गुण व अवगुणांत एक संतुलन निर्माण होते. प्रत्येक संचित पापासाठी, बरोबरीने पुण्याचा संग्रह होतो. परिणामस्वरूप त्या व्यक्तिचे चरित्र संत - त्याच बरोबर - पापी सारखे विकास पाऊ लागते. या प्रकारची व्यक्ति जास्त भरकटत नाही तसेच चांगल्या वा चुकीच्या मार्गावर जात नाही. व्यक्ति सतत आपल्या संतुलित अवस्थेच्या दिशेने संघर्ष करतो. जरी तो ते प्राप्त करू शकत नाही.

या प्रकारची व्यक्ति जसे कसे जमेल त्या परिस्थितीत राहण्यात सफल होते त्यामुळे ती व्यक्ति सर्व शक्तिमानाच्या मनोरंजनासाठी उपयुक्त ठरत नाही.

व्यक्ति एखाद्या लहान बालका समान रुसतो. परमेश्वरा वर प्रेमा सहित विश्वास ही शक्तिपात दीक्षेसाठी एक आवश्यक, तरी अनिवार्य घटक आहे. या बिंदूवर गुरु वा परम दिव्यता आकांक्षी समोर प्रकट होते. व्यक्तितील कुंलडलिनी शक्ति कार्यशील होते, आणि व्यक्तिगत स्तरावर सृजन त्याच शक्ति द्वारे पूर्ववत होण्यासाठी पूर्णरूपेण तयार होते ज्यानी

त्याला निर्माण केले होते.

आता पुढचा प्रश्न शक्तिपात कशा प्रकारे कार्यान्वित होते ?

ज्याप्रकारे माझ्या गुरुजींनी त्याची व्याख्या केली, ती चार लोकप्रिय क्रियांच्या माध्यमाद्वारे केली जाते ते असे: स्पर्श, दृष्टी, दिव्य स्वतंत्र इच्छा प्रयोग वा एखाद्या मंत्राच्या माध्यमातून केले जाते. यदा कदा जरूर पडल्यास या तंत्राचे संयोजन करून गुरुद्वारे केले जाऊ शकते.

शक्तिपात गुप्त पद्धतीचा संक्षिप्त इतिहास

भारतात शक्तिपात पद्धती फार प्राचीन काळापासून प्रचलित आहे. योग वसिष्ठ मध्ये - एक प्राचीन शास्त्र भगवान श्री रामांवर त्यांचे गुरु वशिष्ठ द्वारा शक्तिपात केला गेला होता. भगवान श्रीराम भारतातील प्राचीन राज्याचे राजकुमार होते. त्यांना व्यापक रुपांत ईश्वरी अवतार मानले जाते. ही पद्धती बहुदा सत् युगापासून अज्ञात अवस्थेत तेव्हापासून होती. असे म्हणता येईल की भगवान श्री रामाच्या काळा अगोदरही अस्तित्वात असावी.

वाचक जस-जसे हे पुस्तक वाचतील संभवता त्यांना यामागील गोपनीयतेचे कारण समजेल.

सर्व दूर असा समज आहे की ही पद्धती दर सहाशे वर्षांच्या काळानंतर गुप्त आणि सार्वजनिक रुपांत प्रकट होते.

संन्यासांच्या वंशातील आदी कडी एक योगिनी होती. जी जवळजवळ सातशे वर्षांपूर्वी जम्मू-काश्मीर राज्यातील आधुनिक श्रीनगर शहरांत 'पदमानपुर' नामक गावात राहत होती. हे गाव सध्या शहराच्या बाहेरचा भाग आहे. त्याला 'पामपोर' म्हटले जाते.

ती महन योगिनी फाटक्या कपड्यात शहरात फिरत असे. त्यांना लाल देवी/दय्द , लल्लेश्वरी आणि लल्ला नावाने संबोधले जात असे.

वाचकांना वर्ल्ड वाईड वेब वर या महान योगीनीचे विचार

वाचायला उपलब्ध आहेत. आधुनिक काळांत त्यांना 'लाल दय्द' नावाने ओळखले जाते.

आदरणीय स्वामिनी चा शक्तिपाताशी सबंध या पद्धतीचा वारसदार म्हणून सांगितले जाते. त्यांच्या कालापासून पुढची सहाशे वर्ष शक्तिपात पद्धतीचे काय झाले ते अज्ञात आहे. मधल्या काळातील फक्त तीन योगी व योग साधकांची थोडीफार माहिती उपलब्ध आहे. स्वामी परमानंद, त्रिलोकी बाबा आणि स्वामी मुकुदानंद. मी यांच्या विषयी काहीही लिहिण्यास असमर्थ आहे.

येथे वाचकांना आठवण करून देऊ इच्छितो की मी योग्यांच्या विषयी लिहित आहे. योगी धार्मिक विद्वानापेक्षा निराळे असतात. अन्य संत वा स्वामी पेक्षा वेगळे. आश्रम वा परंपरेचे अवडंबर नसलेले, हा एक वेगळाच वर्ग आहे. प्राचीन संस्कृत ग्रंथानुसार ते भगवान व देवतांपेक्षा महान असतात. ही मंडळी मनुष्यरूपातील दिव्यत्वाची शुद्ध अभिव्यक्ति आहे. त्यांची आध्यात्मिक पातळी अजोड असते. वास्तवात त्यांची अलौकिक शक्ति एवढ्या उंचीची असते की इच्छा झाल्यास या ब्रम्हांडाच्या तोडीचे दुसरे ब्रम्हांड निर्माण करू शकतात. त्यामुळेच सांसारिक विषयांचा त्यांच्यावर कोणताही प्रभाव पडत नाही

सद्यस्थितीत शक्तिपात योग पद्धती महान योगी साधक, स्वामी गंगाधर तीर्थांमुळे प्रकाशात आली. जे शंभर वर्षापूर्वी त्या काळातील ओरिसा राज्य जे, आजचे 'पुरी' नावाने ओळखले जाते, राहत असत. त्यांनी फक्त एक वा दोनच दीक्षा दिल्याची माहिती मिळते.

स्वामी नारायण देव तीर्थ या योग प्रणालीचे दीक्षा प्राप्त केलेले एकमेव साधक होते. हे योगी आजच्या बंगला देशात जन्माला आले. आदरणीय स्वामीजींनी नंतरच्या काळातील तिसऱ्या पिढीला या परंपरेत दीक्षित केले.

साधकांच्या तिसऱ्या पिढीने चौथ्या पिढीची सुरुवात, आपल्या स्वतःच्या वंशात दीक्षित करण्यास सुरुवात केली. मी ज्या योगाची माहिती गोळा करू शकलो त्यांची पूर्ण वंशावळ तसेच या पद्धतीतील विभिन्न आश्रमांची सूची (ज्यांचा ठावठिकाणा समजू शकलो) पुस्तकाच्या अंती दिलेली आहे.

योग्यांच्या संपूर्ण वंष वृक्षाची माहिती देणे संभव नसल्याने या विषयी एकाच वंशावळीवर लक्ष केंद्रित करतो - हे महान योगी जे तिसऱ्या पिढीतले होते त्यांचे नाव योगानंद तीर्थ. त्यांचा जन्म गुजरात राज्यातील 'जुनागड' नामक स्थानी झाला. आदरणीय स्वामीजींनी सिद्ध महा योगांत बऱ्याच साधकांना दीक्षित केले. त्यांच्याही वंशावळी बाबत लिहिणे संभव नसल्याने, एका विशिष्ट वंशावळीकडे मी लक्ष आकर्षित करतो. चौथ्या पिढीचे जनक स्वामी विष्णुतीर्थ महाराज या नावाने संबोधले जातात.

योग्यांच्या चौथ्या पिढीच्या वर्णना अगोदर तिसऱ्या पिढीतील स्वामी योगानंद विषयी काही लिहू इच्छितो. आपल्या प्रणालीतील इतर संन्याशा प्रमाणे भगवी वस्त्र धारण करणे व सांसारिक जीवनाचा त्याग करणे, याला नकार दिला. अश्या ठिकाणी जीवनाचा या विशेष पैलू बद्दल लक्ष केंद्रित करतो.

योग्यांचे दोन प्रकार आहेत.

त्यांच्यातील अधिक तर सामान्य सांसारिक जीवनाचा त्याग करून भगवे कपडे धारण करून दुर्गम स्थानी निवास करून समाजापासून वेगळे राहतात. ही मंडळी सर्व ऐंद्रीय प्रभावापासून आपल्या मनाला निर्लिप्त ठेवण्यावर भर देतात ज्यामुळे त्यांना समाधी अवस्था वा विचार विहीन अवस्था प्राप्त करता येईल.

त्यांचे तप-सामर्थ्य एक शक्तिशाली कंपन उत्पन्न करते जे सकारात्मक रूपात संसाराला प्रभावित करते. ही स्पंदने, मानव समाज, प्राणिमात्र तसेच पर्यावरणावर देखील शांती व सद्भाव निर्माण करतात. थोडक्यात हा संसार फारच सूक्ष्म आणि अमूर्त स्वरुपात त्यांच्या योगाभ्यासामुळे लाभान्वित होतो.

ते बाह्य संसाराचा त्याग करून आंतरिक संसारावर पूर्णपणे ध्यान केंद्रित करण्यात सफल झाले. ते निर्विचार अवस्था प्राप्त करण्यासाठी आपल्या बुद्धि शी संघर्ष करतात जे सर्वच योग प्रकारांचे अंतिम ध्येय आहे.

प्रत्यक्षात, बरेच योगी सांसारिक जीवनाकर्षणामुळे व मानसिक संकल्पाच्या अभावी या संघर्षात विफल झाले. परिणामी त्यांना त्यांच्या सामान्य नियमित जीवनशैलीकडे परतावे लागले. त्यामुळे त्यांना गंभीर आध्यात्मिक नुकसान झाले. पथभ्रष्ट योग्यासाठी कोणतेही प्रायश्चित्त व

सुधारात्मक उपाय, तंत्र धार्मिक संदर्भात उपलब्ध नाही. विशेषज्ञांच्या रुपांत प्राचीन ग्रंथ शास्त्रात - भले ताकिर्क वा तर्कहीन वाटो-पथभ्रष्ट योग्याला योगाच्या मूळ पथावर परत येण्यासाठी बराच काल घालवावा लागतो. या भीतीमुळे काही योगीजन समाजात राहून योग साधना करणे पसंत करतात. मानसिक रूपात तरी हा प्रयोग अश्वस्थ करतो की ह्या प्रकारच्या योग मार्गात भरकटण्याची कोणतीही भीती नाही.

प्रश्न हा आहे की याला कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले जावे !

खालच्या पातळीवरील योगी, मनाच्या दुर्बल संकल्पामुळे पथभ्रष्ट होतात. परिणामी सांसारिक वस्तूच्या आकर्षणात अडकतात जरी त्यांनी, मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन, बाह्य सांसारिक जीवनाचा त्याग करून, भगवे वस्त्र परिधान केले आणि समाजापासून दूर राहिले. योगात प्रगती करण्याच्या उद्दिष्टाला प्राप्त करणे सोपे व्हायला हवे होते.

दुसऱ्या पायरीवर योगी समाजाच्या मुख्य धारेपासून अलग होण्यास नकार देतात. परंतु, आता त्यांच्यासमोर सर्वात मोठे आव्हान हे असते की सहज प्राप्त आकर्षणात अडकू नये. तथापि या ठिकाणचा सर्वात मोठा फायदा हा आहे की, योगी आपल्या कर्मां विषयी कोणत्याही भावनात्मक संघर्षाशिवाय शारीरिक रुपांत पूर्वजन्म कृत फलाचा स्वीकार करून आपल्या संचित गुण दोषांचा हिशोब चुकता करण्यासाठी एक सुयोग्य अवसर प्राप्त होतो.

पहिल्या बाबतीत, योगी समाजाच्या मुख्य धारेपासून दूर राहतो व केवळ आपल्या योगाभ्यासाच्या माध्यमाद्वारे आपल्या संचित कर्मांचा हिशोब बरोबर करतो.

दुसऱ्या बाबतीत जरी योगी शारीरिक रूपात समाजात राहून आपल्या पूर्व कर्माचे परिणाम अनुभवतो आहे, तरीही योग्याला योगाचा साधक संबोधले जाते. तर योग साधने संदर्भात, याने काही फरक पडत नाही की योगी समाजापासून दूर वा मुख्य धारेच्या जवळ आहे. ध्येय हे आहे की स्थायी रूपातील परिवर्तित अवस्था वा साधन पद्धतीने काही फरक पडत नाही.

योगाभ्यास करणे एक वेगळी बाब आहे तर सांसारिक जीवनाचा

त्याग करून भगवे कपडे घालुन जंगलात राहणे वेगळी. हे आवश्यक नाही की भगवे कपडे धारण केलेली सगळी मंडळी योगी असतील. एकीकडे मन सांसारिक सुख आणि दाही दिशांना भरकटत असेल तर केवळ जंगल वा भगवे कपडे व्यक्तिला वाचवू शकत नाही. ते केवळ एक साधन वा माध्यमाचे काम पार पडतील. या शिवाय ही बाब योगाभ्यासाच्या मार्गावर असलेल्या व्यक्तिसाठी एक आवश्यकता रूपात अपेक्षित नाही.

या कारणा मुळेच मी म्हटले होते की हे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले जाते !

दोन्ही बाबतीत आपापले लाभ-हानी आहे. आता वास्तवात हे सांगता येणार नाही की कोणती साधन पद्धती श्रेष्ठ आहे.

संभवता नियति स्वतःच योग्याच्या जीवन निर्वाहाचा निर्णय घेते.

तर, स्वामी योगानंद महाराज असे योगी होते, ज्यांनी स्वेच्छेने वैराग्य पथ निवडला नव्हता.

मी आता चौथ्या पिढीतील स्वामी विष्णुतीर्थ महाराजांच्या वंशाकडे वळतो.

या योगिजींचा जन्म भिवानी शहरा जवळ जज्जर नामक गावात झाला. हे स्थान भारतात आजच्या हरियाणा राज्यात आहे. आदरणीय स्वामीजी पेशाने वकील होते. आणि स्वामी योगानंद तीर्थ द्वारा सिद्ध महायोग मार्गात दीक्षित केले गेले.

परमपूज्य स्वामीजिनी मध्यप्रदेशातील आजच्या देवास शहरात आजचा विद्यामान आश्रम स्थापन केला. हा आश्रम 'नारायण कुटी संन्यास आश्रम' या नावाने ओळखला जातो.

परम पूज्य स्वामीजींनी नंतर आजच्या ऋषिकेश शहरांत गंगा नदीच्या तटी आणखी एक आश्रम निर्माण केला. हा आश्रम 'योग श्री पीठ' या नावाने ओळखला जातो.

परमपूज्य स्वामीजिंनी या सिद्ध योग प्रणाली विषयी बरेच साहित्य प्रकाशित केले. अशाप्रकारे आधुनिक इतिहासात या प्रणालीला लोकप्रिय बनवण्याचे पहिले प्रणेते मानता येईल.

परम पूज्य स्वामींनी बऱ्याच साधकांना दीक्षित केले व त्यांचे जाळे सर्व देशभर पसरले आहे.

आता पुढची पाचवी पिढी. स्वामी शिवोम तीर्थ महाराजांचे

त्याचे आद्य प्रवर्तक होत. त्यांच्या विषयी काही प्रकाश टाकतो.

त्या योगी महाराजांचा जन्म पंजाब राज्यात आजच्या लाहौर शहरी पाकिस्तानात झाला. परमपूज्य स्वामीजिनी हिंदी भाषेत बरीच पुस्तके लिहिली आणि योग प्रणालीला व्यापक व लोकप्रिय करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. या पुस्तकांचा बऱ्याच भाषांमध्ये भाषांतर केले गेले.

पूज्य स्वामीजींना स्वामी विष्णु तीर्थ महाराजांनी नारायण कुटी आश्रमाचा कार्यभार सोपवला.

स्वामीजिंनी ह्या योग प्रणालीत अनेक साधक तसेच माझे गुरु स्वामी सहजानंद तीर्थ महाराजांना दीक्षित केले. ते भारतात, आंध्रप्रदेशात आजच्या विजयवाडा शहरी राहतात. ते स्वामी शिवोम तीर्थजी महाराज यांच्या आधीन साधकांतील एक आहेत.

स्वामी गंगाधर तीर्थापासून सुरु झालेली ही सहावी पिढी आहे.

क्रिया

माझे स्वतःचे अनुभव कथन करण्याअगोदर या शब्दाचा अर्थ समजावण्याचा प्रयत्न करतो. अन्यथा जे वाचक या प्रकारच्या योग प्रणालीशी परिचित नाहीत त्यांना हे समजणे कठीण होऊ शकेल.

जे वाचक या प्रणालीशी परिचित आहेत त्यांना देखील मदत मिळू शकते, कारण शरीर वा मन आणि बाह्य दैनिक जीवन यातील प्रतिक्रिया प्रत्येक व्यक्तिच्या चारित्र्यावर अनेक प्रकारे विकसित होतात.

क्रिया व्यक्तिच्या चारित्र्यावर का अवलंबून असतात हे समजण्यासाठी प्रथमत: हे समजणे आवश्यक आहे की व्यक्तिचे चारित्र्य कसे निर्माण होते. असे म्हटले जाते की प्रत्येक मनुष्य सतत शारीरिक इंद्रियांच्या माध्यमातून या सांसारिक जीवनाला अनुभवत असतो. त्याचा परिणाम मनावर इंद्रियांच्या द्वारे होत असतो. हाच अहंकाराने रंगलेला ऐंद्रीया प्रभाव ज्याला योग प्रणालीत कर्म म्हटले जाते, कारण हेच व्यक्तिच्या भविष्याची निर्मिती करतात. आणि अशा प्रकारे क्रियमाणाच्या गाडीला चालवत असतात. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल कर्म अहंकाराने रंगलेल्या व्यक्तिचे पहिल्या कार्यांमुळे (शारीरिक आणि मानसिक दोन्ही) दुसरे कर्म निर्माण होते. कर्म सांसारिक दृष्टीतून चांगले वा वाईट असू शकते. कर्म आगामी प्रतिक्रियांचे कारण होते, या प्रकारे व्यक्तिचे

भाग्य निर्मित होते.

तर, एखाद्या विशिष्ट विषयाच्या संबंधित प्रभावांचा एक संग्रह व्यक्तिच्या मनात एक विशेष वृत्ती विकसित करतो.

मला जरा विस्ताराने समजाऊ द्या.

प्रत्येक व्यक्तिला हे माहीतच असेल की एखाद्या व्यक्तिचे मतपरिवर्तन कसे केले जाते. ऐंद्रिय प्रभावांची एक शृंखला वारंवार आघात झाल्याने व्यक्तिची एका निश्चित प्रकारे कार्य करण्याची प्रवृत्ति निर्माण होते. जरी या पातळीवर कार्य करण्याची केवळ एक प्रवृत्ति असेल. कालांतरी प्रवृत्ति शक्तिशाली होऊ शकते जेंव्हा ऐंद्रिय प्रभावांचा व्यक्तिच्या मनावर पडसाद पडणे चालूच असेल. प्रत्येकाच्या जीवनात हे सतत चालू असते. जेंव्हा ऐंद्रिय प्रभाव शिथील असतात हळु-हळु ते कमी होऊ शकतात.

वर कथित प्रकारे अशा प्रवृत्तिचा एक समूह व्यक्तिमध्ये एका विशिष्ठ श्रेणी संबंधी एक सवय निर्माण करेल. ही सवय मानसिक वा शारीरिक असू शकते.

व्यक्तिच्या या सर्व सवयींना आपण त्या व्यक्तिचे चारित्र्य म्हणतो. हे इतके सोपे आहे.

हेच चरित्र आहे, भले ते या जीवनातील वा गत जन्मातील आहेत जी मूलतः कारणीभूत आधार आहे. जो एखादा पुरुष वा स्त्री साठी मानव जन्म घेण्याचे, ज्यामुळे गत जन्मातील कार्याची फळे भोगली जातील.

व्यक्तिचे हेच चरित्र आहे जे त्याच्या नियतिला कारणिभूत ठरतात.

हेच चरित्र आहे ज्याला एखाद्या झटपट पद्धतीने सोडवण्यासाठी बाध्य केले जाते जेणे करून सर्व ऐंद्रिय प्रभाव नष्ट होतील वा व्यक्तिच्या मनातून निवृत्त होतील. हीच नष्ट होण्याची प्रक्रिया क्रियेच्या रूपात अभिव्यक्त होते जेव्हा गुरु एखाद्या मंत्राद्वारे वा स्पर्श वा दृष्टि वा स्वतंत्र इच्छेचा प्रयोग व्यक्तिवर योग प्रणालीत दीक्षित करून आवश्यक प्रज्वलन करतो.

चला आता क्रियेचा अर्थ समजावतो.

एव्हाना वाचकांनी सुरुवातीलाच अनुमान काढले असेल की मी पुढे काय लिहिणार आहे. हे ही स्पष्ट आहे की वाचकांना समजून चुकले असेल की एखाद्या व्यक्तिच्या चरित्र चा अर्थ काय आहे.

शब्द 'क्रिया' या शब्दाच्या अर्थाला काही महत्त्व नाही. क्रिया शरीर, मन आणि बाह्य घटनांच्या प्रतिक्रियांना म्हटले जाते. ही प्रतिक्रिया तेव्हा होते जेव्हा सर्वोच्च ब्रम्हांडीय शक्ति व्यक्तिच्या मानसिकतेला निवृत्त करण्याचा प्रयत्न करते वा झटपट तंत्राने मनातील सर्व ऐंद्रिय प्रभाव नष्ट करते. जेंव्हा हे प्राप्त होते, तेंव्हा व्यक्ति सर्व प्रभावापासून (चांगले वा वाईट) मुक्त होतो जे त्याच्या मनांत अनंत जन्म वा युगांत एकत्र केले होते.

सर्व काही नष्ट करण्याची आवश्यकता आहे.

ज्या प्रकारे व्यक्तिचे चरित्र निर्माण कार्य युगांपासून एकत्रित ऐंद्रिय प्रभावामुळे झाले, तीच प्रक्रिया पूर्ववत करण्यासाठी आवश्यक आहे ज्यामुळे मन कोणत्याही पूर्वग्रहदोषापासून पूर्णपणे मुक्त होईल. जेव्हा मन आशा उन्नत शांत स्थितीत पोहोचते, शरीरांतर्गत निहित आत्मा मनाच्या शांत पाण्यात प्रतिबिंबित होतो.

मानव मानसिक स्थिरता वा आत्मबोध च्या अंतिम स्थितीच्या दिशेने वाटचाल करतो. (जरी, हा परिणाम परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून असतो) सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्ति जी चेतन व सर्वज्ञानी आहे ही स्थिरावस्था प्राप्त करण्याचे सर्वोत्तम तंत्र जाणते.

तेव्हा, गुरु आता सर्वोच्च मौलिक शक्तिचे माध्यमाच्या रुपांत प्रतिक्रियांची श्रृंखला उत्तेजित करते . अन्यथा गुरुंच्या या ईश्वरीय कृपेविना जीवनाची गाडी क्रिया व प्रतिक्रिया ही एक कधी न संपणारे रहाटगाडगे चालू राहील, वा जन्म-मृत्यु, चांगले-वाईट कर्म, चांगली वा वाईट फळे, सुख-दुःखे, गर्मी-सर्दी अन्य सर्व व्दैत.

तेव्हा जेंव्हा क्रिया वास्तवात शरीर, मन आणि बाह्य दैनिक जीवनात प्रकट होणे सुरू होते तेव्हा काय होते, हे आधुनिक विज्ञानाला एक रहस्य आहे, कारण हे कोणत्याही तर्कसंगत साधना द्वारे समजावता येत नाही.

उदा. व्यक्तिला बाहेरील थंडीच्या वातावरणात घाम फुटू शकतो, आणि हे कोणत्याही कारणाशिवाय होऊ शकते.

एखादी व्यक्ति अचानक काही योगाच्या क्रिया करू लागते ज्या त्याने आपल्या वर्तमान जीवनात कधीही आचरल्या नव्हत्या.

एखादा, काही मंत्रांचे उच्चारण करू लागतो जे त्याने कधी शिकले नव्हते.

काहीच्या बाबतीत व्यक्ति हसणे, रडणे वा जनावरांचे आवाज काढणे आरंभ करतो.

काही व्यक्ति नृत्य आरंभ करू शकतात, आणि तेहि जे त्याने कधीही अभ्यासले नव्हते.

काहीच्या बाबतीत व्यक्ति जागच्या जागी गोल गोल फिरू लागतो वा जमिनीवर गडबडा लोळू लागतो. जणू काही शरीराला एखाद्या दुष्टात्म्याने पछाडले असावे.

कधी कोणी अज्ञात भाषेत बोलणे वा सुरांत गाणे सुरू करू शकतो.

ही सूची कोणत्याही प्रकारे पूर्ण नाही.

वरील उल्लेखित सर्व प्रतिक्रिया या स्थूल शरीराशी संबंधित आहेत, आणि त्याचा व्यक्तिवर कोणताही हानिकारक दुष्प्रभाव पडत नाही. या अतिरिक्त व्यक्ति सुगमतेने आपल्या स्वतंत्र इच्छेने कधीही या क्रियांना वा प्रतिक्रियांना थांबवू शकतो. वास्तवात ही दिव्यतेतर्फे दिली गेलेली एक भेट आहे कारण दिव्यतेला साधकाच्या मानसिकतेचे संपूर्ण ज्ञान असते. येथे वाचकांसाठी समजण्यासारखी एक गोष्ट आहे की दिव्यता हे सुनिश्चित करते की जेंव्हा क्रिया प्रगट केली जात आहे तर योगाच्या साधकाला कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करावा लागू नये. यदा कदा जरूर वाटल्यास व्यक्ति स्वेच्छेने अभिव्यक्त क्रिया थांबवू शकतो. क्रियांवर या प्रकारे नियंत्रण एका सीमेपर्यंत दिव्यतेद्वारा योग साधकाला दिले गेले आहे. कधी कधी योग क्रिया अनियंत्रित होऊ शकतात आणि केवळ गुरुच त्यावर नियंत्रण लागू करू शकतात.

जसे मी सुरवातीला म्हणालो होतो, की दीक्षे समयी गुरु डोक्यावर हात ठेवून व्यक्तिला एखादा मंत्र देतात वा इतर उपाय करतात.

काहिंच्या बाबतीत, क्रिया शरीरात लगेच सुरू होते, त्यानंतर दीक्षिताला सतत तीन दिवस गुरु सान्निध्यात राहणे आवश्यरक असते, ज्यामुळे क्रियेच्या प्रकटण्याच्या वेळी गुरुंच्या समक्ष त्यांच्या अधिपत्याखाली असतील. क्रियेची तीव्रता संपूर्णत: गुरुंच्या नियंत्रणेखाली असते. गुरु तीव्रता वाढवू वा घटवू शकतात वा त्या पूर्णतः थांबवू किंवा

त्यांची अभिव्यक्ति लांबवू शकतात.

तीन दिवसाच्या या प्रारंभिक अवधि नंतर व्यक्ति कुठेही जाऊन योग साधना करू शकतो. त्यामुळे, जेंव्हा व्यक्ति आसनावर बसतो आणि मंत्रजप सुरु करतो, काही कालने क्रिया प्रकट होऊ लागतात.

क्रियेचा उद्देश मनाला निर्मल करणे आहे, त्याचे सर्व संचित ऐंद्रिय संस्कारांना नष्ट करणे आहे. तेव्हा, व्यक्तिच्या चरित्रावर आधारित (जे त्या व्यक्तिद्वारे गोळा केलेल्या प्रभावाचा एकूण योग आहे) प्रतिक्रियांचा एक विशेष समूह प्रकट होऊ लागतो.

याचा अर्थ हा नाही की प्रतिक्रियांचा एकच प्रकार कायमसाठी राहील आणि तो सुद्धा सर्वांसाठी. प्रत्येकाचे एक अद्वितीय चरित्र आहे. त्यामुळेच कोणाचे चरित्र स्वच्छ करण्यासाठीच क्रिया प्रकट होतात त्या देखील अद्वितीय असतील. तरीही मानवात काही साम्य लक्षणे पाहिलि जातात. त्यामुळे साधकांत काही समान प्रतिक्रिया पाहण्यात येतात.

मनाची पूर्ण शुद्धि झाल्या नंतर, प्रतिक्रियांचा एक वेगळा प्रकार सुरू होऊ शकतो. परंतु क्रियांची अभिव्यक्ति वेगवेगळ्या तुकड्यात होत नाही. कधी-कधी मन पूर्णतः शुद्ध होत नाही मधेच एखाद्या नवीन प्रकारच्या क्रिया बरोबरच सुरू होतात, त्यानंतर अजून वेगळा प्रकार चालू होऊ शकतो. हे पूर्णतः मानसिकतेची संरचना आणि संचित संस्कारांच्या प्रभावाच्या अधिपत्यावर आधारित आहे. प्रतिक्रियांची अभिव्यक्ति व्यक्तिच्या मनामधे पूर्वीपासून दृढ ऐंद्रिय प्रभावांच्या संस्कारांवर निर्भर आहे.

यामुळे, जसे मी पहिले सांगितले, हे एका व्यक्तिचे चरित्र आहे जे व्यक्तित क्रियेच्या प्रकटीकरणात एका इंधनाच्या रूपात कार्य करते. सध्या तरी, मी त्या प्रकारच्या क्रिये बाबत सांगत आहे जे व्यक्तिच्या संपूर्ण भौतिक शरीरा संबंधी आहे.

आता प्रतिक्रियांचे इतर प्रकार विस्तार पूर्वक सांगतो.

काही प्रतिक्रियांना पूर्णतः बुद्धि गत विभागांत वर्गीकृत केले जाउ शकते. या प्रतिक्रिया इतरांना दिसून येत नाहीत. क्रिया जेव्हा मानसिक पातळीवर चालू असतात तेव्हा त्या केवळ संबंधित व्यक्तिलाच समजतात. ही मानसिकता वा जागृतता स्वयं ब्रम्हांडीय शक्ति द्वारे योग साधकाला अर्पित केली जाते.

वाचक असे म्हणू शकतात कोणी कसे काय समजतील की एखादा सामान्य विचार आणि एक दुसरा विचार ज्याला क्रिया मानता येईल. या दोहोंत फरक कसा करणार ?

मला या प्रकारे समजाऊ द्या.

समजा एखादी व्यक्ति डोळे बंद करून ध्यानात आसनावर बसली आहे. त्याच्या मनांत मानसिक छायाचित्र उभारु लागेल. व्यक्ति कोणत्याही प्रयत्नाने कसलीही कल्पना करत नाही.

या अतिरिक्त, व्यक्ति अशा लोकांचे चेहरे पाहू लागतो ज्यांना तो कधीही भेटला नव्हता.

त्याच प्रकारे एखादी व्यक्ति स्पष्टपणे अशा काही शहरांना आणि खेड्यांना पाहू शकतो ज्या ठिकाणी तो कधीही गेला नव्हता.

या अतिरिक्त तो अशा काही विचित्र प्रकारची झाडे, फुले वा वनस्पती आणि जीवाना पाहतो ज्यांना तो अजिबात ओळखत नाही.

व्यक्ति अशी काही विचित्र वाहने, हत्यारे इत्यादी पाहतो जी चालू जमान्यात उपलब्ध नाहीत.

वाचक मानू शकतो की त्या व्यक्तिने त्यांच्या विषयी पुस्तकांत वाचले असावे किंवा एखाद्या चित्रपटात पाहिले असेल. परंतु जर त्या व्यक्तिच्या मनःपटलावर जो पाहत आहे त्याच्याशी कोणताही संपर्क होऊ शकत नाही.

या घटना कशा प्रकारे समजवता येतील ?

आपण ज्या दृष्टिकोनातून पाहू इच्छिता, ते तुमचे स्वातंत्र्य.

संवाद तर चालूच राहणार ! तथ्य एवढेच आहे की स्पष्ट रुपांत ही एक क्रिया आहे. व्यक्तिला मागच्या एखाद्या जन्मातील अनुभव असावा आणि सर्वोच्च मौलिक शक्तिद्वारे विनाशाच्या विपरीत तंत्र वा योगिक तंत्रा मार्फत संचलित करून त्याचे संचित संस्कार शुद्ध केले जात आहेत.

विनाश याचे माझे तात्पर्य हे की व्यक्तच्या मानसिकतेचा विनाश हे त्या साठी होते की आत्मबोध वा दिव्य ज्ञान मनाच्या माध्यमाद्वारे प्रगटावे.

हे तेव्हाच शक्य होते जेंव्हा संचित संस्कार त्याच शक्तिद्वारे मनातून हटवले जातात.

आणि हेच क्रियेच्या माध्यमातून घडून येते.

एका अन्य प्रकारे, क्रियेला बाह्य जीवनाच्या संबंधि वर्गीकृत केले जाऊ शकते. व्यक्तिला असे वाटते की सर्वज्ञ दिव्य शक्ति, सक्रिय रुपांत त्याच्या दैनिक जीवनाच्या दिनचर्येत त्याच्याशी वार्तालाप करत आहे. हे या कारणे होते की ब्रम्हांडीय शक्ति साधकाद्वारे एखाद्या वेगळ्या आंशिक रुपांत शरीराच्या आंत आणि बाहेर अनुभव केली जाते. या बाबत पुढच्या एका प्रकरणांत विस्ताराने चर्चा केली आहे.

बऱ्याच विचित्र व असामान्य घटना होऊ लागतात. जेणे करून पुष्टि मिळते की खरोखरच क्रिया प्रकट होत आहेत.

काही उदाहरण प्रस्तुत करतो.

समजा एखाद्या व्यक्तिच्या भाग्यात चालू जीवनांत वा गत जन्मात झालेल्या पूर्वीच्या पापाच्या कारणाने त्याला त्याच्या सामान्य गतीत आपल्या डाव्या पायाला जखम होणे असेल. याया नियती कृतीत तीव्रता आणायची असेल आणि त्याच्या मानसिक संस्काराला काढण्यासाठी, सर्वज्ञ शक्ति हे सुनिश्चित करते की व्यक्तिला कोणत्या न कोणत्या कारणाने हलकी-फुलकी जखम होवो जेणे करून संबंधित व्यक्तिला अनिवार्य पीडा सहन करावी लागेल. व्यक्तिसाठी सामान्य जीवनांत आवश्यक बाह्य परिस्थिती निर्माण केली जाते ज्यामुळे अटळ गोष्ट घडू शकेल.

अशाच प्रकारे ज्या व्यक्तिच्या भाग्यात पाण्यात बुडणे असेल, तो एखाद्या शुल्लक घटनेचा अनुभव येऊ शकतो, ज्यात त्याच्या सामान्य जीवनांत कोणितरी त्याच्या डोक्यावर पाणी टाकू शकतो.

जरी, सारख्या प्रकारच्या प्रतिक्रिया उलट्या पद्धतीने देखील होऊ शकतात, ज्यात पूर्वीच्या चांगल्या कर्माचे सर्व गुण एकत्र झाले असता त्यांना काढण्यासाठी व्यक्तिला हलक्या प्रतीचे सुख भोगण्यास मिळते.

वाचकांना हे लक्षात ठेवणे अनिवार्य आहे की दोनही चांगले व वाईट प्रभाव संपतील. तेव्हा त्या प्रकारे जीवनांतील आनंदमय आणि दुःखद घटना संपतील.

परम ज्ञानाच्या प्रकटणाच्या सौंदर्यासाठी दोनही प्रकारच्या प्रभावांपासून मनाची शुद्धि अपरिहार्य आहे.

दिव्याता प्रकट करण्यासाठी सामान्य जीवनांत जे शिकले आहे त्याला काढून टकाणे आवश्यक आहे.

शक्तिची संरचित अभिव्यक्ति

या प्रकरणांत योगाच्या दृष्टीकोनातून मानवाच्या शरीर रचनेच्या वर्णनाने आरंभ करत आहे. हा एक महत्वाचा मुद्दा आहे. आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीकोनातून ते समजावणे कठीण होऊ शकते.

वाचकांना मी विनंती करतो की या योगिक शरीर रचनेची तुलना आधुनिक शरीर विज्ञाना बरोबर करू नका, अजूनही मानवी शरीराबद्दल विज्ञानाकडे पुरेशी माहिती नाही. तसेही योगिक मानवी देह रचना आणि ज्ञान शरीर रचना (विज्ञानाच्या परिभाषेत) कमी महत्त्वाचे आहे.

प्राचीन योग ग्रंथाच्या आधारानुसार मानव शरीर पाच वेगवेगळ्या कोषांनी बनले आहे आणि दिव्य आत्म्याला आच्छादून असतात.

प्रथमावरण आनंदमय कोष वा 'आनंदाचे आवरण' या रुपात ओळखले जाते. हे आवरण अनंत आत्म्याला लौकिक भ्रम व योग ग्रंथाच्या भाषेत माया संबोधले जाते. पुढील आवरण 'कारण शरीर' या नावाचे आहे. प्रत्यक्षात मानवी शरीराचा हा अंतर्भाग आहे व त्यावरील पुढची आवरणे स्थूल शरीरा पर्यंत विकसित होतात.

या पुढे विस्ताराने मला सांगता येणार नाही. त्याबद्दल वाचकांची मी क्षमा याचना करतो, त्या एका उच्च आध्यात्मिक स्थिती बाबत टिप्पणी करण्यासाठी मी सक्षम नाही व या पुस्तकाच्या चौकटि अंतर्गत येत नाही.

दुसरे आवरण विज्ञानमय कोष वा 'ज्ञानाचे आवरण' या नावाने ओळखले जाते. या आवरणांत मानवाची बुद्धि आणि अहंकार एकत्र असतात. या अतिरिक्त सर्व ऐंद्रिय संवेदनांचे घर आहे तसेच मानसिकतेचा प्रथम बिंदू आहे. चेतन - अचेतन दोन्हीही.

योग्यांना या कोषाबद्दल विशेष आकर्षण असते. जोवर ते या दोनही, अहंकार आणि ऐंद्रिय संवेदना पासून पूर्णपणे मुक्त होत नाहीत, योगी समाधी वा निर्विचारावस्था प्राप्त करू शकत नाही. जो सर्व योग प्रकारांचा सर्वोच्च बिंदू आहे. या स्तरावर, विज्ञानाचे भौतिक जगा संबंधित सर्व नियम भंग व्हायला पाहिजे.

वाचकांनी हे लक्षात घ्यावे की ही अवस्था आत्मबोधाची अवस्था नाही, जे कारण शरीराच्या विघटना नंतरची अति उच्च अवस्था आहे, आणि यात्रेच्या त्या अंतिम स्थितीसाठी योगाचे नियम देखील भंग होणे अनिवार्य असते माझ्यासकट इतर कोणीही त्याचे विवरण करू शकत नाही.

या कोषा भोवती मनोमय कोषाचे आवरण असते. सर्व इंद्रियांचे स्थान याच कोषात असते व येथूनच अनंत कोटी परमात्म्याद्वारे स्वतंत्र इच्छेचे प्रकटिकरण केले जाते.

या कोषाच्या वर 'जीवन जोती' चे आवरण आहे ज्याला योग ग्रंथानुसार प्राणमय कोष असे संबोधले जाते . जीवन शक्तिच्या या आवरणाचा आकार मानवीय शरीरासारखाच आहे. काही संस्कृतीत मायामय शरीर या नावाने संबोधले जाते. यांत अत्यंत सूक्ष्म शक्ति संचलनाचे एक जटिल जाळे आहे. या कोषात पाच प्रमुख व पाच गौण जीवन शक्ति आहेत. जी श्वसन, पाचन, उत्सर्जन, प्रजनन, रक्तसंचारण, जांभई इत्यादी शरीरांतर्गत कार्यांना परीचालित करतात.

जीवन शक्तिच्या या भागाच्या बाहेर अन्नमय कोष स्थित आहे. हा अंतिम कोष आहे.

तेव्हा आनंद कोषापासून सुरू होऊन अन्नावरण पर्यंत पाच कोष वा स्तर आहेत.

प्रथम स्तराला कारण शरीर म्हटले जाते. पुढच्या तीन कोषांनी आवृत्त कारण शरीराला सूक्ष्म शरीर या नावाने ओळखतात. अंतिम आवरणाने आच्छादित सूक्ष्म शरीराला सर्वांचे भौतिक शरीराच्या रुपांत

ओळखले जाते.

हेच स्थूल शरीर जेव्हा जीर्ण होते आत्म्याला राहण्या लायक नसते तेव्हा मृत्यू होतो. मरणोपरांत सूक्ष्म शरीर हे चार कोषांनी वशीभूत आत्मा बरोबर स्थूल शरीराला सोडते आणि नंतर पुन्हा नवीन शरीर ग्रहण करते. आत्मा कोणत्या योनीत परत जन्म घेतो हे त्यावर अवलंबून असते की त्याने आपल्या गत जन्मांत कशा प्रकारचे संस्कार संचित केले होते.

तर कारण शरीर आपल्या मूलभूत रुपांत सर्वोच्च मौलिक शक्तिने बनलेला आहे. अर्थात लौकिक भ्रम वा माया जी ब्रम्हांडात सर्वोच्च आहे.

वाचक विचारतील की अनंत आत्मा वा सर्वशक्तिमानाला सर्वोच्च मानले जाते. होय वास्तवात सर्वोच्च लौकिक शक्ति आत्मा शिवाय नसते तसेच अनंत आत्मा सर्वोच्च शक्ति शिवाय नाही. ही नाण्याच्या दोन बाजू प्रमाणे एकच आहेत.

त्या शक्ति शिवाय भगवंताला देखील भगवंत म्हणता येणार नाही. अगदि तसेच जसे हॉलिवूडच्या सिनेमांतील स्पाइडर मॅन एका सुपर मकीडी च्या शक्ति शिवाय राहू शकत नाही. हीच स्थिती संस्कृत ग्रंथातील शक्तिमाना बरोबर देखिल आहे ज्याला त्या शक्ति वा ऊर्जे शिवाय अस्तित्व नाही. या प्रकारे आपल्या मूलभूत रुपांत शक्ति आपल्या श्रेष्ठतेचे प्रदर्शन केवळ अनंत आत्माच्या रुपांत करते. आत्मा आणि शक्ति अविभाज्य आहेत.

दिव्यतेचे वर्णन केवळ सांसारिक भाषेत असंभव आहे. त्याशिवाय हे देखील आहे की परम सत्य अज्ञात आहे. थोडे विस्ताराने समजावण्याचा प्रयत्न करतो.

ब्रम्हांड आणि त्याच्याही परे परम सत्य सर्वोच्च दिव्यता आहे. ती सर्वोच्च दिव्यता वा स्वयं चे वास्तविक स्वरूप आहे आणि ते कालातीत आहे, आणि माझ्या सहित आहे, कोणत्याही व्यक्तिला ते अज्ञात आहे. यदा कदाचित मी आत्मबोधित आत्मा असतो तर मी आत्ता हे पुस्तक लिहिले नसते. त्यामुळेच मी वरील विधान केले की दिव्यतेचे वर्णन अज्ञात परम सत्या शिवाय केले जाऊ शकत नाही.

जेंव्हा आनंदमय कोष वा आपल्या मूलभूत रुपांतर शक्ति, आपल्या मूळ स्त्रोतात परत विलीन होते, त्याला आत्मबोध म्हटले जाते.

जरी, मानवात हे अंतिम परिवर्तन वा आत्मज्ञान केवळ शक्तिमानाच्या इच्छेने होते. योगाच्या सर्व नियमांचे भंग होणे आवश्यक आहे. त्यामुळेच सर्व धार्मिक पंथांमध्ये आत्मसमर्पण अनिवार्य आहे.

आता पुढल्या तीन कोषांना ज्ञान, मन आणि जीवन शक्ति मधील व्याप्त शक्तिला वागदेवी, चित्तशक्ति आणि प्राण शक्ति म्हणतात. त्या आपल्या स्थूल रुपांत शक्ति आहेत. ह्या शक्ति विज्ञानमय कोष, मनोमय कोष आणि प्राणमय कोषात स्थित आहेत. पुराणांत त्या शक्ति रूपांना सरस्वती, लक्ष्मी आणि पार्वती या नावाने ओळखतात.

योग ग्रंथानुसार या शक्तिला तीन वेगळ्या रुपांत वर्गिकृत केले जाऊ शकते. एरवी या प्रकारे कोणतेही विभाजन असंभव आहे. त्यांना केवळ तीन वेगळ्या नावाने संबोधले जाते. शक्तिची मूल प्रकृत्ती हा एक लौकिक भ्रम आहे. त्या पुढे ती स्वतःलाच परिवर्तित करून बुद्धि आणि अहंकाराच्या रूपात प्रकट होते. प्रत्यक्षात, बुद्धि व अहंकार दोन्ही एकत्र एकाच ठिकाणी पण मिश्रित आहेत. बुद्धि नंतर शक्ति आपले पुढचे रुपांतर मानवात मनाच्या रुपांत प्रकट करते. प्राचीन ग्रंथानुसार या लौकिक भ्रमाला कोणत्याही विभाजना शिवाय महामाया या नावाने संबोधले जाते.

वाचकांना समजण्यासाठी एवढे पुरेसे आहे की शक्ति मानवी शरीरात विशिष्ठ कार्यासाठी आधारित विभिन्न रूपात प्रकट होते.

शक्तिचे जे रुप सर्वात खालच्या स्तरावर व्याप्त आहे ती शारीरिक ऊर्जा आहे ज्याला वाचक आणि आधुनिक विज्ञान जाणते. शक्तिच्या या स्थूल रुपाला प्रकृति नावाने संबोधले जाते. हेच प्राण शक्तिचे स्थूल रूप आहे. याचा अर्थ हा झाला की जर ग्रंथात प्राण शक्तिला पार्वतीच्या रुपांत संबोधले तर त्या शक्तिच्या या स्थूल रूपाला प्रकृती म्हटले गेले.

तर प्रथम कोषांतर्गत शक्ति आपल्या मूल अवस्थेत असते ती लौकिक 'भ्रम' वा 'माया' च्या रचनेची उत्तरदायी आहे. पुढच्या तीन कोषांतर्गत आपल्याला शक्तिचे स्थूल प्रकटिकरण दिसते ते मानसिक शक्तिच्या रुपांत आणि शेवटच्या कोषात तिच शक्ति सर्व शारीरिक ऊर्जेच्या रुपांत प्रकट होते, ज्याला आपण ब्रम्हांड व संस्कृत ग्रंथानुसार प्रकृती म्हणतो.

जर आपण प्रतिप्रसव क्रमाने शक्तिच्या क्रियांना पाहिले, तर आपल्याला दिसेल की आपल्या संपूर्ण शारीरिक शक्ति संबंधित असलेले वैज्ञानिक नियम भंग होणे आवश्यक आहे ज्यामुळे योगी आत्मबोध प्राप्त करू शकेल. या पायरीवर सर्वोच्च शक्ति वा पराशक्ति वा महामाया आपल्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत अर्थात सृजनाच्या विपरीत दिशेने वाटचाल करू

लागते. पुराणात शक्तिच्या या विशेष रुपाला काली या नावाने संबोधले आहे.

शारीरिक शक्ति वा विज्ञानाचे नियम मोडणे या म्हणण्या मागचे तात्पर्य हे की आता ते नियम लागू होत नाहीत. योगी अलौकिक शक्ति संपन्न होऊ शकतो उदा. हवेत संचार करणे, अदृश्य होणे इत्यादी.

सामान्य मानवासाठी जे विज्ञानाच्या नियमांनी बाध्य आहेत, त्यांच्यासाठी ही बाब अलौकिक असू शकते. परंतु कोणत्याही योग्यासाठी स्वाभाविक असतील.

भले, जरी योगी या अलौकिक शक्तिनी संपन्न असेल, तो अजूनही आत्मबोधाच्या अवस्थेला प्राप्त करण्यास असमर्थ असेल. त्याचे कारण असे की पुढच्या प्रगतिसाठी योगाच्या (जे अलौकिक शक्तिंशी संबंधित आहे) नियमांना भंग करावे लागेल.

तर योग्याला आत्मबोध प्राप्तिसाठी विज्ञानाचे आणि योगाच्या नियमांना मोडणे वा त्या नियमांवर विजय प्राप्त करावा लागेल. परब्रम्ह वा आत्मा वा सर्वशक्तिमान वा भगवान यांनी सर्वाधिकार स्वयं साठी सुरक्षित राखले आहेत.

येथे सामान्य वाचकांच्या लाभार्थ, संक्षेपात योगाच्या दृष्टिकोनातून सहस्त्रार चक्राची शारीरिक रचनेचे वर्णन करू इच्छितो. या दृष्टिकोनातून पाहिल्यास मानवी शरीर रचना संपूर्ण सहस्त्रार चक्रात अंतरातील जीवन शक्तिच्या संरचने संबंधी आहे. या दृष्टिकोनात मांस, हाडे यांचे काहीहि महत्त्व नाही. त्यामुळेच सहस्त्राराचे विच्छेदन करून या जीवन शक्तिला पाहता येणार नाही. या जीवन शक्तिची संरचना विद्युतीय तरंगांच्या आधाराची आहे, ते इतके सूक्ष्म आहेत की ते आधुनिक विज्ञानाच्या विद्युत चुंबकीय उपकरणाच्या सहाय्याने देखील अनुभवता येत नाहीत. कारण विज्ञानाचे नियम, जे शक्तिच्या स्थूल रूपाशी संबंधित आहेत, या सूक्ष्म ब्रम्हांडीय स्तरावर लागू होत नाहीत. त्यामुळे, कोणतेही उपकरण त्याची मोजमाप करू शकत नाही. प्रत्यक्ष वा परोक्ष.

योग ग्रंथानुसार, मेरुदंडाच्या आधाराने मूलाधारा पासून सुरू होऊन डोक्यापर्यंत त्याच्या मध्या-पर्यंत सात ऊर्जा केंद्र आहेत ज्यांना चक्र म्हटले जाते.

सर्वात पहिल्या केंद्राला आधार चक्र वा मूलाधार चक्र म्हटले जाते. हे गुदा आणि जननांग क्षेत्राच्या मध्यभागी मेरुदंडाच्या आधारावर स्थित आहे. कुंडलिनी वा ब्रम्हांडीय शक्ति या शक्ति वा ऊर्जा केंद्रात एक प्रकारे निष्क्रिय अवस्थेत असते. योग ग्रंथात याचे विस्तृत वर्णन सापडते.

जरी याची संरचना फार जटील आहे आणि मी केवळ या विशेष चक्राचे वर्णन करत आहे, जेणे करून सामान्य वाचक त्या संबंधी काही समजू शकतील.

पर्याप्त रुची असल्यास वाचक इतर चक्रांविषयी वाचू शकतात तसेच सहस्त्रार चक्राची संपूर्ण यंत्रणा. या विषयी बरीच माहिती उपलब्ध आहे आणि वाचक वर्ल्ड वाईड वेब वर प्राप्त करू शकतात.

सर्व चक्रांना कमलाच्या फुलाच्या रुपांत समजवले जाते.

आधार चक्र कमल चार पाकळयांचे असते. पाकळयांचा रंग लाल असतो. संभवतः ऊर्जेचे स्वरूप एक पान वा फुलाची पाकळी च्या आकारात आणि अशा चार आकृत्या असाव्यात. या व्यतिरिक्त लाल रंगाचा संबंध पाकळयांचा संच असू शकतो. विद्युत चुंबकीय वर्णक्रमात लाल रंगाशी जुळणारा आहे.

प्रत्येक पाकळीवर संस्कृत वर्णमालेतील एक अक्षर आहे. या अक्षरांचा रंग सुवर्णा सारखा आहे. अक्षरांचा ध्वनि व, श, ष आणि स आहे. असे जेव्हा म्हटले जाते की अक्षरे पाकळयांवर स्थित आहेत तर संभवता ते संस्कृत अक्षराच्या ध्वनिशी एक प्रकारची ऊर्जेच्या कंपनाशी साम्य राखत असतील.

तसे पाहता ध्वनि एक प्रकारची शक्तिच आहे. त्यामुळे, संस्कृत वर्णमालेचे एक विशेष अक्षर वा अक्षराचा विशेष ध्वनिबरोबर काहीतरी शक्ति स्वरूपाचा संबंध आहे.

कमळाचे फुले एक ऊर्जा केंद्र मानले जाते. त्यामुळे हे सहजतेने समजावले जाऊ शकते की हे विभिन्न शक्ति स्वरुपाच्या आधारावर पाकळया अक्षरे, पाकळयांचा रंग, अक्षरांचे रंग इत्यादी रुपांत त्याची संरचना आहे. या बाबतीत सर्व अक्षरांना एका निश्चित कंपनांचा संकेत मानला जातो.

कमळाच्या आत एक चौकोनी भाग आहे व त्यात आठ काटे असतात असे सांगितले जाते. योग ग्रंथानुसार, हे वर्गाकार पृथ्वी तत्त्वाचे प्रतीक आहे. काटे आठ दिशांचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे असे म्हटले

जाते की हा भाग पृथ्वीचे वा पदार्थातील अस्तित्वाच्या सिद्धांताचे प्रतीक ठरते.

या अतिरिक्त, योग ग्रंथानुसार या क्षेत्राचा रंग पिवळा आहे. वाचक विद्युत चुंबकीय वर्णक्रमांत पिवळ्या रंगाच्या संबंधी ऊर्जा तरंगाशी परिचित असतील. यामुळे हा पिवळा रंग कोणत्यातरी शक्ति पद्धतीचा संकेत असू शकेल. योग ग्रंथानुसार पिवळा रंग पृथ्वी तत्त्वाचे प्रतिनिधित्व करते. त्याच प्रमाणे योग ग्रंथानुसार पिवळा रंग गंध संवेदनेचे प्रतिनिधित्व पण करतो.

संपूर्ण पिवळ्या रंगाच्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व संस्कृत वर्णमालेतील 'लं' हे अक्षर करते वा हा ध्वनी या पिवळ्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतो.

या फुलात एक अधोमुखी त्रिकोण देखील आहे. भारतात शक्ति पंथातील वा शक्ति उपासक या अधोमुखी त्रिभुज स्त्रियांचे जननांग (योनी) वा शक्ति चे प्रतिनिधित्व करते.

तर, हा अधोमुखी त्रिकोण स्वतः शक्तिचे एक आकार असावा कारण शक्तिचे प्रतिनिधित्व नेहमी अधोमुख त्रिकोणाने केले जाते. या अतिरिक्त या त्रिकोणात एक ध्वनि वा संस्कृत अक्षर 'क्लीं' आहे. हा त्रिकोण देखील लाल रंगाचा आहे. क्लीं ध्वनि काम शक्ति वा सृजनात्मक शक्तिचे प्रतिनिधित्व करते. लाल रंग काम भावना व वासनेशी संबंधित आहे.

त्रिभुज त्रिकोणावर एक शिवलिंग व काळ्या रंगातील लिंग आहे (त्याचा तसा आकार जाणवतो) भारतात शैव पंथी, सर्वशक्तिमानाला लिंगाच्या रुपांत पूजतात.

कुंडलिनी या सर्वोच्च ब्रम्हांडीय शक्ति लिंगाला वेटोळे घातलेल्या रुपांत असलेली मानतात. तिला साडेतीन वेटोळे घालून एका सर्पाच्या रुपांत मानतात ज्याचे तोंड लिंगाच्या उर्ध्व भागाला झाकून असते.

वाचकांना आता पुरेशी कल्पना आली असेल ही शक्ति किती सूक्ष्म ब्रम्हांडीय स्तरावर अस्तित्वात आहे तरीही किती शक्तिशाली!

सर्वात पहिले ऊर्जा स्वतः अदृश्य आहे इतकी की कोत्याही आधुनिक उपकरणाने तिला मापता येत नाही. कमळाच्या आकाराच्या शक्तिच्या केंद्राची पूर्ण संरचना अत्यंत सूक्ष्म पद्धतीने बनलेली आहे. विविध आकाराची सामुग्री शक्तिच्या विविध सुट्ट्या भागांना एकत्रित करून एखाद्या यंत्राप्रमाणे आहे ज्याची तुलना अत्यंत सूक्ष्म शक्तिसमूह एकत्र करून एखाद्या मशीनशी प्रतिनिधिक स्वरूपाशी करता येईल. या अतिरिक्त

प्रत्येक शक्ति संच सचेत आहे आणि परम ब्रम्हा वा सार्वभौम आत्मा, वा भगवानाने व्याप्त आहे. त्यामुळे प्रत्येक शक्ति अवयवा बरोबत स्थानीय देव व देवी यांच्याशी संबंधित आहे.

मला जरा विस्ताराने सांगावेसे वाटते.

शक्ति कधीही आत्मा वा दिव्यता वा परमेश्वरा शिवाय राहू शकत नाही. तथापि ब्रम्हांडातील या अंशात्मक मानवी शरीरात विशिष्ठ कार्याच्या आधाराने पराशक्तिला विभिन्न गुणांचे श्रेय दिले जाते. त्यामुळे परमेश्वराला देखील प्रत्येक शक्तिरुपाने संपन्न मानले जाते. एखाद्या शक्ति केंद्रात स्थानीय देवता व शक्ति याचा हा अर्थ आहे. अन्यथा दिव्यतेला अशा प्रकारे विभिन्न देवतांमध्ये विभाजित करता येणार नाही. परम दिव्यतेच्या या सैद्धांतिक विभाजना शिवाय दिव्यतेची अति जटील प्रकृतीला तर्काने समजावता येणार नाही.

या कमळाच्या आकाराच्या शक्ति केंद्राच्या आंत जी शक्ति असते, कुंडलिनी शक्ति त्याहीपेक्षा सूक्ष्म रुपांत या जटिल रचनेच्या आत अस्तित्वात आहे. मी आशा करतो की वाचक आता सुलभतेने मानवी शरीरातील या शक्तिच्या अतिसूक्ष्म स्वरूपाचा अंदाज घेऊ शकतील.

हीच सर्वोच्च ब्रम्हांडीय शक्ति मानव रचने नंतर व्यक्तिच्या मनावर संसाराचा भ्रम निर्माण करून प्रक्षेपित करते आणि तो तसाच राखते. सहस्त्रार व मेरुदंडात कोणत्याही प्रकारे विभिन्न शक्ति संस्कार (ज्याचे वर्णन वर केलेले आहे) भ्रमाच्या रुपांत एकत्र होतात जे अंतापर्यंत प्रक्षेपित होऊन एक भ्रामक सांसारिक रचना करतात ज्याचा व्यक्ति अनुभव करतो.

योग ग्रंथानुसार अन्य वस्तूंना बरोबर घेऊन काही स्थानीय देव-देवता सुद्धा या चक्र संरचनेत सामील आहेत. या चक्राविषयी अधिक विस्तारांत मी जाणार नाही कारण त्याचा काही उपयोग नाही.

शैक्षणिक ज्ञान केवळ व्याख्यान देण्यासाठी ठीक आहे व पुस्तकाचे लेखन करणे जसे मी आता करत आहे. या अतिरिक्त शैक्षणिक ज्ञान व्यक्तिला कोणत्याही प्रकारे शांती व सुख देऊ शकत नाही. अजून एक उपयोग बौद्धिक मनोरंजन होऊ शकते आणि त्याचा तेवढाच उपयोग आहे.

या प्रकारे सहस्त्रार व मेरुदंडात इतर काही शक्ति केंद्र आहेत.

पुढच्या चक्राला स्वाधिष्ठान चक्र म्हटले जाते. आणि त्याचे स्थान जननांगाच्या मुळांत स्थित आहे. यापुढे नाभि क्षेत्रात मणिपूर चक्र आहे. यापुढे हृदय क्षेत्रात अनाहत चक्र आहे. पाचवे चक्र कंठात आहे व त्याला

विशुद्ध चक्र म्हणतात. सहावे चक्र दोन्ही डोळयांच्या मधे भ्रुकुटी च्या मधे स्थित आहे जे आज्ञा चक्र नावाने ओळखले जाते. शेवटच्या चक्राला सहस्त्रार म्हटले जाते आणि ते डोक्यात आहे.

प्रत्येक शक्ति केंद्र वा कमळातील पाकळ्या निश्चित आहेत. सर्वात पहिल्या चक्रापासून सहाव्या चक्रापर्यंत एकूण पन्नास पाकळ्या आहेत ज्यांच्यावर संस्कृत वर्णमालेतील पन्नास अक्षरे आहेत. डोक्यातील सहस्त्रार चक्राला एक हजार पाकळ्या आहेत ज्यात पन्नास अक्षरांची संपूर्ण वर्णमाला वीस वेळा पुनर्लिखित आहेत.

जेंव्हा ब्रम्हांडीय शक्ति मूलाधार चक्रात जागृत होऊन सहस्रारात आरोहण करते व डोक्यापर्यंत पोहोचते, असे म्हटले जाते की व्यक्तिला आत्मबोध झाला. जेंव्हा ब्रम्हांडीय शक्ति सृजनात्मक अवस्थेत होती, तिने भ्रामक अस्तित्वाची रचना केली ज्याला मानव रुपात जाणले जाते. त्या पश्चात मेरुदंडाच्या आधाराने ती त्याचे अस्तित्व राखते. जेव्हा या प्रक्रियेचा प्रतिप्रसव क्रम सुरू होतो तेव्हां शक्ति मस्तकातील सहस्त्रारात विलीन होते. अशा प्रकारे बुद्धि संपूर्ण ज्ञानाने परिपूर्ण होते.

वरील प्रदीर्घ कथानक लिहिले गेले, ते मानवी शरीरातील शक्ति संचार समजण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

मौलिक शक्ति मानवी शरीराची निर्मिती केल्यावर अंतर स्थित आत्म्यावर भ्रामक दुनिया निर्माण करते व पुनर्निर्माण करणे चालू ठेवते.

वाचकांना पुन्हा एकदा आठवण करून देतो की हा आत्मा ब्रम्हांडाच्या सर्वोच्च आत्मा वा ईश्वरा पासून भिन्न नाही. ते एकच आहे.

तर ही शक्ति मानवात सहस्त्रार मेरुदंड व मूलाधार यात स्थित आहे.

गुरुद्वारे हस्तक्षेप केल्याने ही शक्ति युगांपासून ज्या भ्रमांची निर्मिती करून त्यांचे रक्षण केले होते विपरीत दिशेने फिरून त्याचा विध्वंस करते. परिणामी, शक्ति संचार सृजनाच्या विपरीत पद्धतीने शरीराच्या अणूरेणूत पसरते.

या पुढे मी माझ्या अनुभवांचे वर्णन करेन की कशा प्रकारे ही शक्ति माझ्या अंतरात जागृत झाली आणि कशा प्रकारे ती माझ्या शरीरात गतिशील आहे.

कुंडलिनी शक्तिची जागृती

वर्ष २००७ च्या नोव्हेंबर महिन्यात एका सुदिनी, मला सिद्ध महायोगात दीक्षित केले गेले, एक अशी योग प्रथा ज्याचे प्रचलन शक्तिपात पद्धती नुसार केले जाते.

माझ्या एका मित्राद्वारे मला समजले की माझे भविष्यातील गुरुजी, श्री स्वामी सहजनंद तीर्थ महाराज, जे या पद्धति प्रकारात येतात, भारतातील हैदराबाद शहरांत येणार आहेत.

माझ्या मित्राने पूज्य स्वामींच्या स्वागताच्या निमित्ताने मला आपल्या घरी आमंत्रित केले, आणि मी लगेच सहमती दिली. माझी भेट माझ्या मित्राच्या घरी रात्री आठ वा नऊ वाजण्याच्या सुमारास झाली.

मला एक सुखद झटका लागला, मला भास झाला की माझी स्वामी बरोबर एकवीस वर्षां पूर्वी भेट झाली होती. स्वामीजी नवी दिल्लीच्या गाडीत एक सहप्रवासी होते.

मी हा प्रवास १९८६ च्या उन्हाळयात केला होता व त्या वेळी मी पंधरा वर्षांचा होतो. स्वामीजी समोरच खालच्या आसनावर माझ्या जवळच बसले होते. आम्ही दोघांनी तीस तास एकत्र प्रवास केला होता.

पूज्य स्वामी भगव्या कपड्यात, भारतातील आजच्या उत्तराखंडात हिमालयाच्या पहाडांमध्ये स्थित ऋषिकेश मधील त्यांच्या

आश्रम स्थळी परतत होते. मी पर्वतारोहण आणि रॉक क्लाइंबिंग शिकण्यासाठी उत्तराखंडातील उत्तर काशी (त्याच्याही पुढे हिमालय पर्वत श्रुंखलात) स्थित विश्व प्रसिद्ध 'नेहरु इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंग' ला जात होतो.

उत्तर काशीला पोहोचण्यासाठी मला ऋषिकेशला जाऊन नंतर पुढच्या प्रवासासाठी बस धरायची होती.

पूज्य स्वामींना माझ्या कार्यक्रमाविषयी कळले, तेव्हा त्यांनी ऋषिकेशच्या त्यांच्या आश्रमांत येण्या विषयी आमंत्रित केले. माझ्या जाण्या-येण्याच्या प्रवासात दोन्ही वेळा ऋषिकेश वा जवळच्या हरिद्वार येथे रात्रीचा एक मुक्काम करणे आवश्यक होते.

या अतिरिक्त, त्यांनी आपले नाव आणि आश्रमाचा पत्ता एका कागदाच्या तुकड्यावर लिहून दिला. मी या आमंत्रण बाबत फार साशंक होतो त्यामुळे मी तिकडे दुर्लक्ष केले.

लक्षात घ्या, त्या वेळी माझे वय पंधरा वर्ष होते आणि माझ्या भविष्यातील गुरुंचे वय जवळपास बासष्ट वर्षांचे होते. तेव्हा वाचक आम्हा दोघांमधील संभाषणा बाबत कल्पना करू शकतात.

नवी दिल्ली ला पोहोचल्यावर आम्ही दोघेही आपापल्या मार्गाने निघून गेलो. हरिद्वारला जाणारी बस पकडण्यापूर्वी मला दिल्लीत काही काम होते. स्वामीजींचा सुद्धा काही कामानिमित्त एक दिवस मुक्काम होता.

मी त्याच दिवशी संध्याकाळची बस पकडली. हरिद्वारची बस ऋषिकेशच्या जवळ असलेल्या एका गावात मध्य रात्री पोहोचली. मला एवढ्या रात्री भली मोठी गर्दी पाहून आश्चर्य वाटले. माणसे रस्त्यावर झोपली होती. मला नंतर समजले की, कुंभमेळा आपल्या उच्च स्तरावर होता. हा महोत्सव दर बारा वर्षांनी एकदा गंगा नदी किनारी साजरा केला जातो. परिणाम स्वरूप कोठेही जागा न मिळाल्यामुळे अडकलो होतो. बरीच रक्कम मोजून मोठ्या मुश्किलेने एका हॉटेल मधे एक खाट मिळाली.

दुसरे दिवशी, मी उत्तर काशीला जाणारी बस पकडण्या आधी परतीच्या गाडीचे तिकीट काढण्याचा निर्णय घेतला. गर्दी बरीच असल्याने बरेच तिकीट काउंटर स्थापित केले होते तरीही मला तिकीट घेण्यासाठी बराच काळ घालवावा लागला. परिणामी उत्तर काशीला जाणारी शेवटची बस देखील सुटली. हॉटेलवर थांबण्याचा विचार व त्यांच्या भारी किंमती

ऐकून अंगावर काटे उभे राहिले. मी पुढचा तर्क संगत उपाय आचरणात आणण्याचा निर्णय घेतला. उत्तर काशीच्या दिशेने चालायला सुरुवात करायची आणि अंधार पडण्या अगोदर ज्या गावी पोहोचेन तिथे थांबावे. मला असेही सांगण्यात आले होते की जर मी ऋषिकेश (जे उत्तर काशीच्या रस्त्यावर होते) येथे लवकर पोहोचलो तर टिहरी नामक गावाला जाणारी बस मिळण्याची शक्यता आहे.

या मार्गाचा मी अवलंब केला, कारण कुंभमेळयाच्या मुख्य स्थळापासून मी जेवढा लांब जाईन तेवढेच हॉटेलचे भाडे कमी पडेल.

ऋषिकेशला पोहोचल्यावर मला समजले की टिहरीला जाणारी शेवटची बस गेलेली होती. स्थिती फारच बिघडली मला जेंव्हा कळले की येथील हॉटेल मधे सुद्धा भाडे साधारण तेवढेच होते.

परिणामी, ऋषिकेश मध्ये राहण्या खेरीज माझ्याकडे दुसरा पर्याय नव्हता.

मला परम पूज्य स्वामींनी दिलेल्या पत्त्याची त्यावेळी आठवण झाली.

परिस्थितीवश मी आश्रमाच्या दिशेने वाट चालू लागलो, संभवता मी त्या रात्री तरी निशुल्क रात्र राहू शकेन.

आश्रमाचे नाव 'योग श्री पीठ' आहे. आणि ते गंगा नदीच्या तटावर तटाच्या अगदी काठावर आहे. मला आश्रम वासींनी सांगितले की स्वामीजी अजून परत आले नाहीत. हे ऐकून माझ्या मनांत शंका निर्माण झाली की त्यांच्या जवळ रात्रीच्या मुक्कामा बाबत विचारणा करावी का नाही, शेवटी त्या विरुद्ध निर्णय घेतला.

जसा मी परत फिरून आश्रमाच्या बाहेर पडण्यासाठी निघालो तेवढ्यात अचानक स्वामीजी आश्रमाच्याच दिशेने येत होते. मला थोडा आराम वाटला आणि मी स्वामीजींना माझी परिस्थिती कथन केली. पूज्य स्वामीजींनी रात्रभर थांबण्यासाठी आनंदने अनुमती दिली.

दुसऱ्या दिवशी मी उत्तर काशीच्या दिशेने प्रयाण केले. त्या वेळी कुठे कल्पना होती की एकवीस वर्षांनंतर पुन्हा एकदा स्वामीजीची भेट होईल !

या घटने नंतर दहा अकरा वर्षांनी मी पुन्हा एकदा ऋषिकेश यात्रा केली. आता मी किशोरावस्था ओलांडून पंचवीस वर्षांचा युवक झालो होतो. मी स्वामीजींना भेटण्याचा निश्चय केला होता, पण आश्रमाचे नाव व

पत्ता माझ्या स्मरणात नव्हते, तरी सुद्धा थोड्याफार प्रयत्नानंतर आश्रमाचे ठिकाण सापडविण्यात यशस्वी झालो. मी तिथे गेलो व स्वामीजींच्या बाबत विचारणा केली. मला सांगण्यात आले की स्वामीजी हल्ली तेथे राहत नाहीत, आणि सध्या त्यांचे वास्तव्य कुठे आहे ते देखील माहित नाही. निराश होऊन मी परतलो.

मला स्वामीजींना परत भेदण्यासाठी दहा वर्षे वाट पहावी लागली. २००७ मध्ये मी हैदराबादला आलो. या वेळी मी योगा-योगाने त्याच ठिकाणी यात्रेवर आलो होतो.

या दुसऱ्या भेटीत स्वामीजी सिद्ध महायोगात मला दिक्षा देण्यास तयार झाले, आणि दुसऱ्या दिवशी सकाळी चार वाजता चा मुहूर्त निश्चित करण्यात आला. रात्रीचा मुक्काम मी माझ्या मित्राच्या घरी केला. इतर अन्य लोकांसहित मुहूर्तावर स्वामीजी समोर उपस्थित झालो.

परम पूज्य स्वामिनी प्रत्येकाच्या डोक्यावर हस्त स्पर्श केला, जेंव्हा आम्ही ध्यानाच्या खोलीत बसलो होतो. दीक्षा प्रक्रिया पूर्ण झाली होती. मला सांगितले गेले होते की दीक्षेनंतर नव दीक्षितांना स्वामीच्या सानिध्यात तीन दिवस राहण्याची आवश्यकता असते. नव दीक्षितांच्या क्रिया होत असताना याची नितांत आवश्यकता असते.

दीक्षे नंतर पहिल्या दिवशी मला एक मंत्र देण्यात आला व मला त्याचा जप करण्याचा आदेश दिला गेला. मला सांगितले गेले की काही क्रिया माझ्या शरीरात प्रकट होणे सुरू होईल. या क्रियांमुळे कर्माच्या विपरित ऐंद्रिय संस्कार जे मागच्या जन्मात जमा झालेले आहेत त्यांचे शुद्धिकरण सुरू होईल. कर्म या शब्दाविषयी काही विशेष सांगण्याची आवश्यकता नाही कारण त्याचा अर्थ सर्वांना माहित आहे.

सध्याच्या जीवनांत, मला गंभीर वित्तिय समस्यांबरोबरच वैवाहिक जीवनात समस्यांना सामोरे जावे लागत होते.

जीवनाच्या त्या काळात मी ज्या समस्यांनी पिडलो होतो, ज्याचा उल्लेख करण्याची आवश्यकता नाही, परिणामी नियमित मंत्रजप होत नव्हता. कधी-कधीच होत असे.

परंतु गुरुजी माझ्या साधने विषयी नेहमी चौकशी करीत असत. दीक्षेच्या सात आठ महिन्या नंतर गुरुं नी माझा जुना मंत्र बदलून नवीन मंत्र दिला. इथे या बदलावाची कारण मिमांसा मी करू इच्छितो. जेंव्हा

साधकाची मन:स्थिती बदलते त्या प्रमाणे मंत्र परिवर्तनाची आवश्यकता असते. कारण केवळ गुरु साधकाच्या मनःस्थितीचे ज्ञाते असतात म्हणून आवश्यकतेनुसार परिवर्तन करण्यात सक्षम असतात.

या वेळी मी माझ्या कारोभारीक तसेच वैवाहित जीवनात अजूनच जास्त समस्यांचा सामना करत होतो आणि माझी आर्थिक परिस्थिती फारच खराब झाली होती. एक पदोन्नती स्थगित झाल्याने माझ्या प्रगतीत अडथळा आला होता. माझा दुसरा विवाह आम्हा दोघांमध्ये बेबनाव झाल्याने तुटण्याच्या बेतात होता. तसेच शेअर बाजार आणि अन्य ऑनलाईन व्यवसाय घाट्यात गेला आणि मी फार मोठा कर्जबाजारी झालो.

त्यामुळे गुरुजींनी मला प्रतिकारार्थ माझ्या व्यक्तिगत जीवनांतील बिघडलेल्या स्थितीच्या संरक्षणार्थ अजून एक नविन मंत्र दिला.

परिस्थितीवश मंत्र जप नियमित करण्यास मी अजूनही असमर्थ होतो.

जी अनिश्चितता मी अनुभवत होतो ती सात-आठ महिने चालली.

या वेळी माझी परिस्थिती दूर-दूरपर्यंत सुधारण्याची कोणतीही लक्षणे दिसत नव्हती.

नकारात्मक विचारांनी मी पछाडला गेलो.

मी मरणाच्या सगळयात सोप्या उपाया बद्दल विचार करू लागलो तसेच इंटरनेटवर वेगवेगळे उपाय शोधत होतो.

माझ्या जीवनातल्या त्या कालखंडात फक्त एवढीच इच्छा करत होतो, जसे जमेल तसे बराच काळ मी स्वताला जिवंत ठेवू शकेन. मला असे वाटू लागले की सारे जग माझ्या विरुद्ध आहे.

या अतिरिक्त समस्या वाढवण्यासाठी, अशा परिस्थितीत माझा दुसऱ्या पत्नीशी घटस्फोट झाला व माझ्या वेतनातला बराच मोठा हिस्सा तिला सांभाळण्यासाठी दिला गेला. कर्जाच्या बोझ्याखाली मी एकटाच राहिलो होतो.

ऋणभाग देण्यास मी असमर्थ होतो आणि ऋणकोंनी मला त्रास देणे सुरू केले.

अशाप्रकारे भावनात्मक रुपांत मी पूर्ण रूपेण थकलो होतो आणि सतत संसारातील समस्यां बरोबर असहनीय त्रासाला सहन करत होतो.

या परिस्थितीत, माझ्या गुरुं नी अजून एकदा मंत्र बदलला.

तिसऱ्या वेळी दिलेला जप पाच-सहा महिने चालला. तरीही काही विशेष फरक पडला नाही.

मंत्र जपा बरोबर गुरुजींनी एक योगासन व प्राणायामाचा एक प्रकार करण्याचा निर्देश दिला. योग ग्रंथात याला शंख मुद्रा म्हणतात.

या आसनात एकाच वेळी दोन्ही हातांनी धैर्य धारण करून डोळे कान नाक आणि तोंड बंद करावे लागते. हाताच्या दहाही बोटांनी चेहऱ्यावरची सर्व छिद्रे बंद करण्यासाठी उपयोगांत आणली जातात. नाकाने श्वास घेऊन मानसिक रुपांत जेवढा वेळ शक्य होईल तितका वेळ श्वास धरून ठेवावा लागतो. मला माझा अंतरांत डोक्यावरील भागात सूर्याप्रमाणे एक उज्वल शक्तिशाली पांढरा प्रकाश दिसत असे. काही कालांतराने मी मुखावाटे श्वास सोडत असे. मी डोळे बंद करून एकदा पुन्हा श्वास भरून त्याच योग प्रणालीचा पुन्हा प्रयोग करत होतो. या काळात त्या उज्वल प्रकाशाला निळा, लाल, पिवळा इत्यादी रंगात बदलताना पाहिले. आता रंगाचा क्रम काय होतात हे लक्षात नाही. या प्रकारची योग क्रिया करणाऱ्यांना एक प्रकाश सहजतेने दिसतो असे मला गुरुजींनी सांगितले.

अंतरांत अशा प्रकारचा प्रकाश दिसणे योगाभ्यासात चांगली प्रगती असल्याचे लक्षण मानले जाते.

ज्या काळात मी या योगासन प्रकाराचा अभ्यास करत होतो तेव्हा माझी पाण्याची गरज फारच कमी झाली होती. मला सांगितले गेले की हे पाणी कमी होण्याची कारण तो प्रकाश होता. तसेच एका योगा शिक्षकाने मला जेवताना गाईच्या तुपाचे सेवन करण्याविषयी सुचवले. पुढे गाईच्या तुपाचे सेवन केल्यावर माझी निर्जलीकरणाची समस्या सुटली.

या योग प्रकारचा लाभ त्याच्या दुष्प्रभावा पेक्षा फार मोठा आहे. या योगासन प्रकारांचा अभ्यास करताना कोणत्याही प्रकारे संदेह वा शंका करू नये.

तरीही जे वाचक या योग प्रकाराशी परिचित नाहीत त्यांनी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शना शिवाय हा प्रयोग करू नये असा मी त्यांना सल्ला देतो.

एकदा गुरुजींनी ऋषिकेश स्थित योग श्री पीठ आश्रमी जाण्याचा कार्यक्रम ठरवला. स्वामिनी मला संपर्क करून कळवले, आणि शक्य असल्यास तिथे भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली.

त्या काळात मी जम्मू काश्मीरातील श्रीनगर शहरी राहत होतो.

मी श्रीनगर पासून ऋषिकेशला गाडी चालवत जाण्याचा निर्णय घेतला. वाचकांना सांगू इच्छितो की श्रीनगर आणि ऋषिकेश दोन्ही ठिकाणे हिमालयातील दुर्गम पर्वतांत स्थित आहेत आणि यांच्या दरम्यान सहाशे किलोमीटरचे अंतर आहे. हिमालय पर्वत शृंखलेच्या दऱ्यां बरोबर हा संकीर्ण प्रदेश भारतातील शक्ति उपासकांसाठी अनेक शक्ति केंद्रांची भरमार आहे.

मला, शक्ति उपासकांच्या मतानुसार काही प्रसिद्ध शक्ति पीठांचे दर्शन झाले. ऋषिकेश यात्रे दरम्यान सर्व शक्ति केंद्रांना नमन व दर्शन करून अंततः मी तेथे पोहोचलो. त्या ठिकाणी गुरुजी अगोदरच पोहोचले होते आणि ते माझी वाट पाहत होते.

काही दिवस आश्रमांत राहिल्यावर गुरुजींनी 'गंगोत्री' यात्रा करण्याचा कार्यक्रम ठरवला. हे स्थान हिमालयाच्या थोड्या आतल्या भागात येते आणि मला त्यांच्याबरोबर येण्याचे आमंत्रण दिले. भारतात प्रसिद्ध गंगा नदी हिमालयातील 'गंगोत्री' या ठिकाणी उगम पावते. गंगोत्री एक छोटे शहर आहे. उगम स्थान एका गोमुखा समान आहे. व ते गावापासून सोळा किलोमीटर लांब आहे.

मी त्या भूभागाशी परिचित होतो कारण गंगोत्री हिमनगावर एका सोळा वर्षीय बालकाच्या रूपात पर्वतारोहणाचे प्रशिक्षणाचे पाठ घेतले होते, आपल्या भविष्यातील गुरुची भेट झाल्यानंतर एक वर्षांनी.

वाचकांना माझी माझ्या भावी गुरुं बरोबर झालेल्या प्रथम भेटीचे स्मरण असेलच जे मी या प्रकरणाच्या सुरुवातीला केले आहे. मी, उत्तर काशी नामक एका गावाच्या रस्त्याने जात होतो. हे स्थान ऋषिकेश आणि गंगोत्री यांच्या दरम्यान स्थित आहे. मी गुरुजी बरोबर ऋषिकेश येथून निघून उत्तर काशी मार्गे शेवटी गंगोत्री या ठिकाणी पोहोचलो.

या प्रवासात आपल्या गुरुजी समवेत विस्ताराने सिद्ध महायोग पद्धती संबंधी बऱ्याच गोष्टींवर चर्चा करण्यासाठी भरपूर वेळ मिळाला. ह्या वार्तालापाच्या खोलांत मी शिरत नाही. आमच्या दरम्यान झालेले संभाषण मी आपल्या पुरते मर्यादित ठेवतो. त्याचा परिणाम माझ्या आंतरिक जीवनावर थोड्या कालावधीत दिसून आला.

वाचकांना पुढील काही परिच्छेद वाचल्यावर लक्षात येईल की गुरुजी समवेत माझी गंगोत्री यात्रेच्या वर्णनाचे काय कारण असावे.

आमची चर्चा शारीरिक पूजा-अर्चा या अतिरिक्त मानसिक पूजा

करण्याच्या गुणांवर केंद्रीत होती.

जर बुध्दि शरीरापेक्षा वास्तवात उत्तम आहे, जे व्यापक रुपांत विश्वात दोन्ही विज्ञान आणि धर्माने स्वीकारली आहे, तर शारीरिक पूजे ऐवजी मानस पुजन का न केले जावे ? सांगण्याचा भाव हा आहे की या अर्चना पूजनाचे पूर्णरूपेण कल्पना करून ईश्वराला पुष्प मानसिक रुपांत अर्पण केली जावी, शारीरिक पूजा-अर्चना करण्या अतिरिक्त.

जर बुद्धि शरीरापेक्षा उत्तम आहे तर मानसिक रुपांत केले गेलेले कार्य शारीरिक क्रियेपेक्षा उत्तम असावयास हवे. मी हा प्रश्न गुरुंच्या समोर प्रस्तुत केला.

गुरुजींनी ताबडतोब उत्तर दिले की न केवळ मानसिक पूजा शारीरिक पूजा अर्चने पेक्षा उत्तम आहे तथापि कितीतरी पटीने शक्तिशाली आहे. स्वामीजी पुढे म्हणाले की प्रत्यक्षीकरणाच्या दुर्गमतेमुळे लोकांना मानसिक रुपांत पूजा करणे कठीण वाटते. त्यामुळे सामान्यतः लोक शारीरिक पूजेचा आसरा घेतात.

चर्चेच्या शेवटी मी गुरुजींना विचारले की यापुढे मी शारीरिक पूजे ऐवजी मानसिक रुपांत धार्मिक पूजा करू शकतो का ? गुरुजींनी आशीर्वाद दिला आणि मूक अनुमती दिली. गुरुजीची संमती मिळाल्यावर मी निर्णय घेतला की यापुढे मनाने धार्मिक पूजा करेन.

ऋषिकेश यात्रे नंतर परत आल्यावर मी आपले मंत्रजाप देवी देवतांसमोर धूप-दीप आदी शारीरिक रुपांत करण्याऐवजी मानसिक अर्चनेवर भर दिला.

वरच्या परिच्छेदात मी जे लिहिले आहे, मनाला आश्चर्यचकित करणारी ती घटना समजण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे, जी माझ्या जीवनात प्रकट होण्यास सुरुवात झाली.

ऋषिकेशहून परत आल्यावर मी या मानसिक पूजेचा सहारा जिवाच्या आकांताने घेतला. मंत्र जप काही आठवडे चालू होता. कालांतराने माझे शरीरातील क्रिया-प्रतिक्रियांचे आवेगाने जप करणे असंभव झाले.

कुंडलिनी, परम मौलिक ब्रम्हांडीय शक्तिने शेवटी माझ्या गुरुं च्या माध्यमातून आपल्या दिव्य कृपेची बरसात केली.

तर, आतापर्यंत वाचकांनी अनुमान लावले असेल ती कशाप्रकारे

शक्तिशाली अवचेतन ऊर्जा माझ्या मनात घर करुन होती, आणि माझ्या गुरुं नी कशा प्रकारे इतर उपाययोजना करून त्यांना पराभूत केले जेणेकरून माझ्या शरीरात क्रिया आरंभ होतील.

सन २००७ मधे मला सिद्ध महायोग प्रणालीत दिक्षित केले गेले. माझ्या मनातील शक्तिशाली संस्कारानुसार प्रतिरोधा मुळे क्रिया लगेच सुरू होऊ शकली नाही. तेव्हा गुरुं नी सोप्या तंत्राचा उपयोग केला. माझे विस्कळीत सांसारिक जीवन, हीच त्या मागील अडचण होती. आणि गुरुं नी त्यानुसार विविध मंत्र प्रयोग केले. मंत्र आणि मनातील संस्कारांचा आपसातील टकराव याचे परिणाम क्रिया प्रकट होणे सुरू झाले. तेसुद्धा जेव्हा मी मानसिक पूजनाचा आधार घेतल्यावर. ही परिस्थिती निर्माण होण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी खर्ची घालवावा लागला.

पुढच्या प्रकरणात मी सविस्तर सांगेन की या प्रकारचा विलंब प्रत्येक साधकासाठी आवश्यक नाही. संभवता गुरुजींनी माझ्या मनाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे एका झटक्यात शक्तिशाली शक्तिचा प्रयोग केला नव्हता.

या मंत्रामुळे माझ्या जीवनात सकारात्मक स्थिती उत्पन्न होण्यासाठी कशाप्रकारे प्रभावित केले गेले ती एक वेगळीच बाब आहे. मी केवळ एवढेच सांगू इच्छितो, वास्तवात त्यांनी माझ्या जीवनात एक चमत्कार घडवला, विशेषतः वित्त परिणाम. त्या ईश्वरीय कृपा वर्षावा पुढे तो नगण्य आहे.

क्रियांचे प्रकटीकरण

२००९ मधील शरद ऋतुत एका संध्याकाळच्या सूमुहुर्तावर शक्तिपातच्या माध्यमातून सिद्ध महायोगात माझ्या दीक्षेनंतर अंततः माझ्या शरीरात क्रिया प्रकट होऊ लागल्या.

मी एका दिव्य स्त्री (देवी) च्या प्रतिमेसमोर जमिनीवर ध्यान मुद्रेत मांडी घालून बसलो होतो, आणि मंत्र जप करत होतो. माझे डोळे बंद होते आणि माझे लक्ष माझ्या समक्ष ठेवलेल्या देवीच्या प्रतिमेवर केंद्रित होते (मनःपटलावर).

वाचकांना निवेदन करतो की मंत्र व संबंधित देवी संबंधी विवरण न देण्याबद्दल मला क्षमा करावी. हे विवरण केवळ माझ्या पुरते संबंधित असल्यामुळे मी ते प्रकट करत नाही. या अतिरिक्त ते दुसऱ्या कोणालाही सांगता येणार नाही. तसेही त्याचा उपयोग इतर कोणत्याही साधकांसाठी वा सामान्य वाचकांसाठी उपयोगाचा नाही. हा मंत्र कोणाच्याही कामास येणार नाही जोपर्यंत आवश्यक दिक्षे बरोबर एखाद्या गुरुं नी दिला नसेल तर.

अचानक मला आपल्या शरीरात एक प्रकारची प्रबल लैंगिक इच्छा उत्पन्न होऊ लागली. मी एक प्रकारच्या हाताश अवस्थेत प्रवेश करू लागलो कारण माझे ध्यान अत्यंत श्रद्धा व किंकर्तव्यमूढ अवस्थेत त्या दिव्य महिलेच्या प्रतिमेवर होते. मानसिक रुपांत नियंत्रित करण्याची पराकाष्ठा करून सुद्धा शीघ्र लैंगिक इच्छा पूर्णपणे विकसित झाली.

आता खरा धक्का !

एक अवर्णनीय आणि असहनीय आनंदाची भावना गुदा व जननांगाच्या मधल्या भागात उत्पन्न झाली. या क्षणी मी माझा मंत्र जप बंद केला होता. सांगण्याचा मतितार्थ हा की जशी हि घटना प्रकट होणे सुरू झाले माझा मंत्रजप आपोआप बंद झाला. मी फारच घाबरलो होतो. मला वाटले माझे मन मला पाप करण्यास बाध्य करत आहे.

मी, जी प्रतिक्रिया जननांग क्षेत्राजवळ अनुभवत होतो त्यावर कोणतेही नियंत्रण करण्यास असमर्थ होतो. मी त्या लहरीतून उत्पन्न होणाऱ्या सुख आणि आनंदाच्या अनुभवाला थांबवण्यास असमर्थ होतो. मी काही काळ त्या ठिकाणी बसून होतो. सुख व आनंदाची अनुभूती कधी-कधी एवढी तीव्र होत असे की ती अत्यंत असहनीय होत असे. त्या अनुभवाचे सटीक वर्णन करणे माझ्यासाठी कठीण आहे.

ज्या उत्तेजनाची अनुभूती मला होत होती ती लैंगिक चरमोत्कर्षाच्या बरोबरीची होती, तरी पूर्णतः त्या स्तराची नव्हती. या शारीरिक अनुभवाची परमानंदा बरोबर कोणत्याही प्रकारे तुलना होऊ शकत नाही.

जरी, उत्तेजना यौन अंगातून उत्पन्न झाली नव्हती तरीहि अंगात उत्थान आवश्य होते. त्या नंतर एक-दोन थेंब विर्य स्खलन झाले.

उत्तेजनेचे केंद्र गुदा आणि जननांगाच्या मधे होते.

उत्पन्न आनंद कायम स्वरूप नव्हता. बऱ्याच कालावधि नंतर अचानक कधीतरी उत्पन्न होत असे. असा हा सुखाचा वा आनंदाचा आवेग एका क्षणी अनुभव केला गेला. या अनुभवाची प्रामुख्याता ही होती की हा शक्तिचा आवेग अचानक वाढणे आणि हळू हळू क्षीण होणे असहनी होत असे. काही क्षणा नंतर हा आवेग अचानक जागृत झाला. प्रत्येक वेळी हा आनंद अजु-बाजूच्या क्षेत्रात गोल लहरी प्रमाणे पसरत असे. कमित कमी हा अनुभव तरी या प्रकारे होत असे. पंधरा ते वीस मिनिटा (माझ्या फारसे लक्षात नाही) नंतर प्रतिक्रिया मंद होऊ लागली. लगेचच मी फोन उचलला आणि गुरुजींना संपर्क केला.

गुरुजींनी या गोष्टिची पुष्टि केली की क्रिया प्रकट होणे सुरू झाले आहे. त्यात घाबरण्यासारखे काही नाही. त्यांनी सल्ला दिला की प्रतिक्रिया प्रगट होण्याची प्रक्रिया सुरू होईल त्यांना मानसिक रुपांत थांबवण्याचा प्रयत्न करू नये.

सर्व ऐंद्रिय संवेदनांना शुद्ध करण्याची प्रक्रिया याच प्रकारे आरंभ होते. स्वतः सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्ति आपल्या निष्क्रिय अवस्थेतून जागृत होते आणि उलट दिशेने प्रेरित होऊन व्यक्तिच्या मानसिक संस्कारांचा विध्वंस सुरू करते. येथे वाचकांना निवेदन आहे की त्यांनी, थोडक्यात केलेल्या विवेचनातील मेरूदंड स्मरण करावे. विभिन्न शक्ति केंद्रा बरोबर सहस्त्रार प्रणाली एक अदृश्य संरचना कुंडलिनी शक्तिचे पहिले शक्ति केंद्र सक्रिय झाल्या नंतर पूर्णपणे सक्रिय होते. परिणामी त्याचा प्रभाव मना सहित शरीराच्या अणुरेणुवर अनुभव केला जातो. योग ग्रंथानुसार मानवाचे शरीर मूलतः मनाचेच प्रक्षेपण आहे. किंवा (योग ग्रंथानुसार शूक्ष्म शरीरातील संरचना ज्यांना नाड्या म्हटले जाते) मनाला प्रभावित करण्यासाठी शुद्ध केल्या जातात वा मनालाच शरीरातील नसांना प्रभावित करण्यासाठी शुद्ध केले जाते. ही संपूर्ण प्रक्रिया एकाच वेळी होऊ शकते. हे सर्व मानसिकतेवर अवलंबून आहे आणि मौलिक शक्ति त्याला मुक्त करू इच्छिते. जेणे करून अनंत जन्मात जमा झालेले ऐंद्रिय प्रभाव शुद्ध होऊ शकतील. मी या विषयाला स्पष्ट करण्यासाठी 'अनंत' शब्दाचा उपयोग करत आहे. हे कोणिही सांगू शकत नाही या अगोदर त्यांनी किती जन्म घेतले होते.

या प्रकारचे अनुभव त्या नंतरही होत राहतात.

मी दररोज मंत्र जप करण्यासाठी जमिनीवर बसे आणि या प्रकारच्या प्रतिक्रिया माझ्या शरीरात प्रकट होत असत. हा प्रकार तीन चार महिने चालला.

मी दररोज अत्यंतिक रूचीने मंत्र जप करत असे कारण क्रिया प्रकटीकरणाची प्रक्रिया फार सुखद होती. परिणाम स्वरूप मी माझ्या शरीरांत कुंडलिनी शक्ति जागृती नंतर प्रारंभाच्या काळात योगाच्या दृष्टीकोनांत भराभर प्रगती करत होतो.

जानेवारी २०१० मधे मी हिमालयाच्या खालच्या भागातील वैष्णो देवी नामक एका प्रसिद्ध शक्ति केंद्रा नजिक राहत होतो.

तिथे मी नेहेमी प्रमाणे ध्यान साधना करत असे, परंतु असे जाणवले कि क्रियांचे वेगवेगळ्या प्रकारचे प्रकटीकरण सुरू झाले.

या अनुभवाचे कथन करण्याअगोदर, मनाला अचंबित करणारा तसेच तर्क हीन अनुभवाशी मी वाचकांना ओळख करून देतो, जो माझ्या सिद्ध महायोग दीक्षे पूर्वी आला होता.

या अनुभवा बरोबर इतरही काही अनुभव आहेत, ज्याचे वर्णन मी पुस्तकात नंतर करीन. जरी या योग प्रणालीत दीक्षित होण्यापूर्वी हे अनुभव का झाले ते मी समजू शकत नाही.

शक्यता आहे की गत जन्मात मला एखाद्या योग प्रणालीत दीक्षित केले असावे अथवा एखाद्या इतर प्रकारचा योग प्रकार अनुसरला असावा. मी विश्वास पूर्वक हे सांगू शकत नाही आणि मी विनम्रतेने याचा माग घेण्यासाठी आपल्या गुरुवार सोपवले.

मला माझ्या गत जन्मा विषयी काही माहीत नाही, तरीही मला असे वाटते की मी जे अनुभवले त्याचा संबंध बहुदा मागील एखाद्या जन्याशी असावा. मी मनाला अचंबित करणाऱ्या या अनुभवासाठी इतर कोणतीही मिमांसा करू शकत नाही. माझे वय साधारणतः तीस एक वर्षाचे असावे जेव्हा ही घटना माझ्या जीवनात घडली.

आपल्या व्यवसाया कारणे हिमालयाच्या पर्वत श्रुंखलेच्या दूरवरच्या जंगलात राहत असे. एकदा मी मननशील दशेत डोळे बंद करुन बसलो होतो. अचानक मी माझ्या मनःपटलावर काळ्या रंगाला पाहिले. अचानक त्या गहन अंधारात एक प्रकारची हालचाल पाहू लागलो. ते दृष्य आकाशातील काळ्या ढगांच्या हालचाली सारखे होते. दृष्य पाहून सुरवातीला मी घाबरलो होतो. तरीदेखील मी काही काळ ते दृश्य पाहत राहिलो. जोपर्यंत माझ्या डोळ्यांना त्रास होऊ लागला.

असे दृष्य जेंव्हा मी परत पाहिले, त्यांच्या बरोबर मी एक प्रयोग केला. पुढे बरेच दिवस एकाच प्रकृतीची वेगवेगळ्या प्रकारची दृष्ये अनुभवली. काळ्या मेघाच्या बऱ्याच आकाराच्या आकृत्या पाहिल्या.

आकाशात उडणाऱ्या ढगांचे हे दृष्य पुढे बरेच वर्ष पर्यंत दिसत असे व नवनवीन आकृत्या दिसत.

एक दिवस मी आपल्या गादीवर पडलो होतो आणि नुकताच जागा झालो होतो. माझे डोळे उघडे होते व मी डाव्या कुशीवर पडलो होतो. खोलीत पूर्ण अंधार होता.

अचानक मी माझे प्रतिबिंब पाहिले. प्रतिबिंब माझ्या गादिपासून जवळच पडले होते व ते मला पहात होते. जरी, ते प्रतिबिंब नग्न व थोडे विकृत होते. हे दृश्य काही काळापुरतेच होते. मी फार घाबरलो होतो. त्या अनुभवानंतर खोलीत दिवा लावून झोपत असे.

या नंतरचे दृष्य मुख्यता एका स्त्रीचा चेहरा आणि दोन डोळे. हे

दृष्य पुढे बरीच वर्षं चालू होते. प्रत्येक वेळी मी माझे डोळे बंद करत असेल आणि अंतरात पाहण्याचा प्रयत्न केला की स्त्रीचे मुख प्रकट होत असे. मी कधीही त्या चेहऱ्याला ओळखू शकलो नाही आणि कधीतरी हे विकृत स्थितीत होत असे.

वरील दोन प्रारंभिक दृष्याशिवाय अन्य प्रकारची बरीच दृष्य मी पाहिली, त्यांचे वर्णन मी पुस्तकात पुढे करीन.

मी आता क्रियेच्या प्रकटीकरणाचे वर्णन, जे मी पहिले करू इच्छित होतो, ते करतो. एक दिवस मी रोजच्या प्रमाणे मांडी घालून ध्यानस्थ बसलो होतो. मी माझ्या मनःपटलावर एक अधोमुख त्रिकोणी आकाराचे बिंब पाहू लागलो. ते गुलाबी रंगाचे जाणवत होते, जेंव्हा माझे ध्यान या आकारावर केंद्रित होते. थोड्याच वेळात ते अंतर वस्त्राने झाकलेली एका स्त्रीच्या जनानंगाच्या रुपांत प्रकट होऊ लागले. येथे मी पाठकांना स्मरण करून देऊ इच्छितो की, भारतात शाक्त पंथी शक्ति उपासकांच्या ग्रंथानुसार, अधोमुख त्रिकोण मूल रुपांत स्त्री जननांगाशी मिळते-जुळते शक्तिचे प्रतीक आहे.

कोणत्याही साधकाच्या बाबतीत, योगाभ्यासाचा काळात अनेक बाधा उत्पन्न होतात. साधारणतः या बाधा काम-क्रिये संबंधीत विचार, धन आणि स्वभावतः अन्य सांसारिक मुद्दे उदाहरणार्थ. नैतिकता, पाप इत्यादी विचारांशी संबंधित असतात. सर्वोच्च शक्ति अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया प्रकट करून सुनिश्चित करते की ते संस्कार पूर्णतः साफ व्हावेत. या प्रतिक्रिया साधकांचे चारित्रावर आधारित असतात जे त्याने स्वतः गोळा केले असतात.

आणखी एकदा, मी गादीवर ध्यान अवस्थेत लीन मांडी घालून बसलो होतो. जवळपास तासा भरानंतर एक दिव्य स्त्रीचे रूप माझ्या मनःपटलावर दिसू लागले. असे जाणवू लागले की ती स्त्री माझ्या मुखा जवळ येत आहे. मानसिक रुपांत मी त्या आकृतीला दूर लोटण्याचा प्रयत्न केला.

आता, हे शक्तिपात पद्धतीच्या अभ्यास-सिद्धांताच्या विरुद्ध आहे. क्रियेचा प्रतिकार वा एखादा ऐच्छिक प्रयत्न करून ते थांबवू नये. मी मानसिक रूपात त्या दिव्य स्त्री आकृतीला विरोध करून नियमभंग केला

होता.

परिणामी, ती दिव्य स्त्री आकृती मनःपटलावरुन लुप्त झाली. त्या ऐवजी, पुढे विचित्र सापासारखे जीव प्रकट होऊ लागले आणि चावण्याच्या हेतूने माझ्या जवळ येत असत. या वेळी येन केन प्रकारेण गंभीर मानसिक व्याकुळतेने आपल्या स्वतःला सांभाळत होतो. ही परिस्थिती काही काळ सुरू होती व त्या नंतर ती दिव्य आकृती परत एकदा प्रकट झाली. यावेळी ती दिव्य आकृती माझ्याजवळ आली मी बस एक मूक दर्शकाच्या रुपांत बसलो राहिलो.

मी व्दिधा अवस्थेत होतो, एक मन क्रियेला अंत:पटलावर काम करण्याच्या हेतूने अनुमतिच्या उद्देशाने प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करत होते तर दुसरे मन मला आठवण करून देत होते की अंतः पटलावरील या क्रियेला अनुमती देणे एक घोर पाप आहे.

या प्रकारे माझे मन दोन सीमांमधे आंदोलित झाले होते. मी एक संत आणि एका पाप्याच्या मधोमध चाकूच्या तीक्ष्ण धारेवर चालत होतो. पुण्य आणि पाप यांतील अंतर झपाट्याने कमी होत होते.

जे मी अनुभवत होतो ते सर्वोच्च शक्तिद्वारे सर्व ऐंद्रीय प्रभावांना शुद्ध करत होती आणि मी फक्त एक साक्षी बनून ते पहात होतो जेव्हा ती क्रिया प्रत्यक्ष प्रकट झाली.

एखादा बालक जेंव्हा चालायला शिकत असतो, त्यावेळी त्याला एखाद्या पांगुळ गाडीची आवश्यकता असते. एकदा का बालक चालणे शिकला की त्याला पांगुळ गाडीची अडचण होऊ लागते. बालक तेव्हाच धावायला लागेल जेव्हा तो पांगुळ गाडीला दूर लोटतो.

हेच सर्व धर्म प्रणालीत, दर्शन, सिद्धांत इत्यादी बरोबर घडते. एखादा मनुष्य शरीरातील मेरुदंडातील आधार स्थित निष्क्रिय कुंडलिनी शक्ति जागृतीच्या मार्गावर या मार्गातील सर्वांचा आधार घेऊ शकतो. प्रत्यक्षांत एकदा लक्ष प्राप्ती होते तेव्हा सर्व मंदिर, देवता, देवी इत्यादी क्षणभरात दूर होतात.

मला या मनाला चकित करणाऱ्या घटनांबाबत अधिक विस्ताराने सांगावसे वाटते.

या विश्वात प्रत्येक व्यक्तिचे व्यक्तिमत्व एका विशिष्ठ रुपांत संचालित असते. व्यक्तिच्या अद्वितीय चरित्राच्या आधाराने, परम दिव्यता

देखील एखाद्या अनोख्या रुपात कृपा आशीर्वाद देत असते.

समजा एखादी व्यक्ति धन एकत्र करण्याची आदी आहे, तर जेंव्हा दिव्यता आपल्या आशिर्वादाची बरसात करेल, ती व्यक्तिच्या जीवनातून सर्व धनाला दूर लोटण्याच्या दिशेने प्रकट होईल. प्राचीन संस्कृत ग्रंथानुसार ही सर्व शक्तिमानाची विशेष कृपा आहे, विशेषत: त्या लोकांसाठी, जे अपार धन एकत्र करण्याच्या मार्गावर होते. इथे मी वाचकांना सूचित करू इच्छितो की संस्कृत ग्रंथानुसार धना मागे धावणे हे देखील सर्व शक्तिमानाला भेटण्याचा एक मार्ग आहे.

या बिंदूच्या स्पष्टिकरणार्थ प्राचीन ग्रंथातील एक छोटी रोचक गोष्ट वाचकांना सांगू इच्छितो. एक संस्कृत विद्वान होता. तो फार धार्मिक होता परंतु त्याला सर्व शास्त्र ज्ञानाचा गर्व होता. एके दिवशी या सज्जनाने एका मंदिरात प्रवेश केला. तेव्हा त्याला जोरदार धक्का बसला. एक वृद्ध माणूस मंदिरातील देवाच्या मूर्तिवर पाय ठेवून जमिनीवर झोपला होता. भयंकर क्रोधित होऊन तो या वृद्धावर बरसला. वृद्धाने नम्रतेने त्याला सांगितले की त्याच्या डोळ्यात काही दोष असल्या कारणे तो पाहू शकत नव्हता. त्याने विद्वानाला प्रार्थना केली की त्यांनी पायांना बाजूला सरकावावे जेथे एखादी दिव्य मूर्ती नसेल. त्या विद्वानाला आश्चर्याचा झटका बसला. त्या वृद्धाच्या पायांना ज्या ज्या दिशांना हलवण्याचा प्रयत्न केला तेथे तेथे दिव्य मूर्ती प्रकट होऊ लागली. परमेश्वराने विद्वानांवर आशीर्वादाचा पाऊस पाडला आणि त्या वृद्धाशी भेट घडवून आणले. ही कृपा इतकी दिव्य होती की कोणत्याही प्रयत्ना शिवाय क्षणार्धात संस्कृत विद्वानाला विनम्र केले, कारण तो वृद्ध योगाच्या अत्यंत उन्नत अवस्थेत होता.

अशा प्रकारे मन नाटकीय रुपांत परिवर्तित होते जेंव्हा अशा प्रकारच्या घटना योग साधकाबरोबर घडतात. ज्या प्रकारचे चरित्र व्यक्तिने संचित केले असेल त्याच्या आधारानेच काहीतरी घडते.

जर योग साधक या घटना प्रकारानंतरही देवी-देवतांना सोडण्यास इच्छुक नसेल तर पुढची प्रगती होऊ शकत नाही. मन उच्च स्तरांवर उन्नत होत नाही. देवी-देवता प्रगतीमध्ये एक बाधा बनतील. मंदिर आणि धार्मिक स्थळे शाश्वत आत्म्याच्या स्वतंत्रेत बाधा बनतील.

सांगण्याचे तात्पर्य हे की एखाद्या विशेष रुपांत भगवंतांची पूजा कधीतरी संपणे आवश्यक आहे. मन निराकार दिव्यतेच्या दिशेने आकर्षित

व्हावे, जो सर्वव्यापी आहे आणि एखाद्या मंदिराच्या परिघाने सीमित नाही.

येथे, सर्व वाचकांना सूचित करू इच्छितो की मनावरचा वास्तविक प्रभाव आणि परिवर्तन कशाप्रकारे आणले जाते, हे साधकाच्या अद्वितीय चरित्रावर अवलंबून आहे. त्यामुळे जाणून-बुजून क्रिया-प्रक्रिया विस्ताराने सांगितल्या नाही त्याबद्दल मी वाचकांची क्षमा याचना करतो.

प्रत्यक्षांत, एवढे पुरेसे आहे जर वाचक हे समजू शकले की काही घटनांचा इतका जबरदस्त मानसिक वा शारीरिक प्रभाव होऊ शकतो की मनाचे परिवर्तन क्षणभरांत होते. या प्रकारच्या प्रतिक्रिया वा घटना (ज्याप्रकारे अधोरेखित परिच्छेदात वर्णित केले आहे) सर्वोच्च, सर्वज्ञ ब्रम्हांडीय शक्तिद्वारे सुनिश्चित केले जाते, परिणामी साधकाची मनःस्थिती नाटकीय रुपांत परिवर्तित व्हावी

नंतर मी माझ्या क्रियांविषयी गुरुं ना विस्ताराने सांगितले. गुरुजींनी फक्त एवढेच सांगितले होते की काही साधक त्या आत्मिक अवस्थेप्रत उन्नती करतात पण सावध रहावे लागेल की त्या उच्च मंचावरून पतन न व्हावे.

ध्यानाच्या या एका अनुभवाने माझ्या जीवनात संपूर्ण परिवर्तन घडवले.

या घटने नंतर मी सहसा (कमीत कमी स्वेच्छेने) मंदिरात जात नसे.

माझे विचार, माझा विश्वास, माझ्या रुढी-परंपरा सर्व ध्यानाच्या एकाच सत्रात वाहून गेले. जे सिद्धांत, रुढी, दर्शन मी आपल्या डोक्यात गोळा केली सर्वकाही ध्यानाच्या एका सत्रात नष्ट झाली.

मी कोणतेही शास्त्र अभ्यासण्याची रुची घालवली आणि सार्वजिनिक शारीरिक आणि मानसिक धार्मिक कार्यक्रमापासून निष्क्रिय होऊन दूर झालो.

मी स्वप्नात देखील विचार करू शकत नाही की दिव्यता, आत्म बोधाची प्रक्रिया बरेचदा एवढी क्रूर होऊ शकते.

सर्वज्ञ सर्वोच्च लौकिक शक्तिला माझे नमन ! कारण तीच एकमेव सर्वात उत्तम प्रकारे जाणते की कशी चुटकीसरशी मनात जमलेली घाण साफ करायची !

कर्नल टि श्रीनिवासुलु

परम पूज्य गुरुजींना माझे नमन ज्यांची ही हीच प्रवृत्ती आहे की मनातला अंधार नाहीसा करणे, जेणे करून प्रत्येक व्यक्तिच्या अंतरात खोलांत असलेला आत्म्याचा अनंत प्रकाश प्रज्वलित होऊ शकेल.

या अनुभवानंतर माझे जीवन पुनश्च पूर्वीसारखे राहिले नाही.

सहस्रारात शक्तिचे आरोहण

एका शुभ दिवशी रात्री नऊ वा दहा वाजण्याच्या सुमारास मी गुरुजीच्या खोलीत बाजूच्या गादीवर ध्यानस्त बसलो होतो ध्यानावस्था साधारणतः दोन तास चालू होती.

अचानक मला माझ्या मेरुदंडात एका विचित्र प्रकारच्या हालचालीचा आभास झाला. हा भास एखाद्या बेडकाच्या हालचाली प्रमाणे जाणवला. मला गुरुजींनी सांगितले की ती शक्तिची क्रिया होती, जिने माझ्या मेरुदंडाच्या आधाराने वर चढणे सुरू केले. कधी एके ठिकाणी थांबे कधी अकस्मात वाढत मेरुदंडाच्या वरच्या भागात पुढे सरके. अंततः माझ्या मेरुदंडाच्या हृदय क्षेत्राच्या जवळ जाऊन थांबली. मी स्पष्टपणे समजाऊन सांगू इच्छितो की या घटनेचा अनुभव निश्चितच सुखावह नव्हता. खरे सांगायचे तर या घटनेला मानसिक रुपांत घटित होताना पाहून त्रासिक अवस्थेप्रत पोहोचलो होतो.

जरी पश्चात दृष्टीने या अनुभवाला अद्वितीय आणि अद्‌भुत म्हटले जाऊ शकते. मी पहिल्यांदाच आपल्या शरीरांतर्गत शक्तिची गती आणि प्रवाह अनुभवत होतो. हा अनुभव आधुनिक विज्ञानाद्वारे केलेल्या सर्व तर्कसंगत व्याख्या फोल ठरवणारा होता. वाचक आता चांगल्या प्रकारे माझ्या मनावर पडलेल्या प्रभावाचे अनुमान काढू शकतील. मी योग ग्रंथात जे काही वाचले होते, त्याची पुष्टी या अनुभवाने निःसंदेह पणे केली होती.

परिणामी माझा विश्वास श्रद्धे मध्ये परिवर्तित झाला.

नंतर गुरुजींनी मला समजावले की मी जे अनुभवले ते शरीराच्या सूक्ष्म नाडी तंत्राची (जसे संस्कृत ग्रंथात म्हटले जाते) शुद्धि ची सुरुवात होती.

दुसरे दिवशी काही कारणामुळे गुरुजीशी माझी भेट होऊ शकली नाही.

मी खुर्चीत बसलो होतो आणि नेहमीप्रमाणे ध्यानात लीन होतो.

थोड्याच वेळांत मी माझ्या मेरुदंडांत वर वर चढण्याचा काही अनुभव करत होतो. मानसिक रुपांत मी एखाद्या बेडकाच्या उड्या मारण्यासारख्या गतिची अपेक्षा करत होतो, तो अनुभव मी आदल्या रात्री घेतला होता. परंतु शक्ति संचलनाच्या गतीने एका नव्या तंत्राचा अवलंब केला होता. आज साप जसा जमिनीवर नागमोडी वळणे घेत चालतो तशी वळत वळत जात होती.

माझ्या वाचनात आले होते ज्यात कुंडलिनी शक्तिला सापाशी तुलना केली होती. परंतु हा अनुभव वेगळा होता.

हा खरोखरच भयानक होता. मी क्रीयेच्या प्रकटीकरणाने उल्हासित होतो. तरी प्रत्यक्षात, या घटनेत आनंद अनुभवाला येत नव्हता. पुन्हा एकदा शक्ति पुढे सरकत मेरुदंडात हृदयाच्या आसपास येऊन थांबली.

ध्यानातून उठल्यावर लक्षात आले की हा भास साडेतीन तास सुरू होता. त्या दिवशी जेवण झाल्यावर, मला पुन्हा ध्यानाला बसण्याची इच्छा झाली. या वेळचे सत्र तीन तास सुरू होते.

मी संपूर्ण दिवस विस्मित अवस्थेत होतो.

मी त्या दिवशी रात्रीचे भोजन झाल्या नंतर पुन्हा ध्यानाला बसलो. या वेळचे सत्र जवळ जवळ अडीच तास चालू होते. तर, मी त्या दिवशी जवळ जवळ साडे नऊ तास ध्यानात बसलो, एक अशी घटना जी पुन्हा कधीच घडली नाही.

दुसऱ्या दिवशी मी गुरुजींना भेटलो, स्वामीजी म्हणाले योग्यांच्या दृष्टीने साडे नऊ तास काही विशेष नाही तरीही माझ्यासारख्या व्यक्तिसाठी खरोखरच एक आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होती. स्वामीजी पुढे म्हणाले की एकाच दिवसात ध्यानाचा हा मोठा काळ एक क्रिया होती. येथे मी वाचकांना सूचित करू इच्छितो की क्रिया एकाच सत्रात प्रकट व्हावी असा

काही नियम नाही. शक्यता आहे की जशी मी अनुभवली ती पूर्ण दिवस चालू होती. स्वामीजींनी हे पण सांगितले की अशा प्रकारची क्रिया सामान्यतः साधका द्वारे पूर्व जन्मकृत गंभीर साधनाभ्यासाचा परिणाम असतो.

स्मरण असावे पूर्व जन्मामध्ये घडलेल्या चांगल्या कर्माचा प्रभाव चुकीच्या कार्या प्रमाणे मनातून साफ होणे आवश्यक आहे.

जेथे योगाचा संबंध आहे, तिथे एकद चांगले वा वाईट कर्म याचा फरक पडत नाही. सर्वच स्वच्छ होणे आवश्यक आहे. जसे मी पूर्वी देखील सांगितले की मनात संचित सर्व सिद्धांत, रूढी, दर्शन आणि सर्व काही नष्ट होणे आवश्यक आहे. जेणे करून परम ज्ञानाचा अनंत प्रकाश चमकावा.

मला विस्ताराने समजाऊ द्या.

समजा एखाद्या व्यक्तिने गत जन्मात प्रगाढ ध्यान योगाचा अभ्यास केला असेल. या साधनेचा ऐंद्रीय प्रभाव अचेतन मनावर (soul conscious) पडेल. व त्याचा प्रभाव देखिल नेहमीसाठी नष्ट होणे आवश्यक आहे. अन्यथा गत जन्मकृत त्याची स्मृती देखील एक संस्कार निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरेल आणि ज्ञान प्रकाशाच्या प्रकटीकरणा मधे बाधा उत्पन्न करेल.

या प्रकारे जर व्यक्तिने आपल्या पूर्व जन्मात धार्मिक प्रथा, समाज सेवा धर्मार्थ संघटनेसाठी दानाच्या रुपांत फार मोठे कार्य केले असेल, जरी ही सर्व कार्य संसारिक दृष्टीकोनातून स्तुत्य होती; तरीही अनावधानाने अंतर्मनांत गर्वाची झलक स्मृतीवर आवश्य पाडली असणार. पूर्ण ज्ञान प्रकाशाच्या प्रकटीकरणासाठी त्या स्मृतींना साफ केले पाहिजे.

दुसरे दिवशी ध्यानात मला अजून एक अनुभव आला. नेमकी तारीख, स्थान आणि मंत्राचा उल्लेख येथे करत नाही त्याबद्दल क्षमा प्रार्थना करतो. ज्या वेळी मी हा अनुभव घेत होतो, त्यावेळी पुस्तक लेखना विषयी काहीही प्रयोजन नव्हते. त्यामुळे एखादी सूची बनवलेली नव्हती ज्यांत या अनुभवांची नोंद केली जावी. जेव्हा हा अनुभव लिहिण्याचा प्रसंग आला, त्या अनुभवांच्या स्मृतींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला. परिणामी घटना क्रमांत व अनुभवात काही त्रुटी आवश्यक असतील.

या वेळी मी ध्यानात लीन होतो. शक्ति नेहमी प्रमाणे वरच्या

दिशेने आरोहण करत होती. या वेळचा अनुभव एकदम भिन्न होता. त्या वेळी माझ्या पाठीवर चढण्याचा प्रयत्न बऱ्याच मुंग्यांनी करावा असा जाणवत होता. मला पाठ खाजवण्याची तीव्र इच्छा झाली कारण ही अनुभूती फार बोचरी होते. परत एकदा शक्ति प्रवाह मेरुदंडात हृदया जवळ येऊन थांबली.

दुसरे दिवशी मी गुरुं ना हा अनुभव सांगितला. स्वामीजी म्हणाले लवकरच ही शक्ति अजून वर चढेल आणि माझ्या डोक्यातील प्रत्येक मांस पेशी, माझे कान, डोळे, नाक, तोंड, गाल तसेच केसांवर देखील प्रकट होईल. स्वामी हे देखील म्हणाले माझ्या डोक्यातून बाहेर पडून बाह्य दुनियेत सुद्धा जाईल.

या अनुभवा नंतर मी आपल्या दैनंदीन जीवनात परत आलो.

इथे मी वाचकांना सूचित करू इच्छितो की माझ्या सहस्त्रार मेरुदंडातील शक्तिचे आरोहण योग ग्रंथात लिहिण्या प्रमाणेच होते, केवळ एक विशेष प्रकारची गती वगळता. शक्ति आरोहणाची एक गती पक्षाच्या भरारी मारण्या सदृश्य असते.

जरी, मी नम्रपणे सांगू इच्छितो की या प्रकारच्या गतीचे आरोहण माझ्या मेरुदंडात झाले होते, तरी मी त्या अनुभवाचे नेमके वर्णन करण्यास असमर्थ आहे. अर्थातच त्या प्रकारच्या गती विषयी स्पष्ट मत देऊ शकत नाही.

पुढे मी विस्तार पूर्वक सांगेन, माझ्या मेरुदंडातील कुंडलिनी शक्तिची आरोहण प्रक्रिया फार जटिल निघाली. या तथ्यामुळेच या अनुभवांविषयी लेखनासाठी नोंद केली नाही. सर्व अनुभवांचे वर्णन करणे अत्यंत कठीण आहे.

मी नियमीत ध्यानाला बसत असे आणि मेरुदंडात शक्तिचे आरोहण निरंतर होत होते.

ध्यानाच्या एका सत्रात, शक्तिचे आरोहण माझ्या नाभि क्षेत्रात झाले ज्याला योग ग्रंथात मणिपूर चक्र म्हटले जाते. शक्तिचे आरोहण या क्षेत्रापर्यंत येऊन थांबले आणि विचित्र प्रकारे मेरुदंडाच्या भोवती द्रुत गतीने गोल फिरणे आरंभ केले. त्या गतिची तुलना साधारण गतिशी करता येणार नाही. मी फक्त एवढेच सांगू शकतो शक्तिची जटिल आणि तीव्र गती मी मेरुदंड अनुभवत होतो. तरीही ती गती तेवढ्या क्षेत्रा पुरती मर्यादित

होती. इतर ठिकाणी पसरली नाही.

याच प्रकारे, ध्यानाच्या इतरही सत्रात, मी शक्तिचे आरोहणाचे अन्य विचित्र प्रकारच्या गतीला अनुभवले. कधी-कधी असे जाणवत असे की शक्तिचे आरोहण एखाद्या सूक्ष्म मार्गातून पुढे सरकत आहे. जणु काही माझ्या मेरुदंडाच्या हाडाला भोक पाडून !

ध्यानाच्या प्रदीर्घ सत्रा नंतर मला अत्यंत शांत आणि सहज भावाचा आभास होत होता. तरीही मी अजून एक प्रकारच्या क्रियेचे वर्णन करू इच्छितो त्याला मी माझ्या डोक्यात अनुभवत होतो. मला बरीच वर्ष पर्यंत डोक्यात एक प्रकारचे भारीपण जाणवत होते. या भारीपणा बरोबरच डोक्यात दिवस-रात्र एक प्रकारचा मादक प्रभाव राहत असे. फारच अल्प काळासाठी, आणि ते सुद्धा सकाळी झोपेतून जागे झाल्यावर मला डोक्यात हलकेपणा जाणवत होता. अन्यथा, माझ्या डोक्यात निरंतर एक विचित्र प्रभाव असे, जसे एखादी रासायनिक प्रक्रिया तेथे चालू असावी. त्या अतिरिक्त जेंव्हा केव्हा शक्तिचे आरोहण डोक्याच्या भागात असे त्याचा अनुभव मला माझ्या डोक्याची त्वचा व केसांत सुद्धा जाणवत असे.

परंतु मी कधीही आपल्या डोक्याच्या क्षेत्रातील हालचालीमुळे कोणताही दुष्प्रभाव अनुभवला नाही ना शारिरीक रुपांत वा सामान्य दिनचर्येत.

शक्तिचे गतिविज्ञान

मागच्या प्रकरणात मेरुदंडातील कुंडलिनी शक्ति आरोहण विषयावर थोडा प्रकाश टाकला होता. या क्षेत्रातील इतर प्रतिक्रियां विषयी पुढील प्रकरणांत विवरण सादर करेन. मागच्या प्रकरणात त्यांचा उल्लेख केला नाही कारण क्रियांची प्रकृती भिन्न आहे.

वाचकांना मी सांगू इच्छितो की क्रिया दिवस-रात्र प्रत्येक क्षणी चालू असते. या क्रिया शरीरातील सर्व कोषांत एकाच वेळी होऊ शकतात किंवा वेगवेगळ्या कोषात कोणत्याही एकाच कोषात. याशिवाय, त्या शरीर, मन तसेच दैनिक जीवनांत वेगळ्याच अनियमबध्द होऊ शकतात. या क्रिया-प्रतिक्रियांना वर्गीकृत करणे अत्यंत कठिण आहे. तरीही या प्रकरणांत क्रियां विषयी माझ्या अनुभवांना पुढे प्रस्तुत करत आहे.

माझ्या मेरुदंडातील प्रकारात शक्ति आरोहणाने नाड्यांमध्ये गारुड्याचा पेटारा उघडा केला.

मी दिवस-रात्र, प्रगाढ निद्रा सोडल्यास, शरीरात शक्ति संचाराचा अनुभव करत होतो.

या पुढे मी जे सांगणार आहे त्याने तुम्हाला आश्चर्य वाटू शकते. असे समजू नका की शक्ति प्रगाढ निद्रेत काम करत नसते. मी याची काही उदाहरणे देऊ इच्छितो, त्यावरून वाचक याची कल्पना सरळ-सरळ करू शकेल. शक्ति साधकाला योग्य ती जागरूकता देऊन हे सुनिश्चित करते की

त्याला आठवण असावी की शरीर, मन व बाहेरील घटनांमध्ये क्रियांच्या प्रकटीकरणावर त्याचे काही नियंत्रण नाही. त्यामुळे काही प्रतिक्रिया अशा असतात, ज्या तार्किक व्याख्यांच्या परे असतात. या प्रकरणात अशा काही प्रतिक्रियांची उदाहरणे दिली आहेत, जी वाचकांना त्याविषयी विचार व्यक्त करण्यास पुरेशी आहेत.

एक दिवस मी दुपारी झोपलो होतो. आणि अचानक फोनची घंटी वाजू लागली. मी उठलो आणि टेलिफोन वर बोललो - दुसऱ्या व्यक्तिने चुकीचा नंबर फिरवला होता. या टेलीफोन कॉलने माझी झोपमोड झाली होती. मी आपल्या गादीवर परत येऊन झोपलो आणि लगेचच क्रियांना सुरुवात झाली व मेरुदंडात तीव्र कंपने उत्पन्न करू लागली. साधकाचे झोपेचे चक्र आणि झोपेची वेळ जबरदस्तीने ब्रम्हांडीय शक्तिद्वारा नियंत्रित केले जाते. अशाप्रकारे बऱ्याच वेळा माझी झोपमोड होत असे.

एकदा, मी एक स्वप्न पाहत होतो. अचानक मी एक वेगळेच स्वप्न पाहू लागलो ज्याने मला एवढे भयभीत केले की मी खडबडून जागा झालो. लगेचच क्रिया सुरू झाली आणि माझे संपूर्ण मेरुदंडात तीव्र संवेदना सुरू झाल्या.स्वप्नावस्था व जागृतावस्था या दोघांच्या मधे एक अवस्था असते ज्याला संस्कृतात तंद्रा अवस्था म्हणतात. परंतु ही अवस्था संसारात फारच थोड्या लोकांच्या अनुभवात येते. योग ग्रंथानुसार अधिकंशतः यांना चार अवस्थांत विभागले जाते. त्याचा उल्लेख असा - जाग्रत, स्वप्न, निद्रा, तुरीय अवस्था (अति चैतन्य अवस्था / निर्विचार अवस्था) स्वप्नावस्था आणि जाग्रत अवस्था यांच्या मधली जी तंद्रा अवस्था आहे त्याबाबत विशेष माहिती उपलब्ध नाही.

बहुदा प्रत्येक दिवशी मी या अवस्थेत प्रवेश करीत असे. या अवस्थेत बहुदा मी विचित्र स्थान गाव, खेडे, शहर पाहत असे. यातील काही स्थाने आधुनिक गाव, खेडे शहरा प्रमाणे होते. मी त्यांना ओळखू शकलो नाही कारण मी कधीही त्या भागात फिरलो नव्हतो. कधीतरी मी या विभिन्न घरांवर लिहिलेल्या पाट्या वाचण्याचा प्रयत्न करत असे. परंतु दृश्य क्षणिक असत तसेच पटापट बदलत असत. परिणामी मी नावे व इतर सांकेतिक लक्षणे लक्षात ठेवू शकत नसे. या अतिरिक्त काही बाबतीत तर भाषा सुद्धा परिचित नसे. कधीतरी इतकी विचित्र स्थाने पाहत असे की अचंबित होत असे की अशा प्रकारची विचित्र जागा धरतीवर असेल ! या

अतिरिक्त मी ज्ञात-अज्ञात अवजारे फुलझाडे, लोकांचे चेहरे, लोकांचे पोशाख, वाहन इत्यादी पाहत असे. जी दृश्य मी पाहत असे ती एकदम स्पष्ट असत.

ही न संपणारी यादी आहे. या अवस्थेत दररोजच जात असे व दृश्य पाहत असे. या प्रकारच्या क्रिया ऐकल्यावर तुमचा नक्कीच विश्वास बसेल की या जन्मापूर्वी आपले अनेक जन्म झाले असणार.

अशा प्रकारे सर्वोच्च मौलिक शक्ति जे काही संस्कार जमा केले गेले त्यांना पुन्हा मनःपटलावर प्रक्षेपित करून कायम साठी पुसून टाकते.

या संस्कारांना स्वच्छ करण्याबरोबर व्यक्तिच्या वर्तमान जीवनात इतरांबरोबर जी भावनात्मक आसक्ती आहे ती देखील नष्ट होते.

आपल्या मागील अनंत जन्मात व्यक्ति प्रेमिकांचा प्रियकर असेल, अनेक वडिलांसाठी मुलगा, अनेक मुला-मुलींचा पिता, अनेक मित्रांचा मित्र, अनगिनत मातांसाठी मुलगी, बालकांसाठी आई इ.

या अतिरिक्त, बाह्य सामाजिक जीवनातील जिव्हाळा कोणत्याही पश्चातापाशिवाय नष्ट होतो.

व्यक्ति स्वतःच्या अंतरात प्रसन्न राहू लागतो.

हीच मनाची स्थाई शांतता आहे !

या प्रकारचे आत्मज्ञान, मनांत आवश्यक परिवर्तनाची सुरवात करते जेणे करून स्थाई आनंद आणि शांती मनाला प्राप्त होऊ शकेल. ह्या प्रकारे सर्व भावनात्मक आसक्ति संपवून परम मौलिक शक्ति व्यक्तिवर आपला कृपाप्रसाद प्रकट करते. मन एवढ्या उच्च स्तरावर आरोहण करते की मनःपटलावर कोणत्याही वस्तूचा प्रभाव पडत नाही. ना सुख ना दुःख जीवनातील कोणतेही व्दैत मनावर कोणतीही छाप पाडू शकत नाही.

व्यक्तिगत व अंतर्मनात पूर्णतः संतुष्ट होतो आणि कोणत्याही बाह्य स्त्रोताची आवश्यकता उरत नाही.

याप्रकारे सिद्ध महायोगाद्वारे ही दिव्य पद्धत साधकाला अमरतेकडे घेऊन जाते.

वाचकांना समजावण्याचा एक प्रयत्न हा आहे की मनाचे परिवर्तन रातो-रात होत नाही. बराच कालावधी जातो. कधी-कधी शक्ति मनाला पटकन उच्च स्तरावर पोहोचवते. परंतु मन तेवढ्याच घाईने परत घसरत जाते, आणि नंतर हळू हळू वर चढते. त्यामुळे योगाभ्यासाची ओढ

आवश्यक आहे.

आता मी शरीरातील विविध नाड्यांमध्ये शक्तिच्या प्रवाहाच्या गतिशीलते कडे वळतो.

बराच काळ मी मूलाधारात शक्ति प्रवाहाचा अनुभव करत असे आणि कधीतरी इतर भागात. कधी-कधी मी मूलाधारात वा त्याच्या आजूबाजूला शक्ति क्रिया अनुभवत असे. तरीही बराच काळ शक्ति क्रिया कुल्यांच्या चहू बाजूला पसरणारा.गुदा क्षेत्रा जवळच सीमित होता. याचे कारण असे असू शकेल की कुंडलिनी शक्तिचे स्थान मेरुदंडाच्या आधार स्थानी स्थित आहे. या अतिरिक्त योग ग्रंथानुसार शक्ति आपल्या निष्क्रिय अवस्थेत जागृत झाल्यावर मूलाधाराच्या आधारा पासून आरोहणाला सुरवात करते. त्यामुळेच मी या क्षेत्राच्या आजूबाजूला असंख्य वेळा शक्ति क्रियांचा अनुभव घेत होतो.

बरेचदा ध्यानाला सुरुवात करताना तीव्र लैंगिक इच्छा उत्पन्न होत असे की मी संडासात जाऊन नंतर ध्यान साधनेने लीन होत असे.

बरेचदा माझे अंतर्वस्त्र विर्य स्खलनामुळे ओले होत असे.

पुढे मी नग्नावस्थेत ध्यानाचा अभ्यास सुरू केला.

बरेचदा ध्यानावस्थेत वीर्य आसनावर टपकत असे.

बरेचदा, जीवनातील, निकट आणि आदरणीय व्यक्ति संबंधी काम-क्रिये संबंधीत घृणित विचार माझ्या मनावर छाप पाडत असत. मला दृश्य देखील दिसत पण मी एका मूक दर्शकाच्या रूपात निरंतर प्रयासरत होतो.

या प्रकारच्या क्रियांमुळे संभवता कामभावने संबंधित बरेच विचार मनात उठत असत, ते सुद्धा सन्मानित वा दुर्लक्षित लोकांच्या संबंधी. या मुळे एक मानसिक आघात उत्पन्न होऊ शकतो आणि व्यक्तित हा भाव निर्माण होऊ शकतो कि तो जीवन जगण्याच्या लायकीचा उरला नाही.

होय, जी धूळ मनांवर वर्षानुवर्ष एकत्र केली गेली आहे तिला कायमसाठी घालवणे आवश्यक आहे. एका साधकाच्या मनाशी सर्वोच्च मौलिक शक्तिचा खेळ आहे ! सर्व भय, चिंता, लैंगिक कल्पना, विचित्र विचार, नैतिकता, पाप-पुण्याच्या धारणा, योग्य-अयोग्य आचरणाच्या धारणा सर्व काही शेवटच्या वेळी (वा अनेकदा) मनाने अनुभव करणे

आवश्यक आहे, या आधीचे जे काही संचित संस्कार आहेत ते स्थाई रुपांत कायमचे संपावे.

विचित्र विचार देवी-देवता संबंधी स्वप्ना सहित माझ्या मनात कोंडले जात असत. मी विचारांना कधीही थांबवण्याचा प्रयत्न केला नाही आणि बस एका मूक दर्शकाच्या रुपांत दृढ राहिलो. आपल्याच मनांत एकत्र केलेली धूळ साफ होताना पाहत होतो.

मी याची कल्पनाही करू शकत नाही की आत्मबोधाच्या मार्गावर परमात्म्याच्या कृपेचा परिणाम मानसिक रूपात एवढी क्रूर प्रक्रिया असू शकते.

शक्ति माझ्या शरीराच्या प्रत्येक भागात प्रवाहित होत होती. याचा प्रभाव मी माझ्या डोके, कान, नाकपुड्या, नाक, तोंड, जिभ, गाल, डोळे, गळा, हात, खांदे, तळहात, बोटे, पोट, जांघा, माझे पाय, पायाचा तळवा इथपर्यंत अनुभव करत असे.

शक्ति कधी-कधी कंपन सदृष्य असे तर कधी तिची प्रक्रिया बोचरी असे. ही हालचाल बरीच वर्ष चालू होती.

शक्ति संचालनाच्या पद्धतीचे वर्णन करणे कठीण आहे. कधी-कधी अशा अजब आणि विचित्र पद्धतीची असते की त्या पद्धतीचे जगाच्या पाठीवर उदाहरण सापडणे अशक्य असे. शक्ति शरीराच्या प्रत्येक अंग प्रत्यंगातून जात असे. मी आपल्या गुरु अथवा थोडक्याच साधकांसमवेत त्या अनुभवा संबंधित चर्चा करू शकतो, इतरांशी नाही.

ते अनुभव संपूर्णतः तर्कहीन होते आणि तसेही मी कधी त्या गोष्टीकडे विशेष लक्ष दिले नाही की ते विज्ञानाधिष्टित आहेत वा नाही.

मेरुदंडस्थित विशेष प्रतिक्रिया

श्वास मनाचे कार्य आहे. अनैसर्गिक श्वसनाची प्रक्रिया त्याच वेळी घडते जेव्हा मन शांत नसते. वाचक या तथ्याशी परिचित आहेच. व्यक्ति जेव्हा उत्तेजित वा क्रोधित होतो तेव्हा श्वसन शांत नसते. त्याची गती तीव्र होते. त्याच प्रकारे व्यक्ति जेव्हा भयभीत वा तणावग्रस्त असतो तेव्हा सुद्धा श्वसन शांत नसते. योगात जेव्हा मन शांत सुस्थित होते तेव्हा श्वसनाची ही अप्रकृतिक प्रक्रियेला पूर्ण विराम लागतो. प्रत्यक्षात ते संपूर्णत: थांबत नसते कारण प्रत्येकजण योगाच्या त्या उन्नत अवस्थेत नसतो. परंतु पाहणाऱ्याला असे जाणवते श्वास थांबला आहे. या कारणामुळेच योगी हवे शिवाय ध्यानात लीन राहू शकतो. श्वास थांबल्यामुळे सर्व जैविक प्रक्रियांना, आयुष्मान प्रक्रिये सहित जवळ जवळ पूर्णविराम लागतो. यामुळेच योगी बराच काळ भोजन-पाण्या शिवाय ध्यानमग्न स्थितीत राहण्यासाठी सक्षम असतात. हे विज्ञानाशी संगत आहे की नाही, निश्चित नाही. क्रिया जेंव्हा या दोन (श्वास आणि मन) च्या संबंधात प्रकट होत असे तेव्हा मला श्वसन थांबल्याचा अनुभव होत होता. या अतिरिक्त, जी अवस्था मेरुदंडाच्या एका विशिष्ट क्षेत्राशी संबंधित होती.

अशाच एका प्रसंगी, मी तंद्रावस्थेत आपल्या बिछान्यात पहुडलो होतो. तेव्हा मला जाणवले शक्ति माझ्या मेरुदंडात धावत आहे. अचानक ते

नाभि क्षेत्रात अंकुचन पाऊन केंद्रित झाली (पण माझ्या पाठीत) मला असे जाणवले की ती मेरुदंडात एका विवक्षित स्थानात पूर्णपणे केंद्रित होत आहे.

अचानक माझे फुफुस रिकामे झाले आणि माझा श्वास काही क्षणासाठी थांबला.

नंतर, मी आपल्या गुरुजींना हा अनुभव सांगितला. स्वामीजी म्हणाले लवकरच शक्ति माझ्या हृदय क्षेत्रानजिक (मेरुदंडात) त्याच प्रकारे कार्य करेल. स्वामीजी पुढे म्हणाले श्वासाची ही स्थिती जेव्हा हृदय क्षेत्राच्या जवळ घडते, जेव्हा साधकाला पतनाची शंका उरत नाही . येथे मी सर्व वाचकांना सूचित करू इच्छितो की योगाचा कोणत्याही साधकांसाठी सर्वात मोठे भय योग मार्गात केलेली प्रगती पासून घसरणे वा भरकटणे समजले जाते. तरीही, काही पायज्या पार झाल्या नंतर हे भय योग साधकाच्या मनांतून निघून जाते आणि मन देखील उच्च स्तरावर पोहोचते. या अतिरिक्त, जरी साधक पुढच्या पायऱ्यावरून घसरला तरी ती फार मोठी घसरण ठरत नाही.

या अनुभवानंतर काही आठवड्यांनी जेव्हा मी तंद्रावस्थेत आपल्या बिछान्यायात पडलो होतो, अजून काहीतरी घडले. मी माझ्या मेरुदंडाच्या नाभि क्षेत्रापासून निघून अचानक वाहणाऱ्या प्रवाहाला अनुभवले. शक्तिने मेरुदंडातील हृदय क्षेत्राच्या दिशेने वर चढत एक विचित्र हालचाल करणे आरंभ केले. ही गति फार तीव्र आणि शक्तिशाली होती. मला असे जाणवत होते की माझी पाठ एखाद्या अज्ञात दबावाने दडपली जात आहे. मला एका विवक्षित स्थानावर अंकुचना बरोबर दबावाचा एक भारी जमाव हृदय क्षेत्राच्या नजीक (मेरुदंडाच्या हाडांवर) अनुभव होत होता.

मी आपल्या गुरुंचे स्मरण केले आणि त्यांना नमस्कार केला.

अचानक शक्ति माझ्या खांद्यासकट संपूर्ण पाठीवर चारही दिशांनी पसरू लागली. शक्ति प्रवाह माझ्या पाठीत काही मिनिट चालला. संपूर्ण प्रकार असा होता की मला शक्ति माझ्या गादीवर दाबण्याचा प्रयत्न करत होती जसे काही एखादा भारी पेहेलवान मला जमीनीवर दाबून ठेवत आहे. एवढा शक्तिचा जोर होता. तरी माझा श्वास बंद झाला नव्हता. जसे मी अगोदरच उल्लेख केला आहे की जेंव्हा शक्ति प्रवाह सुरू झाला त्या वेळी मी तंद्रावस्थेत होतो. जेव्हा शक्तिचे (पाठीच्या कण्यात) नाभि क्षेत्रापासून

आरंभ झाला त्या वेळी मी पाठीवर झोपलो होतो. ताबडतोब मी वळलो आणि पोटावर झोपलो, जेणे करून शक्ति प्रवाह स्वतंत्रपणे व्हावा. काही मिनिटानंतर, अजून शक्तिच्या क्रिया चालूच होत्या, काही काळासाठी मी स्वप्नावस्थेत गेलो. माझे स्वप्न संपले तरीही मी शक्ति क्रियेच्या प्रभावाला अनुभवण्यास पूर्ण समर्थ होतो.

क्रिया लगेचच बंद झाली आणि मी स्वप्न आणि तंद्रावस्थेतून बाहेर आलो. आणखी काही काळ मी गादीवर पडून राहिलो नंतर उठलो आणि माझ्या गुरुजींना फोन केला. संपूर्ण अनुभव गुरुजींना कथन केला. स्वामीजी म्हणाले या सर्व प्रकारच्या प्रतिक्रिया मुळात भौतिक शरीरा संबंधी आहेत आणि लवकरच शक्ति मनांत आणि बाह्य घटनां मधे सारख्याच प्रकारे प्रकट होईल. स्वामीजी म्हणाले की ते या घटनेने प्रसन्न झाले व पुढे म्हणाले याचे चांगले परिणाम पहायला मिळतील.

काही आठवड्या नंतर, मला आणखी एक जोरदार अनुभव आला जरी तो श्वासाशी संबंधित नव्हता. मी तंद्रावस्थेत आपल्या बिछान्यावर पहुडलो होतो जेव्हा पाठीच्या कण्याच्या आधाराने शक्ति वरच्या दिशेने चढू लागली. शक्तिची गती तीव्र होती. तरी, ती फारच शक्तिशाली जाणवत होती जरी ती एखाद्या गाठोड्यात बंदिस्त होती. माझ्या डोक्यात पोहोचल्या नंतर मला असे वाटत होते कि माझ्या डोक्यात स्फोट करत आहे. आपले डोळे बंद करून, रंगी-बेरंगी प्रकाशाच्या तुकड्यांना पाहू शकत होतो त्या नंतर मी संपूर्ण शांत भावाचा अनुभव केला. माझे मनाने त्यानंतर एकदम गहन शांत आणि सुस्थिर अवस्थेत प्रवेश केला. मी जेंव्हा केंव्हा पवित्र ओमकाराचे उच्चारण (एक-दोन वेळाच) करत होतो, लगेच क्रिया सुरू होत असे आणि शक्ति माझ्या मेरुदंडात गतिमान होत असे. त्याच बरोबर, शक्ति मेरुदंडांतर्गत स्थित चक्र वा शक्ति केंद्रा पैकी एखाद्या केंद्रात एकत्रित होत असे, त्या नंतर माझ्या डोक्यातील सहस्त्रारा पर्यंत प्रवाहित होई. येथे मी वाचकांना सूचित करू इच्छितो की मेरुदंडातील शक्ति प्रवाह कोणत्याही चक्रापासून सुरू होऊ शकतो. हे आवश्यक नाही की त्याची सुरवात मूलाधारातूनच व्हावी. शक्ति कोणत्याही चक्रात सक्रिय होऊन आरोहण करू शकते.

अनेकदा, मी शक्तिचे एकत्रिकरण आणि संकुचन माझ्या

भुवयांच्या मध्य भागी वा योग ग्रंथानुसार आज्ञा चक्रावर देखील अनुभवले. ज्या संवेदना मी अनुभवल्या त्याचे सही वर्णन करणे मला अशक्य आहे. तरीही मी तसा प्रयत्न करतो. भ्रुकुटी मधे मला एक सरसराट जाणवत होती - कधी बोचरी तर कधी स्पंदाप्रमाणे. मला त्या स्पंदनांची अनुभूती माझ्या डोक्याच्या मागच्या बाजूला देखील होत असे (आपल्या भुवयांना समांतर).

अनेक वेळा, जेंव्हा, मी निद्रेतून जाग्रतावस्थेत परत येत असे, मला समजत असे की मी प्रगाढ निद्रेत देखील मंत्र जप चालू ठेवला होता. जेंव्हा मी जाग्रतावस्थेत परत येत असे तेव्हा माझे ओठ हालताना आणि मंत्रोच्चार होत असल्याचे जाणवे. असे अनेकदा घडले.

ध्यानावस्थेत, जळती मेणबत्ति, हलता कंदील, पूर्ण चंद्र, तारे, सूर्य आणि एकदा कडकणारी वीज यांचे दर्शन झाले. हे दर्शन तंद्रावस्थेत देखील घडले. सामान्यतः ते काही क्षणांसाठी असे.

बरेचदा मला पौर्णिमेचा चंद्र आणि हलत्या कंदिलाचे दर्शन झाले. माझ्या गुरुजींनी मला सांगितले अशी स्वप्न 'विशोक' प्रकाशरुप नावाने संबोधली जातात.

संस्कृत मधे विशोक शब्दाचा अर्थ 'जो शोक दूर करतो'. मनःपटलावर या प्रकारच्या प्रकाशाचे दिसणे योगाभ्यासात चांगल्या प्रगतीचे द्योतक मानतात. कधी कधी ध्यानात मला मनःपटलावर विचित्र अज्ञात प्रकाश चमकताना दिसत असे.

ध्यानाच्या प्रारंभिक महिन्यांच्या दरम्यान माझ्या शरीरात जेंव्हा क्रिया होणे सुरवात झाले होते त्या नंतर मला मझ्या मनःपटलावर तेजस्वी प्रकाशाचे दर्शन होत असे कधी-कधी ते सूर्य प्रभेप्रमाणे तेजस्वी आणि बराच काळ असे, वर वर्णित 'विशोक' प्रकाशाच्या विपरीत जे केवळ काही क्षणांसाठीच दिसत असे.

ध्यानाच्या कालांत आणि तंद्रावस्थेत देखील हिंदू देवी-देवता, ऋषि मुनी, भगवान बुद्ध, इसाई क्रॉस आणि अन्य साधू-संत जे विविध धर्मी वा विचार धारांशी संबंधित असत, त्यांचे देखील दर्शन होत असे.

बरेचदा, ध्यानाच्या चांगल्या सत्रात लीन असतांना इतका परम आनंदाचा अनुभव करत असे की मी माझे डोळे उघडण्यास असमर्थ होत असे. माझे मन डोळे उघडण्याची अनुमती देण्यास इच्छुक नसे. माझ्या

पायाच्या दुखण्यामुळे - जे अशा प्रकारचे प्रदीर्घ काळ बसल्याने होत असे जबरदस्तीने डोळे उघडून ध्यान थांबवण्यास भाग पडत असे.

त्या वेळी मी तेवीस वर्षाचा असेन जेंव्हा मला प्रथमतः च अनाहत ध्वनी ऐकायला येणे सुरू झाले.

प्रथमतः 'अनाहत' या शब्दाचा काय अर्थ आहे ते सांगतो.

हा मनात ऐकू येणारा एक ध्वनी आहे. जो ना तो बाहेर वा शरीरांत कोणत्याही गडबड-गोंधळा शिवाय ऐकू येतो. हा ध्वनी साधकाला आतल्या आत ऐकू येऊ शकतो. इतरांना कोणाला ऐकू येत नाही. या ध्वनी ला अनाहत म्हटले जाते कारण तो 'अनाहत चक्र' (हृदय क्षेत्रात) या संबंधित आहे.

गुरु कृपेने सक्रिय कुंडलिनी शक्ति मेरुदंडातील विभिन्न क्षेत्रातील चक्रांचे भेदन करत आरोहण सुरु करते. शक्ति जेंव्हा हृदय क्षेत्रात पोहोचते, अनाहत ध्वनी ऐकू येऊ शकतो. हा ध्वनी आंतरिक वा बाह्य कोणत्याही प्रहारा शिवाय उत्पन्न होतो. त्या मुळे सुलभतेने तार्किक अनुमान लावू शकतो की हा ध्वनी कुंडलिनी शक्ति आहे. किंवा असेही म्हणता येईल की आपल्या मौलिक स्वरूपात कुंडलिनी शक्ति ध्वनी सदृश प्रकृती आहे. संयोगवश ती छेडलेल्या तारेच्या सिद्धांतानुसार आधुनिक विज्ञानाशी मिळती जुळती आहे. सैधांतिक भौतिक माझ्या संक्षिप्त माहिती नुसार सर्व छेडलेले तार प्रकाराच्या लहरी अपरिहार्य रुपांत संगीत ध्वनी आहेत. तारेचा प्रत्येक कण एका लहरिशी जुडलेला आहे जो एका ध्वनि निर्मिती साठी साधन रुप आहे. शक्य आहे की हा संस्कृत वर्णमालेच्या प्रत्येक अक्षराशी जुडलेले ध्वनी साधन असू शकेल. जे मानवाच्या शरीरात मेरुदंडातील प्रत्येक चक्रात स्थित आहे. संभवतः या कारणामुळेच या पवित्र शब्दांश 'ओम' ला सर्वोच्च शक्ति मानले जाते, ज्यातून या ब्रम्हांडाची निर्मिती झाली.

मी माझ्या कानात सापाचा फुसकार सदृश ध्वनी नेहमी ऐकत असे. हा ध्वनी गेली वीस वर्ष मी ऐकत आहे. तसेच आता हे पुस्तक लिहिताना देखील ऐकू येत आहे.

सात आठ वर्षानंतर हा ध्वनी अधिक तीव्र गतीने ऐकू येत आहे. प्रगाढ निद्रे अतिरिक्त हा ध्वनी सतत ऐकू येतो. कधी-कधी चीड उत्पन्न होते अन्यथा मला त्याने इतर काही त्रास नाही.

काही वर्षां नंतर, मला अन्य प्रकारचा ध्वनी ऐकू येऊ लागला

त्याचा प्रकार मधमाशीच्या गुणगुणण्या प्रमाणे असे. कधी घंटेचा झंकार ऐकू येई. तर कधी सुमधुर बासरीचा.

कधी-कधी थोड्या अवधीसाठी पावसाचा ध्वनी ऐकू येई. लगोलग मी बाहेर जाऊन पाहत असे परंतु वातावरण अगदी सामान्य असे. कधी तरी मला झोपेत दरवाज्याची घंटी वाजल्याचा आवाज येई, मी लगेचच बाहेर जाऊन दरवाजा उघडत असे परंतु बाहेर कोणीच नसे. व आपल्या मोबाईल ची घंटी ऐकू येई, लगेचच मी झोपेतून जागा होत असे व उत्तर देत असे आणि लक्षात येत असे की कोणीही प्रत्युत्तर देत नव्हता.

झोपेत अश्या प्रकारचे विघ्न बरेचदा अनुभवले.

कधीतरी, मला एक विचित्र प्रकारचा सुगंध येई, वा मुखात थोडीशी गोड चव.

जवळ जवळ त्याच वेळी, जेव्हा मला 'अनाहत' ध्वनी ऐकू येणे सुरवात झाले होते (तेविसाव्या वर्षी). मला माझ्या मेरुदंडात स्पंदनाची अनुभूती होऊ लागली होती. पुढच्या काळात स्पंद गती अधिक तीव्र होत गेली. अनाहत ध्वनी बरोबरच, मी गेल्या वीस वर्षात मेरुदंडात स्पंदनाचा अनुभव देखील घेतला आहे. माझ्या शरीरांतर्गत चाललेल्या त्या हालचालीमुळे माझ्या स्वास्थ्यावर कोणताही परिणाम झाला नाही.

वाचक असा प्रश्न विचारू शकतात की २००७ मधे माझी सिद्ध महायोग प्रणालीत दीक्षा झाली होती, तर मी तेविसाव्या वर्षापासून अनाहत ध्वनी आणि मेरुदंडातील स्पंदनाचा अनुभव कसा काय घेत असावा. शक्य आहे की गत जन्मातील एखाद्या जन्मात या योग प्रकारात दीक्षा झाली असावी. त्या बाबतीत मी काही संकेत करण्यास असमर्थ आहे. ते मी नम्रतापूर्वक माझ्या गुरुं वर सोडतो.

जसे मी या अगोदरही सांगितले आहे, माझे वय तीस एकतीस वर्षांचे असावे जेव्हा माझ्या मनात गत जन्मातील स्वप्नांची रीघ लागली होती. प्रत्यक्षांत, ती स्वप्न मला माझ्या गत जन्माविषयी कोणतीही माहिती देत नसत. त्यामुळे आपल्या गत जन्मा विषयी कशाचेही स्मरण करण्यास असमर्थ आहे.

शक्ति आणि साधकांमधील पडदा

योग ग्रंथानुसार, मानवाच्या मनांत नउ प्रकारच्या भावना असतात. यांत भय, क्रोध, लोभ, वासना, अहंकार इत्यादी येतात.

सर्वोच्च मौलिक शक्ति नाना प्रकारच्या क्रिया प्रकट करते ज्या कारणे साधकाच्या मनातील भावनांचे सर्व च्या सर्व नऊ प्रकाराशी संबंधित ऐंद्रीय प्रभाव कायम स्वरूपी नष्ट व्हावेत. शक्ति मनांतील या भावनांचे बीज नष्ट करते जेणेकरून कोणत्याही प्रकारच्या शारीरिक वा मानसिक स्थितीत अंतरात अंकुरित होऊ नये. परिणामी साधक कायम स्वरूपी सर्व विचार आणि भावनांपासून मुक्त होतो. वाचक आता सहज समजू शकतील की अशा प्रकारच्या विचार व भावना दडपून टाकून वा कोणत्याही प्रकारचे नियंत्रण लाभदायक होऊ शकत नाही. त्यांचे कायम स्वरूपी नष्ट होणे आवश्यक आहे, आणि हे केवळ दिव्य शक्ति द्वारेच संभव होऊ शकते.

साधक खरोखर चमकतील, जेव्हा त्यांच्या अंतरातील अचेतन संस्काराची संख्या समजेल. साधक कोणत्याही ऐच्छिक प्रयत्नाशिवाय आपल्या अंतःकरणात प्रकट होणाऱ्या आणि झळकणाऱ्या विचारांचे अनंत वास्तविक प्रकार पाहतील.

दिव्य शक्ति मनात खोलवर जाऊन कधीतरी जमा केलेल्या सर्व संस्कारांना त्यांच्या प्रभावांना व्यापक रुपात शुद्ध करेल.

जस जसे ऐंद्रिय प्रभाव नष्ट होत जातील तस तसे मन शांती आणि

सौहार्दाच्या एका अवस्थेकडे सरकत जाईल. परिणाम स्वरूप प्रत्येक मनुष्याच्या अंतरात स्थित आत्मा वा संपूर्ण चेतना मनाच्या शांत अवस्थेत आपल्या वास्तविक प्रकृतीची झलक प्रतिबिंबित झालेली पाहील.

ती अत्यंत उज्वल सूर्य प्रकाशाच्या स्वरुपांत माझ्या मनांत प्रकट होत असे. कधीतरी तो सूर्यप्रकाश कमी प्रमाणात असे जणु काही धुराच्या एका हलक्या चादरीच्या पडद्याने झाकला असावा.

परंतु या उज्वल प्रकाशाची झलक महत्त्वाची नसून त्याचा साधकाच्या मनावर काय परिणाम झाला. त्याच बरोबर ही स्थिती किती काळापर्यंत स्थाई होती ते महत्त्वाचे आहे. सामान्यपणे एखाद्या ध्यानाच्या उत्कट सत्रा नंतर, प्रभाव, साधारणतः दोन ते तीन दिवस असतो, जरी, हा कालावधी पूर्णतः निश्चित करता येत नाही.

अगोदरच मी हे स्पष्ट केले आहे, कोणतेही ऐंद्रिय प्रभाव रातोरात नष्ट करता येत नाहीत. ही एक क्रमिक प्रक्रिया आहे आणि ती सुद्धा बऱ्याच कालांतराने साध्य होते.

हे स्पष्ट करण्यासाठी मी काही घटनांचे वर्णन करतो की कशा प्रकारे ऐंद्रीय प्रभाव (भावनांचे नऊ प्रकार) मनातून मिटवले जातात. ऐंद्रीय प्रभावांना संपवण्यासाठी परम शक्ति हे निश्चित करते की एखादी घटना (त्या विशेष भावाशी संबंधित) साधकासाठी सहज रुपांत अनुभवली जावी. कधी-कधी एक अनुभव बरेच वेळा बराच काल पर्यंत पुन्हा पुन्हा अनुभवला जाऊ शकतो, या प्रकारे हळूहळू भावनांचा जाडा थर नष्ट केला (तेही एका त्वरित गतीने). प्रत्येक योग साधकाने हे लक्षात ठेवायला हवे की सामान्य व्यक्तिच्या तुलनेत त्याची नियति एका तीव्र गतीने प्रकट होते. एका प्रकरणात मी त्याचे सविस्तर वर्णन केलेले आहे. या प्रक्रियेच्या काळात सर्वज्ञ शक्ति हे सुनिश्चित करते की त्याच बरोबर संबंधित व्यक्तिचे मानसिक संतुलन बिघडू नये.

जेव्हा मी जम्मू-काश्मीर मधे श्रीनगरला राहत होतो त्यावेळी पहिल्यांदा उघड पणे शक्तिच्या क्रियांना सुरवात झाली. परिणामी अनावधानाने अहंकाराच्या भावनेने भरून आलो. मी एखाद्या महान ऋषि प्रमाणे व्यवहारात वागू लागलो होतो, हा प्रभाव गत जन्मातील संचित असेल, असे ही असू शकतो.

मला सांगितले गेले की श्रीनगरला कोण्या एक पर्वत शिखरावर एक गुफा होती जेथे भारतातील लोकप्रिय संत श्री शंकराचार्य हजार

वर्षांपूर्वी ध्यान साधनेत बसत असत.

मला ओढ लागली, त्या ठिकाणच्या शक्तिशाली तरंग आणि शांत वातावरणाचा लाभान्वित होण्याच्या हेतूने त्या ठिकाणी जाऊन साधन करण्याचा विचार नक्की केला.

मी पर्वत शिखरापर्यंत माझ्या चारपाईने गेलो. पुढे गुहेच्या दिशेने पायी चालत गेलो. खडा पहाड होता. गुफा फारच लहान होती जास्तित जास्त सहा ते आठ माणसे बसू शकत होती.

मी गुहेत गेलो, एका कोपऱ्यात मांडी घालून बसलो परंतु तो पर्वत आता श्रीनगर मधील एक पर्यटन क्षेत्र झाले होते. त्यामुळे गुफेत लोकांचे येणे जाणे सुरु होते.

सुरवातीला मन फार अस्वस्थ होते, जरी गुहेतील वातावरण फार चांगले होते, आतील तरंग फार शक्तिशाली होते आणि मी त्यांना स्पष्टपणे अनुभवत होतो. नंतर अचानक असे घडले.

मी ध्यानावस्थेत लीन झालो ते दोन तासापेक्षा अधिक काळ चालू होते. मी गुहेतल्या उघड्या बोडक्या दगडावर जमिनीवर बसलो होतो. माझ्या पायाची बोटे जमिनीवर चिकटलेली होती.

जरी, माझे शरीर पूर्णतः निःस्पंद होते आणि मुद्रा दगडाप्रमाणे पूर्णतः स्थिर होती. हळु हळु पर्यटकांचा आवाज शांत होत गेला आणि मी गहन शांत ध्यानावस्थेत लीन झालो. या अवस्थेत देखील मी पर्यटकांचा आवाज ऐकू शकत होतो. माझ्या ध्यानावस्थेबद्दल बोलले गेलेले उल्लेखनीय शब्द सुद्धा ऐकू शकत होतो.

अचानक माझ्या अचेतन मनांच्या खोलीत अहंकाराची भावना जागृत झाली. मी स्वतःला फार महान ऋषि समजू लागलो. ध्यानाची संपूर्ण गंभिरता अस्थाई रुपांत पळून गेली. मी अंतरात, होणाऱ्या प्रतिक्रियांच्या फार आधी गर्वाने फुलून गेलो होतो, त्या स्थितीत बसलो होतो. थोड्या वेळानंतर मी ध्यानाच्या सामान्य अवस्थेत परत आलो.

मनातील अभिमानाच्या भावनेने संबंधित सर्व ऐंद्रीय प्रभावांची शुध्दि अशा प्रकारे झाली. त्या साठी आवश्यक वातावरण निर्मिती शक्तिने स्वतःच निर्माण केली व त्यानिमित्त मला गुहेत ध्यानासाठी जाण्यास उद्युक्त केले होते.

२९-११-२०११ ला मी वैष्णोदेवी नामक एका प्रसिद्ध मंदिरी

दर्शनार्थ श्रीनगरहून कारने जात होतो. वाटेत रात्रीच्या मुक्कामासाठी जवळच्या अधमपूर नामक शहरात थांबलो. मी माझ्या मित्राबरोबर राहिलो होतो. त्यानेच मंदिर दर्शनाची योजना आखली होती.

दुसरे दिवशी आम्ही दोघ हिमालयातील त्रिकुटा नामक पर्वतावरील कटरा शहराच्या दिशेने निघालो. वैष्णोदेवी मंदिर याच पर्वत शिखराच्या खाली एका गुहेत आहे. हे स्थान विशेषतः शक्ति भक्तांसाठी भारतातील सर्वात लोकप्रिय धार्मिक स्थळांपैकी एक स्थळ आहे.

आम्ही दोघे एका जीप गाडीने गेलो आणि सकाळी नउ-दहाच्या सुमारास कटरा शहरी पोहोचलो. मी घोडेसवारी करण्याचा प्रस्ताव पुढे केला पण माझा मित्र धार्मिक कारणाने पायी चढण्याच्या मन:स्थितीत होता.

कटरा शहरी पोहोचेपर्यंत माझी मनोदशा बदलली आणि मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी हेलिकॉप्टरने जाण्याचा बेत आखला. तेव्हा तिकिटासाठी हेलिपॅड वर पोहोचलो. हेलिपॅडवर आम्ही तिकीटाची चौकशी केली तेव्हा कर्मचाऱ्याने हात वर केला. माझ्या लक्षात आले की या क्षणी पर्वत शिखराचे वातावरण पूर्णतः बदलले आहे. आकाश ढगांनी भरले असल्याने सध्या हेलिकॉप्टर सेवा स्थगित केली आहे. आम्हाला सांगण्यात आले की सकाळपासून भली मोठी लाईन लागली आहे.

निरुपाय झाल्याने आम्ही भाड्याने घोडेसवारी करण्यास राजी झालो आणि पर्यायी स्थानावर पोहोचलो. मला तेंव्हा जोरदार झटका बसला जेव्हा मला समजले की सरकारी नियंत्रणा विरुद्ध घोडेवाल्यांनी काम बंद केले आहे. काही काळासाठी काम स्थगित केले होते. मी पालखीची चौकशी केली पण त्यांनीही काम स्थगित केले होते.

हेलिकॉप्टर, घोडा, पालखी अभावी पायी चढण चढण्या शिवाय कोणताही पर्याय आमच्या समोर उरला नव्हता.

शेवटी निर्णय घेण्याची वेळ आली की पाई चढणे वा घरी परत जाणे. माझा मित्र, जो माझ्या लहानपणापासून बरोबर होता, माझ्या विकलतेचा आनंद घेत होता आणि खळखळून हसत होता. शेवटी मनाला समजावून पाई चढण्याच्या विचाराशी मला नाखुशीने राजी व्हावे लागले.

उभ्या पहाडावर आम्ही साधारणत: चौदा किलोमीटर चढलो असू. सामान्यतः तिथे चढण्यासाठी चार-पाच तास लागतात. आम्ही दोघे अर्धे अंतर पार केल्यावर, अचानक एक गोंधळ झाल्याचा आवाज कानी

पडला.

हेलिकॉप्टर सेवा पूर्ववत सुरु झाली होती, घुडसवार अचानक दिसू लागले आणि पालखी वाल्यांचा व्यवसाय सुरु झाला होता. आम्ही त्या गोंधळाचे कारण विचारले.

आम्हाला सांगण्यात आले सरकारी यंत्रणेबरोबर समेट झाल्याने घोडेवाल्यांनी हरताळ मागे घेतला.

या अतिरिक्त, माझ्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी, एका घोडेवाल्याने लगेचच माझ्या समोर येऊन सेवेसाठी विचारणा केली.

मला ही चढण भोगण्यासाठी बाध्य केल्याने मी मा वैष्णो देवी विरुद्ध एवढा क्षुब्ध झालो होतो की उरलेली चढाई पायीच जाण्याचा निर्णय घेतला. आश्चर्यकारक रुपांत पुढचा रस्ता बराच सुविधाजनक असल्याने मला जराही थकवा जाणवला नाही.

सर्वोच्च शक्तिद्वारे सर्व अहंकारी प्रभावांची मानसिक शुद्धतेची प्रक्रिया अशी असते.

काही दिवसानंतर, ३ डिसेंबर २०११ ला मी देवास शहरी नारायण कुटी संन्यास आश्रम नामक योग आश्रमांत गेलो होतो. वाचकांना आठवत असेल की मी एका प्रकरणात या आश्रमा विषयी लिहिले आहे.

मला नंतर समजले की आश्रमांत एक गुंफा आहे ज्यात अनेक संतांनी गंभीर ध्यान साधनेचा अभ्यास केला होता. स्वाभाविकपणे माझी रुची जागृत झाली आणि मी गुहेत बसून आपला मंत्र जप सुरू केला.

मला आश्चर्याचा धक्का बसला. मला मंत्राची एक ओळ देखील आठवत नव्हती.

माझ्यासाठी हा फार मोठा झटका होता कारण बऱ्याच काळापर्यंत मी तो मंत्र जप केला होता. काही वेळ मंत्राच्या ओळी आठवण्याचा प्रयत्न केला. शेवटी मला विचार सोडावा लागला. मी पूर्णपणे निराश झालो आणि माझ्या खोलीत परत आलो. जसा मी माझ्या खोलीत पाय ठेवला लगेचच मंत्र्याच्या ओळी स्मरणात आल्या.

दुसरे दिवशी पुन्हा आश्रमांच्या गुफेत ध्यान साधनेसाठी गेलो आणि मंत्र जप सुरू केला. अचानक बाहेर जोरदार पाऊस सुरु झाला.

माझ्या ध्यानात व्यत्यय आला आणि मी डोळे उघडले, गुफेत पूर्ण अंधार होता वीज प्रवाह बंद केला होता. मी विचार केला की साधनेत बसून राहणे उत्तम. तेव्हा मी पुन्हा डोळे बंद केले.

गुहेच्या बाहेर सतत पाऊस पडत होता आणि गुहेच्या छतावर पावसाच्या पाण्याचा सपका चालू होता. ध्यानाच्या या पूर्ण काळांत पूर्ण जागृतावस्थेत गुंफेतील वीज प्रवाह खंडित झाल्यामुळे पूर्ण अंधारात एकाच ठिकाणी एकटाच बसलो होतो. या अतिरिक्त माझ्या मनात हे विचार देखील येत होते की गुंफा आश्रमातील इतर भागापासून दूर होती. गुंफेच्या बाहेर ढगांचा गडगडाट, विजा आणि सतत पाऊस पडत होता.

मी कुठेतरी वाचलं होतं की त्या गुहे मधे पिशाच्य आणि मानव आत्म्यांचा निवास होता. पिशाच्य याचा अर्थ वाईट आत्मा असाच होत नाही. परंतु एखादे पिशाच्य संपूर्ण शरीरा शिवाय एक आत्मा. तो मानव वा कोणत्याही पशूचा असू शकतो. या अतिरिक्त हे निश्चित नाही मानव आत्मा पुन्हा केवळ मानवाच्या रूपातच पुन्हा जन्म घेईल. जीव पतित होऊन पशूच्या रुपांत जन्म घेऊ शकतो, त्या नंतर पुन्हा मानव रुपांत. योग ग्रंथानुसार ही एक सामान्य घटना आहे. जी जिवित प्राण्याबरोबर होते. या कारणामुळेच असे म्हटले जाते की सर्वोच्च दिव्यता पृथ्वीवर राहणाऱ्या प्रत्येक प्राण्यात निहीत असते.

हा विचार माझ्या डोक्यात घुसला होता कि गुंफेत काही आत्मा स्थित आहेत, माझ्या आजूबाजूच्या वातावरणाचा तसेच मनांतले विचारांचा मनावर पगडा बसला होता, मी अचानक फारच घाबरलो.

या अज्ञात भयाने मी हडबडलो. ही मानसिक अवस्था बराच वेळ टिकली. शेवटी मी डोळे उघडून अंधारात डोळे फाडून पाहण्यास बाध्य झालो. मी ध्यानावस्थेत बसू शकलो नाही. त्याच बरोबर मला हे ही माहीत होते की अंतरातील भयाच्या क्रियेला थांबवणे शक्तिपात पद्धतीच्या सिद्धांताच्या विरुद्ध होते. मनाच्या या द्विधा अवस्थेत काही मिनीटे घालवल्यावर मी आपल्या मोबाइल फोनचा दिवा पेटवून गुहेतून बाहेर निघण्याचा निर्णय घेतला.

हे आपल्या सर्व भय प्रभावापासून मनाच्या शुद्धि च्या प्रक्रियेचे एक उदाहरण आहे. (विशेषतः आत्मा आणि पिशाच्या संबंधी) जे ब्रम्हांडीय शक्ति द्वारे केले जाते.

जेंव्हा मी देवास शहरात होतो, अजून एका महत्त्वपूर्ण स्थानी जाण्याचा निर्णय घेतला. मला समजले होते की शंभर वर्षापूर्वी नाथ परंपरेतील उच्च पदस्थ व्यक्ति त्या शहरात राहत असे. ही परंपरा प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात होती. बाबा शीलनाथ नामक महान

योगी कायम स्वरूपी आपल्या जवळ एक जळते लाकूड राखत असत. जळते लाकूड साधकाच्या मनातील ऐंद्रीय प्रभावांना जाळून नष्ट झाल्याचे प्रतीक आहे. त्यांच्या निर्वाणा नंतर त्यांच्या भक्तांनी धुनी पेटती ठेवण्याची प्रथा चालू ठेवली. आज देखील पेटती धुनी शीलनाथांच्या ध्यान साधनेच्या जागी पाहू शकता. त्या स्थानाला 'बाबा शीलनाथ धूनी संस्थान' म्हटले जाते आणि ती जागा शहराच्या बाहेरील भागात आहे.

तेव्हा स्वाभाविकच त्या स्थानाला पाहण्यासाठी इच्छुक होतो. आणि मी आपली श्रद्धा समर्पित करण्यासाठी तिथे पोहोचलो. मी जळती लाकडाची धुनी पाहिली आणि ध्यानासाठी मी तिथे बसलो. शहर सोडण्याआधी तिथल्या वातावरणात काही मिनिटे तिथे घालवण्याची इच्छा करत होतो. आश्चर्य वाटते की त्या जागी ध्यानाच्या प्रगाढ अवस्थेत दोन तीन तास लीन झालो होतो खरे तर तिथे ध्यानाला बसण्याचा माझा अजिबात विचार नव्हता. या अतिरिक्त मी शहर सोडण्यासाठी उतावळा झालो होतो. कारण मला त्या दिवशी बराच लांबचा पल्ला गाठायचा होता. सर्व परिस्थितीची जाणीव असून ध्यानाच्या गंभीर अवस्थेत लीन होण्यास बाध्य झालो.

या प्रकारच्या घटना सामान्यतः गत जन्मात केलेल्या अभ्यासाचा परिणाम असतो. (या प्रभावांना सुद्धा मनातून काढण्याची आवश्यकता आहे). साधकाला हे समजणे आवश्यक आहे की मौलिक शक्ति साधकाच्या मनांतून प्रत्येक ऐंद्रीय भाव स्वच्छ करते. योग ग्रंथानुसार व्यक्तिचे सर्वोच्च दिव्यते पेक्षा वेगळे अस्तित्व आहे हा विचार देखील घालवते. अशा प्रकारे योगाद्वारे परमात्म्याचे व्यक्तिगत आत्म्याचे मिलन संभवते.

देवास शहराची यात्रा संपवून भारतातील आजच्या तेलंगाणा राज्यात गोदावरी नदी किनारी वसलेल्या बासर नामक स्थानाचे दिशेने गाडी चालवत निघालो.

अशी मान्यता आहे की वेद आणि महाभारताचे जनक संबोधले जाणारे व्यास नावाचे एक महान ऋषी प्राचिन काळी या स्थानी राहून तप करीत होते. ज्या गुहेत ते तप करत असत ती गुंफा आजही बासर या गावी अस्तित्वात आहे.

तेव्हा स्वाभाविकच माझी इच्छा जागृत झाली. ती गुंफा पाहण्यासाठी तसेच ध्यान साधन करण्यासाठी गेलो. गुंफा फारच छोटी आणि अरुंद होती. प्रवेश द्वारातून मला रांगत जावे लागले. तरीही गुंफेतील आतल्या भागात चार पाच व्यक्ति बसू शकत होत्या. तिथे ध्यानासाठी

मांडी घालून मी बसलो. प्रवेशद्वाराजवळच मला बजावले होते की गुंफा एक तासानंतर बंद केली जाईल. या अतिरिक्त पर्यटकांची ये-जा सुरू होती. गुहेत आत उजेड होता परंतु मी पुढील अंधाऱ्या जागी बसलो जेणेकरून माझ्या धान्यात पर्यटकांचे येणे-जाणे अडथळा आणू नये.

गुहेच्या आतील स्पंदने अति शक्तिशाली होती. मी माझ्या डोक्यावर स्पंदन प्रभाव अनुभवत होतो. शेवटी, हजार वर्षापूर्वी एका महान ऋषिने तेथे तप केले होते. गुहेतले वातावरण पूर्णतः सकारात्मक स्पंदनांनी परिपूर्ण होते.

माझे ध्यान जवळपास एक तास चालू असेल पण काहीतरी अज्ञात कारणाने ते तुटले. मी माझे डोळे उघडले आणि समजले वीज प्रवाह बंद झाला होता आणि कोणत्या तरी कोपऱ्यातून प्रकाशाचा कवडसा गुहेत प्रवेश करत होता. या शिवाय हे देखील समजले की पर्यटकांची ये-जा पूर्णतः संपली होती. ते स्थान पूर्णपणे शांत झाले होते. मला विश्वास नव्हता की पर्यटन विभागाचा कर्मचारी अजूनही प्रवेशद्वारी असेल. शिवाय, ती गुहा घनदाट वनस्पतींनी घेरलेली, एका छोट्या टेकडीवर होती.

मला संशय आला की कर्मचाऱ्याने मला गुहेत बसलेले पाहिले नसावे आणि प्रवेश द्वार बंद केले असावे. गुफा दुसऱ्या दिवसापर्यंत उघडली जाणार नव्हती.

माझे मन परत एकदा भयाच्या जाळयात अडकू लागले. जसे देवास शहरी घडले होते.

परंतु या वेळी, मी भयापुढे न झुकण्याचा निर्णय घेतला आणि तिथेच बसून ध्यानासाठी पुन्हा डोळे बंद केले.

जास्तीत जास्त काय वाईट होणार होते, एक रात्र भोजन पाण्याशिवाय रात्र गुहेत घालवावी लागेल. मला नक्की माहीत होते की गुफा उद्या सकाळी उघडली जाईल. अशा प्रकारे मी माझ्या मनाचे समाधान केले व ध्यान चालू ठेवले. तरीही भयाच्या लहरी माझ्या बुद्धिवादी तर्क आणि आत्म विश्वासावर मात करून सतत अक्षुष्ण होत्या.

ध्यान जास्तीत जास्त पंधरा मिनिटे चालू असावे. शेवटी भय एवढे तीव्र झाले की मी हार मानली आणि डोळे उघडले. रांगत रांगत मी गुहेतून बाहेर आलो तेव्हा पाहिले की कर्मचारी अजूनही गुहेच्या बाहेर माझ्या बाहेर येण्याची वाट पाहत होता. त्याने मला सांगितले की त्याने

मला ध्यान करताना पाहिले होते व काही काळ वाट पाहण्याचा निर्णय घेतला होता जेणे करून माझ्या ध्यानात व्यत्यय येऊ नये.

मी उपरोक्त घटनांचे वर्णन वाचकांना केवळ समजवण्यासाठी केले कशाप्रकारे सर्वोच्च दिव्य शक्ति आणि साधकाच्या दिनचर्येत एक पडदा / अवरोध असतो. दिव्य ब्रम्हांडीय शक्ति स्पष्ट रुपांत साधकाला पृथक तसेच आंशिक रुपांत अनुभवली जाऊ शकते जी संवादात्मक रुपांत असते. अशा प्रकारच्या अनेक घटना मी अनुभवल्या आहेत. मी आशा करतो की वाचकाला माझ्या दिनचर्येत च्या अन्य प्रकारच्या क्रिया झाल्या त्या समजू शकतील.

तरीही वाचक असे ही म्हणू शकतात (वर वर्णित) अशा प्रकारच्या घटना कोणाच्याही जीवनात घडू शकतात.

येथे वाचकांचे ध्यान शरीरातील शक्ति प्रवाहाकडे, पहिल्या प्रकरणाकडे आकर्षित करू इच्छितो. जेव्हा शक्तिचा प्रवाह शरीरात एका वेगळ्या अंशात्मक रुपांत अनुभवला जातो, त्यावेळी सर्व तर्क आणि तर्किक वैज्ञानिक व्याख्या फोल ठरतात. या अनुभवानंतर साधकाच्या मानसिकतेत उल्लेखनीय परिवर्तन होते.

त्या क्षणापासून, साधकाद्वारा शक्ति स्वतः वेगळ्या अंशात्मक रुपांत अनुभवली जाते.

जेंव्हा साधक योगाभ्यासात पुढे पुढे प्रगत होतो तेव्हा सर्व व्दैतवाद मौलिक उर्जेच्या प्रकृतीच्या वास्तविक ज्ञानाबरोबर संपतो.

मनात आवश्यक परिवर्तन आणण्यासाठी साधकाला शक्तिच्या प्रकृतीचे वास्तविक ज्ञान सुद्धा शक्ति द्वारे अपेक्षित आहे. शक्ति वा साधकाच्या दरम्यान एक प्रकारचा पडदा/अवरोध याच उद्देशासाठी सामान्य दैनिक जीवनात स्थापित केला जातो. व्यक्तिच्या दिनचर्येत विभिन्न घटना घडतात आणि व्यक्तिला पूर्णरुपेण ब्रम्हांडीय शक्तिचे सूक्ष्म काम-काजाविषयी जाणीव करून देते.

साधकाचे मन यथावकाश मौलिक शक्तिच्या वास्तविक प्रकृती ज्ञानाबरोबर त्या अवस्थेप्रत उन्नत होते.

मला हे विस्ताराने समजाऊ द्या.

सामान्य माणसात अहंकार पूर्णतः विकसित अवस्थेत असतो. व्यक्तिद्वारे केली गेलेली सर्व कर्म 'मी स्वतः केले' ची भावना निर्मित करतो. व्यक्ति सर्वोच्च शक्तिशी एकता तेव्हाच अनुभव करतो जेव्हा तो जाणतो की

मौलिक शक्तिच कारण आणि कार्य आहे जे त्याच्या देहाच्या माध्यमाद्वारे केले गेले होते. व्यक्ति विचार करते की सर्व व्यवस्थित आहे. प्रत्यक्षात हे त्याचे मन आहे, जे विचार करते ते सर्वोच्य स्व आहे. लौकिक भ्रमाच्या प्रभावाखाली स्व व आत्मा विचार करते की ते मन आहे.याप्रकारे मन आणि स्व यांच्या मध्ये भ्रम निर्माण होतो की तोच करता आहे भले त्याच्याकडे वास्तविक कोणतीही शक्ति नाही.

मन सर्वोच्च शक्तिचे महत्व समजत नाही आणि विचार करते की तिच सर्वोच्च शक्ति आहे. ब्रम्हांडाच्या मायामय शक्तिने अशाप्रकारे मनाला विचार करण्यासाठी फसवले आहे. कारण मन इतर काही नसून सर्वोच्च शक्ति चे दुसरे रूप आहे, संसारिक दृष्टीकोनातून मन देखील खोटे बोलत नाही.

प्रत्यक्षात या संपूर्ण बाबतीत घुमजाव आहे.

जेंव्हा दिव्य शक्ति व्यक्तिमध्ये जागृत केली जाते, ती शक्ति स्पष्ट रुपांत व्यक्तिच्या शरीरात एक वेगळी अंशात्मक रुपांत अनुभवली जाते. या स्तरावर, मन पहिल्यानेच अभिमान रहित होते. मनाला पहिल्यांदा जाणिव होते की कोणत्याही मानसिक व शारीरिक घटनांवर त्याचे कोणतेही नियंत्रण नाही.

आता मन हार मानते आणि समर्पण करते.

जेव्हा मन समर्पण करते, तेव्हा एकाच वेळी अहंकार आणि सर्व ऐंद्रीय प्रभावांची शुद्धि होते.

परिणाम स्वरूप, सर्वोच्च आत्म्याचे प्रतिबिंब मनाच्या शांत पाण्यात प्रथमतःच दिसते.

परिणाम वास्तवात भयंकर असतो.

सर्वोच्च दिव्य ब्रम्हांडीय शक्ति, जी इतर काही नसून खरे तर आत्मा आहे, आता व्यक्तिबरोबर संभाषणाची एका साखळी सदृश्य माध्यमातून आपले वास्तविक स्वरूप प्रकट करेल.

एक प्रकारची जोडणी (connection) सर्वोच्च शक्ति आणि साधक यांच्या निर्माण होते आणि आत्मबोधाची प्रक्रिया सुरू होते.

त्या नंतर साधकाला हे जणिव होऊ लागते की त्याची स्व च्या आंतरातील शक्ति आणि स्व च्या बाहेरील शक्ति एकच आहे.

ह्या अनुभवाचा परिणामस्वरूप ही धारणा की सर्वोच्च शक्ति

स्वतःच एक वेगळा अंशात्मक आहे तो निघून जातो. व्यक्तिला जाणवू लागते की वास्तवात तो आपल्या शक्तिला एका वेगळया अंशात्मक स्वरूपात (पूर्वी) पाहत होता (असे).

परिणामी साधक परम शक्तिशी ऐक्य अनुभवू लागतो. प्रत्यक्षात सामान्य व्यक्तिच्या उलट सर्वोच्च ऊर्जा शक्तिची प्रकृतीची जाणीव पूर्वक तसे करतो.

फरक हा आहे की सामान्य व्यक्ति अज्ञानाच्या स्थितीत आहे, तर साधक स्व च्या वास्तविक प्रकृतीची ओळख संपादून. हे अंतर आहे. हे इतके सोपे आहे. सांसरिकाच्या दृष्टीकोनातुन कोणताही फरक पडत नाही.

शक्ति आणि साधका दरम्यान संवाद प्रत्यक्षात एका सीमेपर्यंत व्दिधा असतो ज्याचा मनावर अतिसूक्ष्म प्रभाव पडावा. हा संवाद यासाठी घडतो की जेणे करून मनाला भास व्हावा की तो स्व नाही.
उपरोक्त घटना कोणत्याही तार्किक वा तर्कसंगत व्याख्येने समजली जाणार नाही. सर्वोच्च दिव्य ब्रम्हांडीय शक्तिच्या कामकाजाची पद्धती अत्यंत सूक्ष्म आहे. आणि ते प्रत्यक्ष स्वतःच्या अंतरात अनुभवावे लागते.
मी विस्ताराने समजावतो.

आत्मबोधाची प्रक्रिया एक संचरित घटना आहे. योग ग्रंथानुसार त्याचे प्रकटीकरण चार पायज्या नी होते. मी प्रत्यक्षात माझ्या शब्दात आणि बुद्धि च्या सीमे अंतर्गत वाचकांसाठी चार पायऱ्या यथा संभव समजवण्याचा प्रयत्न करतो.

प्रथमतः शक्ति व्यक्तिचा स्व पासून (जो ब्रम्हांडीय भ्रमाच्या प्रभावांतर्गत आहे) अविभाज्य रुपांत अनुभवास येतो. म्हणण्याचे तात्पर्य हे की मन विचार करते की तेच वास्तविक अस्तित्व / साकार आहे. स्व आणि शक्ति अज्ञानवश वास्तविक ज्ञाना अभावी एकरूप अनुभवले जाते. हे वास्तविक व्यक्तिचे मन आहे जे या प्रकारे विचार करते.

परिणाम स्वरूप मनांत अद्वैततेची धारण बनते. हा शुद्ध स्व वा आत्मा नाही जे हे विचार करण्यास कारणीभूत ठरते; परंतु हे मन आहे जे अज्ञान वश विचार करते की तेच स्व आहे. अशा प्रकारे मन विचार करते की तेच सर्वोच्च शक्ति आहे.

जेंव्हा दिव्य शक्ति गुरुच्या माध्यमातून सक्रिय होते आणि उलट दिशेने वाटचाल सुरु करते, मनाला सुरुवातीला धक्का बसतो. त्याला कळते की ते सर्व काही नाही. ही पहिली पायरी आहे.

त्या नंतरच्या दुसऱ्या पायरीवर व्यक्तिला भास होऊ लागतो की त्याचे शरीर पूर्णपणे या ब्रम्हांडीय शक्तिने ओतप्रोत आहे. या अतिरिक्त कोणतेही मानसिक परिवर्तन होत नाही.

या स्तरावर, सर्वोच्च शक्तिचे जे स्वतंत्र आणि सार्वभौम अस्तित्व विशिष्ट रुपांत एका वेगळ्या एकांश रूपात अनुभवले जाते. मन पहिल्यानेच अहंकार रहीत होते. तो/ते अंतरात पाहण्यासाठी बाध्य होतो. या आंतरिक ध्यानाशिवाय पुढचे मंथन सुरू होऊ शकत नाही. मन आता प्रेक्षक, पाहण्याचे माध्यम व प्रयोगशाळा होते. अंततः सर्वांचे आंतरिक रुपांत समाधान प्राप्त होते आणि मन समर्पण करते. व्यक्ति नर्विचार अवस्थेत प्रवेश करतो.

जेव्हा मन (ज्यानी आता पर्यंत परमात्म्याला झाकले होते) समर्पण करते, आत्मा शांत झालेल्या मनाच्या पाण्यात प्रतिबिंबित होतो. व्यक्तिच्या स्व ला हा भास होऊ लागतो की शक्ति आणि स्व एकच आहे.

अव्दैततेचा अनुभव सर्वोच्च शक्तिचे वास्तविक प्रकृतीचे पूर्ण ज्ञानाबरोबर होते. या अवस्थेत व्यक्ति अलौकिक शक्ति प्राप्त करतो. कारण व्यक्तिला शक्तिच्या प्रकृतीचे पूर्ण ज्ञान असते, आणि सर्व शारीरिक आणि मानसिक घटनांवर नियंत्रण करण्याचा प्रयोग करू शकतो. योग ग्रंथानुसार ज्ञान वा आत्मबोध सर्वशक्तिमानाच्या इच्छेनुसार होते. वा दुसऱ्या शब्दांत ब्रम्हांडातील कोणत्याही नियम वा अटींनी बाध्य होण्याची कोणतीही आवश्यकता शिल्लक राहत नाही. या बिंदूवर योगाचे उदेश्य परिपूर्ण होतो. व्यक्तिगत स्तरावर आत्म्याला मानव शरीरापर्यंत सीमित केले जाऊ शकत नाही. कारण सार्वभौमिक आत्म्याशी मिलन झाले असते.

या नंतर शेवटची पायरी आणि त्या विषयी काहीही लिहिण्यास मी समर्थ नाही.

ते, आपण ज्या विषयी बोलत आहोत, ते सर्वोच्च शक्तिमान आहे.

एकाच वेळी साक्षीच्या रुपांत आणि भ्रामक वास्तविकता एका व्यक्तिच्या रूपात फिरण्याची क्षमता योगाच्या दृष्टीने तांत्रिक रूपात शक्य नाही. याचा अर्थ हा की ज्या व्यक्तिने योग आणि विज्ञानाचे नियमांना पार केले आहे, त्याला परत संसारात यावे लागेल आणि आपल्या आजूबाजूच्या संसाराच्या भावनात्मक स्वरूपापासून अलिप्त रहावे लागेल.

प्रत्यक्षात ही क्षमता मानव जातीच्या इतिहासात काहीच पुरूषांद्वारे प्रदर्शित केले गेले. त्यांना व्यापक रुपांत दिव्य अवताराच्या

रूपात स्वीकार केले गेले. जसे राम, कृष्ण, ईसा मसीह, अल्लाह, बुद्ध आणि इतर हिंदू धर्मांतर्गत अवतार रुपांत प्रकट झाले. यामुळे मी या विषयी मत प्रदर्शित करू शकत नाही.

क्रिया रुप जीवन

सुरवातीला मी एका प्रकरणात 'क्रिया' चा अर्थ समजवला होता.

तेव्हा मी म्हटले होते की ही एक प्रतिक्रिया आहे जी मूलतः मन, शरीर आणि बाह्य दैनंदिन जीवनात घडते. येथे हे समजावणे महत्त्वाचे आहे की मन आणि बाह्य दैनंदिन जीवन परस्परांशी जुडलेले आहे.

बाह्य संसार (जसा व्यक्ति द्वारे पाहिला जातो) मूलतः त्या व्यक्तिच्या मनाचे प्रक्षेपण आहे.

बाह्य संसार प्रत्येक व्यक्तिसाठी त्यांच्या त्यांच्या मनाच्या प्रक्षेपणाच्या रुपांत स्थित आहे.

बाह्य संसार दोन स्तरावर विभागला आहे. एक व्यक्तिगत आणि दुसरा सामुहिक स्तरावर.

जेंव्हा व्यक्ति निद्राधीन होतो तेव्हा बाह्य संसाराचे अस्तित्व संपते. व्यक्ति स्वप्नावस्थेत जातो त्या काळात अजून नव्या संसाराची निर्मिती होते. व्यक्ति परत जाग्रतावस्थेत आल्यावर त्या व्यक्ति साठी पुन्हा बाह्य संसाराची रचना होते. हे इतके सोपे आहे. भौतिक वास्तविकतेची प्रकृती चे भ्रामक प्रकटिकरण च्या अतिरिक्त इतर आधार नाही. याची तुलना वाळवंटातील मृग जलाशी करता येईल.

प्रत्यक्षात, निद्रावस्थे पूर्वी आणि नंतर व्यक्तिच्या ज्ञानाच्या स्तरावर काही फरक पडत नसतो. जास्तित जास्त व्यक्तिला ताजे तवाने आणि स्फूर्तीवान वाटते.

व्यक्तिचा बाह्य संसार (वर म्हटल्या प्रमाणे) व्यक्तिच्या मनांत जे आहे त्याचे प्रतिबिंब आहे. प्रत्यक्षात व्यक्तिचा इतरांशी आणि व्यक्तिगत

दैनिक जीवनांत होणाऱ्या घटनांशी परस्पर संबंध आहेत तरीही व्यक्ति अद्वितीयच राहतो.

ज्या प्रमाणे एक व्यक्ति बाह्य दुनिया चा जसा अनुभव करते तो इतरांनी जसा अनुभवला त्यापेक्षा वेगळा असतो. पूर्वीच्या एका प्रकरणात मी म्हटले होते अनुभव हा पूर्णपणे मनाची सामुग्री, वा चारित्रावर आधारित आहे. सारख्याच परिस्थितीत अप्रिय वा सुखद अनुभव व्यक्तिगत मनातील सामुग्रिच्या आधारावर वेगवेगळा प्रकट होईल.

जो पर्यंत (अनेक जन्म व युगांचे मनात संचित) ऐंद्रीय संस्कार नष्ट होत नाहीत, बाह्य संसारात त्याचे प्रक्षेपण चालू राहणार. एकदा का सर्व संस्कार मनातून धुतले जातील, मनुष्य या रुपांत आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यात व्यक्तिमधील आत्म्याला कोणते कारण शिल्लक राहत नाही. मानवी रुपांत अस्तित्वाचे मुख्य कारण पूर्व कर्मांच्या फळांची प्रतिक्रिया भोगणे आहे. जस जसे संचित ऐंद्रीय प्रभाव त्याच सर्वोच्च दिव्य शक्ति द्वारे नष्ट केले जातील, जे पूर्व जन्मात त्यांची निर्मिती केली होती, मन यथावकाश एका वर-वरच्या पातळीकडे सरकते. केवळ विषयाला स्पष्ट करण्यासाठी 'वरची पातळी' हा शब्द प्रयोग केला आहे. अन्यथा एक प्रकारे मनाच्या उन्नतिची काही आवश्यकता नाही. केवळ सर्व संचित ऐंद्रीय प्रभाव संपवण्याची आवश्यकता आहे, जेणे करून मन एका परम शांत अवस्थेत विरून जाईल. या शांत अवस्थेतच व्यक्तिच्या 'स्व' मधेच संपूर्ण चेतना प्रतिबिंबित होते.

तर, व्यक्ति जेंव्हा ज्ञान वा आत्मबोध प्राप्त करतो तेंव्हा काय घडते?

यावर मत प्रदर्शित करण्यास मी असमर्थ आहे. तरीही, मला एवढेच म्हणायचे आहे की बाह्य संसार सर्वासाठी जसे अस्तित्व राखून आहे, ते केवळ त्यांच्या मनाचे प्रक्षेपण आहे. बाह्य संसार केवळ त्या व्यक्ति पुरता संपतो जो त्या काळापर्यंत अस्तित्वात होता. जोपर्यंत आत्मबोध होत नाही तोपर्यंत, व्यक्तिगत व सामुहिक दोन्ही संसार परस्परांशी जुडलेले असतात.

जसे मी पहिल्या एका प्रकरणात म्हटले होते की जेव्हा गुरु

मूलाधारात स्थित मौलिक शक्तिमध्ये हस्तक्षेप करतो, तेव्हा ती उलट दिशेने कार्यरत होते, आणि मनातील संचित संस्कार नष्ट करते.

तेव्हा, सर्वात पहिले सर्व ऐंद्रिय संस्कार संपवण्यास प्रारंभ करते जे अनंत प्रकारचे असतात. प्रतिक्रिया शरीर, मन आणि बाह्य दैनिक जीवनांत अनुभवली जाते. साधकाच्या बाह्य दैनिक जीवनात, सामान्य वाचकाच्या मनांत प्रश्न येऊ शकतो. कारण ज्या व्यक्तिला योग प्रणालीत दीक्षित केले गेले आहे, ज्याचा बाह्य संसारही सामुहिक संसाराशी जुडलेला आहे अशा परिस्थितीत दैनिक जीवनांत एखादी साधारण घटना आणि एखादी क्रिया यात फरक कसा करता येईल ?

येथे वाचकांना एक गोष्ट समजणे आवश्यक आहे. योग प्रणालीत दीक्षित व्यक्ति 'स्त्रोत' अर्थात सर्व शक्ति मनाच्या दिशेने एका परतीच्या मार्गावर अग्रसर असतो.

मनावर ऐंद्रिय प्रभाव अहंकाराने प्रेरित कर्माची रचना करते. हे कर्मच निश्चित करते की त्या व्यक्तिचे भाग्य कशा प्रकारे प्रकट होईल. हे ऐंद्रीय प्रभाव मनातून निघून जाणे आवश्यक आहे आणि व्यक्तिला प्रकट होणाऱ्या नियतिचे एक मूक दर्शक बनून राहणे आवश्यक आहे. अन्यथा आपल्या नियतिचा साक्षात्कार करताना जे ऐंद्रीय प्रभाव (संस्कार) निर्माण होतील, परत मनावर अर्जित होतील. सर्वज्ञ दिव्य मौलिक शक्ति हे सुनिश्चित करते की साधकाला ते समजण्याची आवश्यक जागृकता दिली जावी की जे घडत आहे ती क्रिया आहे, जेणे करून ते संस्कार पुन्हा निर्माण होऊ नये.

परंतु कधी-कधी साधक तेवढ्या उन्नत स्थितीत नसतो आणि अहंकाराने प्रेरित उत्पन्न ऐंद्रीय प्रभाव मनांत परत घर करतात, जरी ते पुन्हा नष्ट करणे अपेक्षाकृत सोपे होते.

जी व्यक्ति योग दीक्षित नाही, त्यांच्या विषयी सर्वोच्च मौलिक शक्ति सृजनाच्या आपल्या मूल विधीप्रमाणे चालू राहते. अर्थात विकासाच्या दिशेने.

भ्रमाचा संसार त्या व्यक्तिच्या मनःपटलावर प्रक्षेपित होतो. परिणामी प्रत्येकाचा ऐंद्रीय प्रभाव एका संभावित बिजाच्या रुपांत संस्कार निर्माण करतो त्या प्रमाणे नियतिची रचना. ज्या व्यक्ति पुरती सर्वोच्च शक्ति

विध्वंसाच्या आपल्या विपरीत दिशेत आहे, व्यक्ति प्रकट होणाऱ्या नियति वा जुन्या संस्काराच्या प्रभावापासून मुक्त होतो. हे दोन्ही एकच आहे. अहंकाराने रंगलेले पूर्वीचे संस्कार कोणत्याही व्यक्तिच्या नियतिच्या रूपात व्यक्त होतात.

यावर वाचक विचारु शकतात असे काही तर्क युक्त प्रमाण आहे का की नियतिला मिटवले आहे ? हे ही समजून घेणे महत्त्वाचे आहे. ते स्वतः व्यक्ति स्वतःच्या अंतरात अनुभवतो. अनुभवाची प्रकृति एका सीमेपर्यंत अस्थिर आहे. आणि तो काही खास अनुभव नाही. माझ्या म्हणण्याचे तात्पर्य हे आहे की व्यक्तिचा अनुभव हा काही खास भावनात्मक नसेलही, तरीही स्पष्ट रुपात त्या घटनेचा अनुभव करतो मनाची ही स्थिती इतरांना कळू शकत नाही, जरी निश्चित संकेत, शरीराची भाषा इत्यादी रुपात दिसू शकते. या शिवाय, छोटी दुर्घटना इत्यादी सारख्या काही घटना असून सुद्धा काही संकेत देतील की व्यक्ति फार मोठ्या दुर्घटनेच्या प्रक्रिये ऐवजी थोडक्यात निभावले. उदाहरणार्थ सर्व आवश्यक परिस्थिती एखाद्या मोठ्या दुर्घटने साठी योग्य असतील. एका मोठ्या दुर्घटनेसाठी आवश्यक परिस्थिती असूनही, व्यक्ति एका छोट्या अनुभवाने चमत्कारीकरित्या बचावला. हे क्रियेचे एक उदाहरण आहे.

यासाठी एखादी व्यक्ति वा साधकासाठी जो स्त्रोत, अर्थात सर्व शक्ति मानाच्या दिशेने परतिच्या प्रवासात आहे, जीवनाच्या प्रत्येक आणि प्रत्येक स्तरावर एक क्रिया व्यक्त होते. प्रतिक्रियांची अनेक विविध दृष्ये प्रत्ययाला येतील ज्या कारणे सर्वोच्च दिव्य शक्ति हे निश्चित करते की साधकाचे मन त्या सर्व परिस्थितीपासून मुक्त होईल जे मौलिक शक्ति द्वारेच निर्मित आहे.

माझ्या गुरुंनी मला जसे समजावले होते - हा एक असा प्रकार की दुरांतो गाडीत परतीच्या प्रवासाच्या तिकिटिविना गाडीत बसणे. साधकासाठी काहीही करणे शेष राहत नाही. साधक आता अशा मार्गावर आहे जेथून परतणे नाही. ज्या क्षणि कुंडलिनी जागृत होते, साधक या परतीच्या प्रवासासाठी निघतो अथवा जन्म-मृत्यू च्या चक्रातून बाहेर जेथून तो मुक्त होईल.

कधीतरी मी माझ्या गुरुंना विचारले होते की त्या व्यक्तिचे सर्व

अडसर दूर झाले का ? वा त्या व्यक्तिसाठी अजून देखील रोजच्या जीवनात परतणे संभव असेल ? माझ्या गुरुनी स्पष्ट उत्तर दिले की ते जर का सर्वोच्च शक्ति प्रती समर्पण न करता केवळ मूक दर्शक होऊन जगला, तर जास्तीत जास्त परतीची गती धीमी होऊ शकते. पुढे म्हणाले की व्यक्ति त्याच्या सांसारिक स्वतंत्र इच्छेचा प्रयोग करून गाडीत आसनाची अदलाबदल करू शकतो. सांसारिक स्वतंत्र इच्छेच्या प्रयोगात एका छोट्या स्वतंत्रते शिवाय साधकाला प्रभावी मार्गापासून लांब ठेवले जाते.

तरीही, सर्व वाचकांना आश्वस्थ करतो की हे सर्व फार सहृदयतेने होते.

पहिली गोष्ट कोणीही व्यक्ति रातोरात आत्मबोधीत होत नाही. आत्मबोध न एका क्षणात ना अनेक वर्षांत होतो. तेव्हा, एखाद्या व्यक्तिने बराच त्रास सहन करून मानवी संबंधांत भावनात्मक आसक्ति इत्यादी च्या रुपात, जी धूळ अनेक युगांपासून गोळा केली होती, ती रातोरात संपण्याची कोणतीही भीती नाही.

अजून एक तथ्य.

एखादी निर्धन व्यक्ति भविष्याची कल्पना करू शकत नाही तिथे त्याला लाखो रुपये परत करावे लागतील. परंतु त्या व्यक्ति साठी ती परिस्थिती निर्माण केली जाऊ शकते की आता तो खरेच त्या धनराशीला परत करण्याच्या परिस्थितीत असेल.

याच प्रकारे सामान्य माणूस अशा परिस्थितीची कल्पना देखील करणार नाही की बरीच मंडळी त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करत आहे. तरीही जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होईल त्यावेळी त्यात साधारण व्यक्ति जवळ आपल्या जिवाला वाचवण्यासाठी विपुल धन आणि माणसाच्या रुपात आवश्यक शक्ति आणि साधन असेल.

तेव्हा कोणत्याही प्रकारे घाबरण्याची आवश्यकता नाही. जेव्हा भावनात्मक प्रेमाला सोडण्याची वेळ येते, तेव्हा व्यक्ति देखील त्या भोगला सामोरे जाण्यासाठी आवश्यक अवस्थेत असेल. सर्वोच्च दिव्य शक्ति, जी सचेत तसेच सर्वज्ञ आहे, सुनिश्चित करेल की आवश्यक सुरक्षित व्यवस्था साधकासाठी तयार असेल.

एखाद्या साधकाचे जीवन निश्चितच आगीत ढकलले जाते ! विशेषतः जेव्हा एखादी क्रिया "विज्ञान कोषात" प्रकट होते आणि अहंकार

संपुष्टात येतो.

परिणाम स्वरुप, हा अनुभव साधकासाठी अप्रिय/दु:खद असतो बरेचदा अशा प्रकारच्या दैनिक जीवनात होतात. मी माझ्या साधक बांधवांना एवढाच सल्ला देऊ शकतो की स्वतःला सांभाळून राहा. बस कसेही करून स्वतःला सांभाळा. फक्त काही तास, दिवस वा महिने. काटा कायम स्वरूपी काढून टाकला जाईल. त्या नंतर ना दु:ख ना त्रास असेल.

बुद्धि परिवर्तन

गुरुंनी कुंडलिनी जागृत केल्या नंतर, विभिन्न प्रकारच्या क्रियां विषयीचे मी जे कथन केले, ते शरीर, मन आणि व्यक्तिच्या बाह्य जीवनात घडते.

परंतु, जिथे एका साधकाचा संबंध येतो, जो महत्वपूर्ण आहे, तो प्रकट क्रियांचा वेगळा प्रकार नसतो. परंतु मनाचे परिवर्तन आणि जी शुद्ध परिणामाची अवस्था आहे, ती महत्त्वाची आहे.

जेंव्हा सर्वज्ञ सर्वोच्च शक्तिच्या क्रिया प्रकट होतात, मन देखील त्याच बरोबर केंव्हा तरी जमा झालेले ऐंद्रीय प्रभावा पासून शुद्ध केले जाते. मन क्रमशः उन्नतीच्या दिशेने प्रगत होते, अशा प्रकारे व्यापक रुपात बुद्धिचा विस्तार केला जातो.

मी माझ्या मनाच्या परिवर्तना संबंधीचे माझा अनुभव सांगतो की ते कशाप्रकारे घडले. वा वेगळ्या शब्दात, माझ्या मनाची घडण हळूहळू कशी बदलली आणि त्याचा व्यक्तिगत जीवनावर कसा प्रभाव पडला त्याचे वर्णन करतो.

माझ्या शरीरात कुंडलिनी शक्ति जागृती नंतरचा पहिला सकारात्मक परिणाम माझ्या धार्मिक, दार्शनिक आणि नैतिक मतांवर झाला.

आधीच्या एका प्रकरणांत लहान बालक आणि पांगुळ गाडी संबंधी उल्लेख केला होता त्याचे स्मरण असेलच. नम्रतापूर्वक वाचकांना कोणत्याही धर्म वा विश्वासाची एक महत्वपूर्ण खूण लक्षात ठेवण्या विषयी जोर देऊ इच्छितो.

ते एक बालक आणि पांगुळ गाडी सारखे आहे, आपल्या प्रगतीच्या दिशेने मदत करण्यासाठी एक उपयुक्त साधन आहे. उद्देश सिद्ध झाल्यावर उपकरणाची आवश्यकता उरत नाही. या शिवाय ती पुढच्या प्रगतीसाठी एक अडचणच ठरते.

असे म्हणून मी यात साधनां विषयी, जी पूर्वी पासून आहेतच, कोणत्याही प्रकारे अहंकारी वा अनादर करू इच्छित नाही. खरे तर त्यांच्या मुळेच आपली प्रगती झाली. कोणीही प्राथमिक शाळेला विसरू शकत नाही जिथे आहे अ आ इ शिकला. भलेही व्यक्ति एखाद्या विषयात विद्वान झाला असेल, स्पष्टच आहे की आतापर्यंत जे शिकवले गेले त्याचाच परिणाम आहे. याप्रकारचा तर्क सांसारिक शिक्षणाला लागू होतो.

परंतु आध्यात्मिक विज्ञाना बाबत तर्क वेगळा आहे. थोडा विचार केला तर! एक विद्यार्थी वा साधक एखाद्या धार्मिक विधी बदल वा प्रथेचे अनुसरण करत होते ज्यामुळे व्यक्तींची प्रगती होईल. कधी कधी एक वेळ अशी येते की व्यक्ति जे काही शिकला होता ते विसरण्याची वेळ आली.

या मताला स्पष्ट करण्यासाठी एक उदाहरण पाहूया. एखादी व्यक्ति एका विशिष्ट रुपांत सर्व शक्तिमानाची आराधना करतो. जेंव्हा अशी वेळ येते आणि बोध होतो की ईश्वर कोणत्याही आकारात नाही, ईश्वराच्या त्या रुपाला बाजूला सारणे आवश्यक आहे. त्या नंतर काय घडते हे मी सांगू शकत नाही. मी योगाभ्यासात तेवढ्या उन्नत अवस्थेत नाही.

केवळ नम्रतापूर्वक कुंडलिनी शक्ति जागरणा नंतर व्यक्तित जी मनाची अर्धवट अवस्था होते त्या संबंधित वाचकांना समजवण्याचा प्रयत्न करत आहे.

प्रत्येक व्यक्तिला शेवटी बाह्य साहाय्यते शिवाय आपल्या स्वत:च्या हिमतीवर स्वत:च्या अंतरांत दिव्यता प्रकट करणे आवश्यक आहे. गुरु हे त्याचे माध्यम आहे. त्यांच्या द्वारे हे शक्य होते, ते देखील त्यांच्या कृपाप्रसादाने. हे त्याचे मूळ कारण आहे.

माझ्या व्यक्तिगत जीवनात दुसरा सकारात्मक बदल झाला तो

समाजाविषयी आवड संपली. सामाजिक जीवनातून मी पूर्णतः बाहेर पडलेलो नाही कारण माझी पूर्व जन्म कृत कर्मे करणे अजून पूर्ण नष्ट झालेली नाहीत. तरी त्यातली आवड संपली. जेव्हा ऐंद्रीय प्रभाव वा कर्माचा मोठा वाटा मौलिक शक्तिद्वारे नष्ट केला जातो, तेव्हा त्याचा परिणाम स्पष्टपणे अंतःकरणात अनुभवला जातो. क्रियांच्या प्रकटीकरणांना वेगवेगळ्या हिश्यात वाटता येत नाही. याबाबत पहिल्या काही प्रकरणात त्यावर प्रकाश टाकलाच आहे वाचकांनी त्याचे स्मरण करावे असे विनवतो. याचा अर्थ हा झाला की नवीन क्रिया प्रकट होण्या अगोदर जुन्या ऐंद्रीय प्रभावांना विशेष प्रयत्नाशिवाय मनाची पूर्ण शुद्धी होणार नाही.

या प्रकारात माझी संगीत, सिनेमा, टी.व्ही, इंटरनेट, पुस्तके, वर्तमान पत्र इत्यादी बाबतची इच्छा संपली. बस, अधून मधून कधीतरी मी पाहतो.

त्याचप्रमाणे मला विशेष स्थानांवर एकट्याने आपल्या गाडीने फिरणे आवडत असे. या बद्दलची आवड पूर्णपणे संपली.

ही बाब स्पष्ट करण्या साठी काही अन्य घटना सांगतो की कशा प्रकारे, मुळातून, व्यक्तिच्या मनातून ती सर्वज्ञ दिव्य शक्ति या इच्छा संपवते.

पंजाब राज्यातील जलंधर शहरात राहत असताना, एक दिवस अचानक जेवण शिजवण्याची तीव्र इच्छा झाली, हे काम मी माझ्या आयुष्यात कधीही केलेले नव्हते. बाजारातून आवश्यक जिनसा मी विकत घेऊन आलो. आणि खाण्यातले काही विशेष प्रकार करण्यात गुंग झालो. त्यासाठी सर्व आवश्यक भांडी, सामानाच्या खरीदारीत पैसे आणि वेळ वाया घालवत होतो.

पुढच्या काही आठवड्यात जे घडले ते फारच अद्‌भुत होते. दिवसातील बराच वेळ भाज्या सोलणे, कापणे यात व्यस्त होत गेलो जसे कोणीतरी माझ्यावर जबरदस्ती करत होता.

अचानक मी झोपेतून जागा होत असे आणि भाज्या चिरणे सुरू करत असे. रात्री उशिरापर्यंत जागून विशेष पदार्थ बनवण्याच्या खटपटीत बराच काळ व्यतित करत असे.

हा प्रकार बऱ्याच काळापर्यंत चालला आणि अचानक एक दिवस माझी जेवण शिजवण्याची कोणत्याही प्रकारची इच्छा पूर्णतः संपली.

माझ्या घरातील सर्व भांडी गुंडाळून एका लाकडी कपाटात बंद करून टाकली.

अजूनही, कधीतरी, मला अन्न शिजवण्याची इच्छा होते आणि बऱ्याच भाज्या विकत आणून फ्रीज मध्ये ठेवतो. परंतु ते तेवढ्या पुरतेच. मी कधीच शिजवत नाही. कालांतराने मी सर्व भाज्या फेकून देतो. काही दिवसानंतर पुन्हा अन्न शिजवण्याचा उमाळा येतो. परत काही दिवस भाज्या फ्रिजमध्ये ठेवून नंतर फेकून देतो.

ही व्यक्ति द्वारे कधीही अन्न शिजवण्याच्या प्रक्रियेशी संबंधित सर्व ऐंद्रीय संस्कारांपासून मनाच्या शुद्धिची प्रक्रिया आहे. स्वयंपाकातील विविध पदार्थ बनवण्याच्या घटना अनेक वेळा घडल्या आहेत.

प्रत्येक व्यक्तिच्या अंतरात कल्पना आणि इच्छांचे विविध प्रकार आहेत. दिव्य मौलिक शक्ति हे सुनिश्चित करते की हे सर्व विविध प्रकारची क्रिया प्रकट करून त्या प्रतिक्रियांद्वारे मनातून नष्ट केल्या जाव्या.

विभिन्न घटना साधारण रुपात दैनिक जीवनात घडतील जेणेकरून विभिन्न इच्छा मनातून पूर्णतः निष्क्रिय होतील. सर्व कल्पना आणि इच्छा थोडक्यात पूर्ण करून त्याप्रती कोणतेही आकर्षण वा इच्छा न व्हावी. याच प्रकारे भय आणि चिंतांचे निराकरण केले जाते ज्या मुळे व्यक्तिचे मन वा दैनिक जीवनांत यापुढे भयमुक्त होईल.

जेव्हा मनाची उपयुक्त शुद्धिची प्रक्रिया बऱ्याच काळपर्यंत चालू असते, मनाला अनुभवाला येते की आतल्या आत अनंततेच्या त्या क्षेत्राचे दिशेने अजून आत खेचला जात आहे. हा असर स्पष्ट रुपांत सहस्रारात दिवस-रात्र अनुभवाला जातो. प्रगाढ निद्रा या परिवर्तनाचा सरळ सरळ परिणाम आहे.

या ठिकाणी, मी सुरवातीच्या काळात या शुद्धि चा एक दुष्प्रभाव वा अस्थायी घटनां विषयी माझ्या सर्व बांधवांना जागृत करू इच्छितो की जे बरोबरच सुरू असतात.

जेव्हा दिव्य मौलिक शक्तिद्वारे मनातले ऐंद्रीय संस्कारांचा बराच मोठा भाग स्वच्छ केला जातो, तेव्हा नुकतेच निर्मल झालेले मन फारच संवेदनशील आणि भावुक होते.

मी एकदा गुरुजींना विचारले होते की प्रक्रिया अशाप्रकारे उलट विरोधाभासी पद्धतीने का घडते ? प्रत्यक्षात हा विषय पहिल्यांदाच एका चर्चासत्रात गुरुजींनी प्रकट केला आणि सर्व प्रकाराला स्पष्ट केले होते.

गुरुजी म्हणाले की ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, जी सुरुवातीच्या अवस्थेत मनाच्या शुद्धि बरोबर होत असते कालांतराने त्या विरोधी रक्षणासाठी उत्पन्न होतात.

प्रत्येक साधक या तथ्याशी परिचित असेलच. ही अस्थाई रुपांत साधारण आणि स्वाभाविकरीत्या घडते आणि त्या बाबत चिंतित होण्याचे काही कारण नाही.

गुरुजी म्हणाले प्रत्यक्षात हा योगाच्या दृष्टीने एक चांगल्या प्रगतीचा संकेत आहे. आवश्यक नाही, जसे मी सुरुवातीच्या प्रकरणांत सांगितले होते, योगाभ्यासाच्या काळात बरेच अवरोध उत्पन्न होतात.

उदाहरणार्थ, मी जेव्हा ध्यानाला बसत असे त्यावेळी मी सर्व प्रकारची काळजी घेत असे जेणेकरून ध्यानात कोणत्याही प्रकारचा अडसर येऊ नये. मी टेलिफोन बंद करत असे. सर्व विजेची उपकरणे व्यवस्थित बंद करत असे, सर्व दिवे बंद करत असे, दरवाजाला कडी घालत असे इत्यादी.

तरीही जेव्हा बाधा उत्पन्न होते तेव्हा सर्व उपाय कुंठित होतात आणि घटना घडतेच.

समजण्याची गोम ही आहे की ध्यानात व्यवधान हा पूर्व कर्मांचा परिपाक असतो. ती बाधा पार पाडणे आवश्यक असते जे हळूहळू संपावे आणि साधक कोणत्याही प्रकारे विचलित न व्हावा. अन्यथा, अशुद्ध प्रभाव विविध शारीरिक व मानसिक व्यवधानाच्या रुपांत प्रकट होऊन ध्यानात व्यत्यय आणतील.

माझ्या सर्व साधक बांधवांना नम्रतापूर्वक एक गोष्ट स्मरणात ठेवण्याची आवश्यकता आहे. आपण अहंकाराने रंगलेल्या आपल्या ऐच्छिक आत्मसमर्पणाने सर्वज्ञ सर्वोच्च मौलिक शक्तिला मूर्ख बनवू शकत नाही.

आत्मसमर्पण हे सहज स्वाभाविक रुपांत मन, बुद्धि , आणि शरीरात उत्पन्न होणे आवश्यक आहे. कृपा करून जाणता अजाणता आत्म समर्पणाच्या भ्रामक कृत्यांचा आधार घेऊ नका. आपल्या गुरुं ना प्रार्थना करा आत्म्याची सत्यता क्षणो क्षणी जीवनदायिनी श्वासांतर्गत स्मरण होऊ द्या.

आपल्या सर्व साधकांना या बिंदूला समजाऊ इच्छितो, व्यवधान / व्यात्यय सर्वांनाच येतात आणि हा एक नैसर्गिक सिद्धांत आहे. अवरोधाचा

विरोध करू नका. तसे करणे योगाभ्यासाच्या नियमा विरुद्ध आहे.

या नंतर साधकांना वाचकांना हे समजावू इच्छितो की अंतर शुद्धिच्या प्रक्रियेत घसरण होऊ शकते, तथापि ही एक नैसर्गिक घटना आहे आणि ती सर्वांसाठी असते. हा चिंतेचा विषय नाही. ही केवळ एक तात्कालिक घटना आहे. सर्व योग ग्रंथात या तथ्याला स्विकारतात की योगाच्या अभ्यासात प्रगती काळात वेळो वेळी घसरण होते. हे प्रत्येकाच्या बाबतीत घडते, जसे गुरुजींनी सांगितले. मोठ्या प्रमाणात एकदातरी आणि छोट्या छोट्या पद्धतीने माझ्या बाबतीत अनेक वेळा घडले आहे.

काय होते, जेव्हा कुंडलिनी शक्ति जागृत होते तेव्हा व्यक्ति पटापट वर वरच्या पायऱ्या चढून जातो आणि त्या नंतर घसरतो. काही जास्त बिघडत नाही. व्यक्तिला सुरुवातीला त्या स्तरापर्यंत नेले जाते जिथे गत जन्मात अभ्यासात खंड पडला होता.

कोणत्याही व्यक्तिसाठी योगाभ्यास त्याच स्तरापासून सुरु होतो जिथे गत जन्मात खंडित झाला होता. यदा कदाचित वर्तमान जन्मात आत्मबोध प्राप्त करण्यात विफल झाला, तर पुन्हा त्याच स्तरापासून पुढच्या जन्मात सुरुवात होईल. हा सर्वशक्तिमाना तर्फे दिलेले फळ आहे. केवळ हेच एक मात्र फळ आहे ज्याला वास्तवात फळ म्हटले जाऊ शकते.

सर्व ऐंद्रीय संस्कारांपासून मनःशुद्धि प्रक्रिये दरम्यान वेगवेगळया इतरही प्रकारच्या घटना घडतात.

उदाहरणार्थ, काही छोट्या दुर्घटना फारच हलक्या स्वरुपांत होऊ शकतात.

यदा कदा योग साधकाला एखाद्या छोट्याशा दुर्घटनेला भोगताना पाहिले तर त्याचे अभिनंदन करण्यास विसरू नका ! सर्वोच्य मौलिक शक्तिने एखाद्या पूर्ण विकसित प्रतिक्रियेच्या रुपांत एखाद्या मोठ्या अप्रिय घटने ऐवजी क्वचित एखाद्या हलक्या फुलक्या दुर्घटनेच्या रूपात आशीर्वाद दिला आहे.

याच प्रकारे सुखद घटना देखील एखाद्या हलक्या स्वरूपात घडू शकतात यावेळी त्याचे अभिनंदन करू नका! हे विशेष रूपात हास्य आहे.

वाचकांना याचे स्मरण ठेवण्याचा आग्रह आहे की दोन्ही सुखद आणि दुखद घटना पटापट पद्धतीने सर्वज्ञ शक्ति द्वारे नष्ट केली जाते.

योगाभ्यासाच्या दरम्यान गुरुंचे मार्गदर्शन

योगाच्या अभ्यासाच्या काळात गुरुंचे मार्गदर्शन साधकाला मार्गाच्या प्रत्येक वळणावर स्थिर राहण्यासाठी आवश्यक आहे. गुरुंच्या मार्गदर्शना शिवाय कोणत्याही साधकाला बराच काळ टिकून राहणे कठीण आहे.

आकर्षण आणि बाहेरील संसार साधकासाठी अत्यंततिक शक्तिशाली असतात. तो सहजच जीवनाचा शिकार बनतो, आणि आध्यात्मिक मार्गावरून घसरतो. गुरु सतत त्याच्यावर लक्ष ठेवून असतात आणि साधकाचे संरक्षण करत असतात.

मी माझ्या जीवनातील काही घटनांचे वर्णन करतो जेणेकरून साधक हा विषय सहज समजू शकेल.

मागील काही प्रकरणांत काही अनुभव प्रस्तूत केले आहेत की कशाप्रकारे गुरुंचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरते. माझ्या बाबतीत दीक्षेच्या वेळी क्रियेला सुरवात झाली नव्हती, आणि गुरुंनी वेळोवेळी हस्तक्षेप करून अंततः माझ्या शरीरात क्रिया प्रकटणे सुरू झाले होते.

त्याच बरोबर याचे देखील वर्णन केले की कशा प्रकारे गुरुंनी माझे शंका निरसन केले होते. विशेषतः माझ्या पाप करण्याची शंका दूर केली. अन्यथा, योग मार्गात माझी पुढची प्रगती खुंटली असती. माझ्या बुद्धीतील / विचारातील दोष मुक्तते साठी प्रत्युत्तरासाठी जेव्हा केव्हा गरज भासली माझे गुरुजी माझ्यासाठी सतत मार्गदर्शनासाठी एखाद्या खुल्या पुस्तका प्रमाणे होते.

या अतिरिक्त मी याचे देखील वर्णन केले की कशाप्रकारे गुरुजींनी दिलेल्या मंत्र प्रभावामुळे माझ्या जीवनातील पैशाच्या समस्येतून बाहेर पडलो.

आता, मी त्या संबंधी लिहितो, जे प्रत्येक साधकासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

जसे मी सुरुवातीच्या काही प्रकरणांत लिहिले आहे, एकदा का क्रिया व्यक्त होण्यास सुरवात झाल्या की नंतर, त्या क्रिया एकाच वेळी सर्व कोषांमध्ये कधी कधी वेगळ्या रुपांत प्रगट होतात. चला समजूया क्रिया व्यक्तिच्या सामान्य दिनचर्येत सुरू झाल्या.

वाचक त्याबाबत कल्पना करू शकतात का की त्याचा परिणाम काय होईल ?

घटनाक्रम एकदम फटाफट प्रकट होऊ लागतात. व्यक्तींची नियति जलद गतीने धावू लागते जेणे करून संचित संस्कार तीव्र गतीने नष्ट केले जावे. साधकाला हा बोजा कधी कधी असहनीय होतो.

अनेक वेळा मी नियतिच्या तीव्र गती विषयी गुरुजींना दुखद परिस्थिती व्यक्त केली होती.

लक्षात ठेवा ही तीव्र गती कायम सुखद असतेच असे नाही. बरेचदा घटना अहंकारी 'ज्ञानमय' कोषा शी संबंधित असतात. साधकाला अप्रिय घटनांतून जाणे प्राप्त असते. याच प्रकारे सर्वोच्च शक्ति मन व बुद्धी तून जसे संस्कृत ग्रंथात लिहिले गेले आहे, अहंकाराच्या शेवटच्या अंशाला दूर करते.

तर, क्रियांची गती जेव्हा अति तीव्र होई, मी गुरुजींना निवेदन करत असे, आणि गुरुजी गतीला नियंत्रित करत असत.

याप्रकारे गुरु व्यक्तिच्या जीवनातील अप्रिय अनुभवांना दूर ठेवू शकतात व साधकाला सहजता प्राप्त होईल. कधीकधी गुरु व्यक्तिचे अप्रिय अनुभव, रोगां सकट स्वत:वर स्थानांतर करून घेतात. प्रत्यक्षात गुरु सहजतेने त्यांना थोड्या फार हलक्या स्वरूपात स्वतः सहन करून स्वत:ची रक्षा करू शकतात.

कधी कधी सुखद अनुभव देखील स्वतःकडे घेऊ शकतात ज्यामुळे साधक सांसारिक जीवनाच्या आकर्षणाला बळी पडू नये. अशा प्रकारच्या

गोष्टी जेव्हा घडतात, गुरु एवढ्या सूक्ष्म रूपात परिवर्तित करतात की साधकाला त्यावेळी समजून येत नाही.

मला अशा अनेक अनुभवांचे स्मरण होते ज्यात माझे गुरुंनी सूक्ष्म रुपांत माझे भाग्य परिवर्तित केले. जीवनातील सुखद आणि दुखद घटनांना नष्ट करण्याची आवश्यकता आहे. गुरु द्वारे साधकाला नियतिचे प्रत्यक्ष रुपांत केलेले नियमन अत्यंत सूक्ष्म असते. मला शंका आहे की या गोष्टी वाचक समजू शकतील! आणि कोणत्या प्रकारे ही बाब वाचकांना समजवावी तितकी माझी क्षमता नाही. तरीही प्रयत्न करतो.

एक दिवस हैदराबाद शहरात आपले स्कूटरवर स्वार होऊन मी गुरुजींना भेटायला जात होतो. गुरुजींनी मला एक पत्ता दिला, तिथे भेटण्याचा आदेश होता. शहर मला ओळखीचे नव्हते. तेव्हा मी शहराचा नकाशा काढला आणि ओळखीच्या मार्गानुसार आपला मार्ग ठरवला. अर्थात मी निवडलेला मार्ग लांबचा होता. अनावश्यक मार्गाचे अनुसरण केल्यामुळे मुख्य ठिकाणापासून लांबचा चक्कर मारत होतो कारण जवळच्या मार्गाशी मी परिचित नव्हतो.

मी स्कूटर चालवत होतो, तेव्हा माझा मोबाईल वाजू लागला. सामान्यतः गाडी चालवत असताना मी फोनवर संभाषण करत नसे, खासकरून दुचाकीवर असताना. तरी, कोणाचा फोन आहे ते पाहण्यासाठी मोबाईलच्या पडद्यावर नजर टाकत असे. या वेळी फोन माझ्या गुरुजींचा होता.

तेव्हा मी स्कूटर थांबवली आणि फोनवर बोलू लागलो.

मला अपरिचित व्यक्तिचा आवाज ऐकून आश्चर्य वाटले. मला सांगितले गेले की त्या व्यक्तिला गुरुजींनी सांगितले की मला मार्गा विषयी योग्य मार्गदर्शन करावे. त्याने माझ्या सध्याच्या स्थिती बद्दल विचारले. त्यानंतर त्याने मला सांगितले की गंतव्यावर पोहोचण्यासाठी त्या जागेपासून केवळ एक-दोन वळणे घेणे पुरेसे आहे.

जर तो फोन मी एक दोन मिनिटांनंतर घेतला असता तर मी सुरुवातीला ठरवलेल्या मार्गाने गेलो असतो व नाहक लांबचा फेरा पडला असता.तो फोन इतर कोणाचा असता तर मी थांबलो नसतो. तेव्हा माझ्या गुरुनी दुसऱ्या व्यक्तिला आपला फोन दिला आणि मला योग्य रस्त्याचे मार्गदर्शन मिळाले व माझी चूक वेळीच सुधारली.

पराशक्ति

ऑगस्ट २९-२०११ ला मोठ्या प्रवासासाठी आपल्या गाडीने एकटा जात होतो. एकंदर प्रवास चिंचोळ्या मार्गाचा तीन हजार किलोमीटर होता. प्रवासातील मार्गातील लागणारी दर्शनीय स्थळांना भेट देत देत थांबत-थांबत साधारण दहा दिवसांत प्रवास पूर्ण करण्याची योजना आखली होती. निघण्याचे ठिकाण श्रीनगर व पोहोचण्याचे ठिकाण हैद्राबाद होते. ही काही माझी पहिलीच सफर नव्हती. यात्रा सुरू करण्यापूर्वी मी माझ्या गुरुंना या विषयी कल्पना दिली होती.

माझ्या गुरुंनी मला टेलिफोन वर एक मंत्र दिला आणि प्रवासात त्याचा जप करण्याचा आदेश दिला. पुढे असेही सांगितले की दररोज यात्रा सुरू करण्या अगोदर त्याचा अकरा वेळा जप करावा. गुरुजींनी मला सांगितले की हा मंत्र माझ्या सुरक्षित यात्रेसाठी आहे. मी अगोदरच नमूद केले आहे की माझी पहिलीच यात्रा नव्हती परंतु त्यावेळी त्यांनी मला कधीही मंत्र दिला नव्हता.

आठवडा भराच्या प्रवासानंतर मी हैदराबादच्या जवळच्या टप्प्यात होतो. मी सोयीस्कर मार्ग निवडला होता तरी तो छोटा नव्हता. गुरुंच्या आदेशानुसार, मी दररोज निघताना अकरा वेळा मंत्र जप करत असे.

त्या विशिष्ट दिवशी, मी मध्य भारतातील आंतरिक भागांतून गाडी चालवत होतो.

मी जवळपास शंभर किलोमीटरच्या गतीने गाडी चालवत होतो. जेव्हा मी एका चिचोळ्या रस्त्यावर बसच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करत होतो. बस ड्रायव्हर मला पुढे जाऊ देत नव्हता, मी गाडीची गती कमी करण्याच्या विचारात नव्हतो. मी गाडी तशा रस्त्यावर पुढे नेण्याचा निर्णय घेतला.

माझ्या आणि बस ड्रायव्हरच्या इच्छा शक्ति मध्ये टकराव झाला. बस ड्रायव्हरला वाटले की मी नाद सोडून देईन. परंतु मी गती कमी न करता तसाच बस बरोबर सरकत होतो.

बसमुळे मला पुढे जाता येत नव्हते परिणामी मला गाडी रस्त्याच्या थोड्या बाजूला घेणे भाग पडले. गाडीची एका बाजूची दोन चाके कच्च्या रस्त्यावर होती. लगेचच माझ्या लक्षात आले की बाजूची जमीन बरोबर नाही.

शेवटी मला हार मानवी लागली कारण पुढे रस्त्यावर काही

माणसे चालत होती, अचानक मला गती कमी करावी लागली. परिणामी मी जोरदार ब्रेक लावला आणि गडीवरचे नियंत्रण सुटले.

माझ्या जीवनातील पुढील काही क्षणात जे काही घडले ते विसरण्यासाठी बराच वेळ लागला.

वाहन कशा प्रकारे परत नियंत्रणात आले त्याचे वर्णन करणे कठीण आहे. मी पहिल्यापासूनच अपरिहार्य दुर्घटनेला मनातल्या मनात स्वीकारले होते. मी स्पष्ट रुपांत जीवन आणि मृत्यू यांच्या दरम्यानच्या तलवारीच्या धारेचा अनुभव घेतला. प्रत्यक्षात, त्या अनुभवामुळे माझी शंभर पापे धुतल्या गेली असतील.

मी त्या दुर्घटनेतून सही सलामत बाहेर पडलो, आणि न मला न गाडीला एखाद ओरखाडा उठला.

त्या घटनेनंतर जेव्हा मी घटनाक्रमाचे पूर्ण दृश्य समजण्याचा प्रयत्न करत होतो त्याच वेळी माझ्या मनात गुरुजींनी दिलेला मंत्राचा नाद ऐकू येत होता.

अशाप्रकारे एका सूक्ष्म पद्धतीने आपल्या साधकांचे भाग्य रक्षण करतात.

हे जरुरी नाही की गुरु प्रत्यक्ष रुपात आपल्या अलौकिक शक्तिचे प्रदर्शन करतील.

या दोन घटनांमधील माझ्या गुरुजींनी दूरदृष्टी शक्तिचा प्रयोग केला होता.

जसे एखाद्या पडद्याआड असलेल्या दिव्याचा प्रकाश बाहेरून दिसतो, गुरुंची अलौकिक शक्ति देखील अजाणता त्यांच्या अधीन साधकां समोर प्रकट होते.

अशा प्रकारच्या अनेक घटना माझ्या आयुष्यात घडल्या. वाचकांना एवढ्यावरून विषय समजला तरी पुरे.

चला तर, आता गोष्टीचे पूर्ण समीकरण मांडूया.

जसे मी अगोदर म्हटले आहे की एका सिद्ध गुरुंच्या अलौकिक शक्ति अजाणता कधीकधी साधक अनुभवतो. माझ्या गुरुजींनी घडवलेले नाटक देखील असू शकते. गुरुजी चा एका फटक्यात अनेक उद्देश साध्य करण्याचा मानस असू शकेल.

प्रथमतः संस्कार हे नियतिच्या रूपात प्रकटणार होते ते सर्व

संपले. या अतिरिक्त, असेही होऊ शकेल की गुरुजींनी अलौकिक शक्तिचे प्रकटीकरण भविष्यात घडणाऱ्या घटना जाणल्यामुळे जाणून-बुजून प्रकट केले असेल. साधकाचा गुरु विषयी विश्वास दृढ व्हावा या हेतूने देखील केले असेल.

त्यामुळे मी म्हटले की गुरु साधकाला ज्याप्रकारे सांभाळतात हे समजणे अत्यंत गूढ आहे.

अशा प्रकारच्या घटना घडतात तेव्हा साधकाला दृढतेने योगाभ्यासाच्या मार्गावर आणले जाते जेणेकरून योगमार्गाच्या वैधते बाबत कोणत्याही शंका काढून रस्त्यावरून भरकटू नये.

अंतिम शब्द

खऱ्या अर्थी परोपकाराचे तात्पर्य काय ?

मी हे विस्ताराने समजावतो.

हे प्रत्यक्षात अहंकाराने रंगलेल्या स्वतंत्र मानवी इच्छाशक्तिचे स्वेच्छेने प्रयोग करून केले जाऊ शकत नाही. प्रत्यक्षात, यदा कदाचित उच्च शक्तिद्वारे ते निश्चित असेल तर व्यक्ति केवळ परोपकारी कृत्यासाठी एक माध्यम होऊ शकते.

कोणत्याही व्यक्तिसाठी कधीही कोणा अन्य व्यक्तिची कोणत्याही प्रकारची सहाय्यतेची आवश्यकता नाही. आणि कोणीही व्यक्ति कधीही कोणत्याही अन्य प्राण्याची मदत करू शकत नाही. सर्व जीवित प्राण्यांचे अस्तित्व अनंत आत्मा वा सर्वोच्च दिव्यते द्वारे घडत आहे. कोणत्याही बाह्य मदतीवर कोणत्याही प्रकारे अवलंबण्याची आवश्यकता नाही. सर्वप्रथम, प्राण्याला जिवंत राहण्यासाठी त्या प्रकारचे तंत्र दिलेलेच नाही. ही केवळ अहंकाराने रंगलेली मानवाची स्वतंत्र इच्छाशक्ति आहे ज्यामुळे व्यक्तिला वाटते की तो / ती सकारात्मक वा नकारात्मक रूपात संसाराला प्रभावित करण्यासाठी काही करू शकतो. तेच त्या व्यक्तिसाठी देखील लागू होते जो विचार करतो की त्याला एखाद्या बाह्य स्त्रोताच्या मदतीची आवश्यकता आहे. दोन्ही बाबी खोट्या / असत्य आहेत.

परिणाम स्वरूप, परोपकार, प्रेम, दया इत्यादी शब्दांचे त्यांच्या विपरीत आलोचकां सारखा कोणताही आधार नाही. भलेही विचार

अतिदिव्य वाटतील / असतात, शुद्ध अहंकाराने रंगल्यामुळे बुद्धीत निर्माण होतात. कोणताही विचार कितीही भव्य वा पापी भासत असला तरी त्याच्या पूर्ण सत्यासाठी कोणताही आधार नाही. प्रकृतीच्या विशुद्ध रुपांत ते सर्व भ्रामक आहे. अहंकारामुळे त्याला ऊर्जा प्राप्त होते आणि बाह्य संसारात मन व ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून प्रक्षेपित केले जाते.

केवळ मानवातील दिव्यता एकट्यानेच स्वतःच्या आंत दुसऱ्या मानवाद्वारे प्रकट करण्याची आवश्यकता आहे. कोणतेही बाह्य साधन नाही जे बचावासाठी येऊ शकते. गुरु ते माध्यम आहे यांच्या द्वारे ते संभव होऊ शकते. ते देखील केवळ त्यांच्या दिव्य कृपेमुळेच. शेवटी प्रत्येक मनुष्य स्वतःसाठी आणि स्वतःच्या आंत दिव्यता प्रकट करण्यासाठी साहाय्या विना सोडला जातो.

मनुष्याला आत्मबोध वा मोक्ष सर्व शक्ति मानाच्या कृपेशिवाय होत नाही.

आणि या स्थितीला सिद्ध करण्यासाठी मनावरील अनंत जन्मातील संचित संस्कारांना निष्प्रभ करावे लागेल.

आणि त्या अवस्थेला प्राप्त करण्यासाठी कुंडलिनी वा सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय ऊर्जेचे (ज्याने मानवाची निर्मिती केली) व्यक्तिगत स्तरावर निर्मिती पूर्ववत करण्याची आवश्यकता आहे.

आणि त्या परिस्थितीला प्राप्त करण्यासाठी केवळ गुरुला या ब्रम्हांडीय शक्तिमध्ये हस्तक्षेप करून विध्वंस वा निर्मितीच्या उलट दिशेने कार्यरत करावे लागेल. प्रत्यक्षात एकट्या मानवी मनांतील संचित संस्कार इतके प्रचंड आहेत की त्या सृजनाला पूर्ववत करण्यासाठी अनंत कालाची आवश्यकता आहे. खरी इच्छा असेल तर ते कार्य गुरुंच्या इच्छेने तीव्र गतीने होऊ शकते. परंतु गुरु सुद्धा निश्चित रुपांत सर्वात योग्य पद्धतीने त्याच्या नियतीचे नियोजन करू शकतात. तेव्हा केवळ साधकांचे सर्वश्रेष्ठ पद्धतीने प्रयत्न करून आवश्यक नियोजन गुरु द्वारे केले जाते.

त्यामुळेच, साधकाला केवळ गुरु प्रति पूर्ण आत्मसमर्पणाची आवश्यकता आहे.

आणि मानवासाठी केवळ गुरुंचीच आवश्यकता आहे.

मी या पुस्तकाला समाप्त करण्यापूर्वी सर्व वाचकांसमोर एक अंतिम प्रश्न प्रस्तुत करतो.

या भ्रामक संसारात कोणी कसे काय साक्षी वा मूक दर्शक होऊ

शकतो ? जर मन शांत अवस्थेत नसेल आणि सतत भावनांच्या वाढणाऱ्या भरतीच्या अधीन असेल ?

जाणून बुजुन ते केल्या जात नाही.

मानसिक स्तराला उच्च स्तरावर न्यावे लागते.

आणि हे केवळ दिव्यते प्रती पूर्ण आत्म समर्पणानेच साध्य होऊ शकते.

ते जाणून बुजून केल्या जाऊ शकत नाही. अहंकाराने रंगलेल्या आत्मसमर्पणाचे भ्रामक कृत्य कामास येत नाही.

तर शेवटचा उपाय काय ?

सिद्ध गुरुंची ईश्वरीय कृपा हाच उपाय आहे.

माझे गुरु, श्री स्वामी सहजानंद तीर्थजी महाराज यांना नम्र नमन त्या बरोबरच सर्व वाचकांना योग्य मार्गदर्शनाची प्रेरणा लाभो अशी प्रार्थना करतो.

शब्द-अर्थ (शब्दार्थ)

आज्ञा चक्र :- मानवी शरीरातील भ्रुकुटी मध्ये स्थित शक्ति केंद्र.

अनाहत चक्र :- मेरुदंडातील हृदय क्षेत्रात स्थितीत शक्ति केंद्र.

अनाहत ध्वनी :- कोणत्याही वस्तूवर प्रहार केल्याविना होणारा आणि अंतरात व्यक्तिला ऐकू येणारा ध्वनी.

आनंदमय कोष :- आनंदाचे आवरण. व्यक्तिच्या आत्म्यावर निर्माण झालेले पहिले आवरण व लौकिक भ्रमाच्या रूपांतील आत्मा. मौलिक शक्ति या स्तरात आपल्या सर्वात सूक्ष्म आणि मूलभूत स्वरुपांत आहे.

अन्नमय कोष :- अन्नाचे आवरण. सर्व मानव शरीराच्या रूपात व्यक्तिगत आत्म्यावरील पाचवे आणि अंतिमआवरण.

आश्रम :- योग आश्रय स्थल. ही योग गुरुंचे वा शिक्षकाचे निवासस्थान आहे ज्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत लोक योगाभ्यास करतात.

ब्रम्ह :- संपूर्ण ब्रम्हांड आणि त्याही पलीकडे सर्वव्यापी सर्वोच्च दिव्यता वा ईश्वर वा सर्वशक्तिमान इत्यादी.

बुद्धी :- ब्रम्हांडीय शक्तिचे एक रूप आहे ज्याला व्यक्तिची विद्वत्ता म्हटले

जाते अथवा विवेकाची क्षमता व त्यांत अहंकार एकरूप असतो.

चित्त :- व्यक्तिच्या मनाची सामुग्री. हा सर्व इंद्रीयांचा आधार आहे जिथून व्यक्ति स्वतंत्र इच्छेचा प्रयोग करते.

चित्त शक्ति :- ही मनाची कार्यशील ब्रम्हांडीय शक्तिचे एक रूप आहे, जिला अलौकिक शक्ति म्हटले जाते.

चक्र :- मेरुदंडातील शक्ति केंद्र.

गुरु :- आदरणीय शिक्षक जो शिष्याच्या अंतरातील अहंकार व अज्ञान दूर करतात, त्यांच्या स्वतःच्या अंतरात पहिले पासून असलेला ज्ञानाचा प्रकाश प्रकाशित होत असतो.

गुण :- मनाच्या सामुग्रीचे तीन गुण.

कारण शरीर :- व्यक्तिच्या आधीन आत्मा व ब्रम्हांडीय भ्रमाने वेढलेला आत्मा याला कारण शरीर म्हटले जाते.

क्रिया :- सर्व संस्कारांपासून व्यक्ति च्या मनाला शुद्ध करण्यासाठी जे शरीर, मन आणि सांसारिक जीवनात अनैच्छिक प्रतिक्रियांच्या रुपांत प्रकट होते.

कुंडलिनी :- सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्ति जी ब्रम्हांडाच्या रुपांत प्रकट होते. ही शक्ति गुदा आणि जननांगा मध्ये स्थित असून प्रत्येक मनुष्याच्या मेरुदंडाच्या आधारवर स्थित असते (मूलाधार).

कुंभमेळा :- हा एक नदी महोत्सव आहे. गंगा नदी किनारी भारतात दर बारा वर्षांनी साजरा केला जातो.

मनोमय कोष :- हा व्यक्तिचा आत्मा वा जीवात्मा वरील तिसरे आवरण आहे. हे सर्व इंद्रियांचे स्थान आहे जिथे स्वतंत्र इच्छेचा प्रयोग केला जातो.

माया :- लौकिक भ्रम व आपल्या सर्वात मूळ रुपातील ब्रम्हांडीय शक्ति. (महत् तत्व)

मणिपूर चक्र :- मानवी शरीरातील मेरुदंडातीलनाभि क्षेत्रात स्थित शक्ति केंद्र.

मणी द्वीप :- हे सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्तिचे निवास आहेत. याला रत्नव्दीप म्हटले जाते आणि आनंद सागराने वेढलेला आहे. संस्कृत ग्रंथानुसार हा विविध असंख्य तंत्रापासून फार दूर विशाल आणि अनंत ब्रम्हांडाच्या आतील खोलीत स्थित आहे.

मंत्र :- हा एक पवित्र संस्कृत अक्षर वा शब्द वा वाक्य अथवा वाक्य समूह आहे आणि तो वाङ्मयीन सामुग्रीच्या रूपात कितीही पटीत असू शकतो.

मूलाधार चक्र :- गुदा आणि जननांगाच्या मधोमध स्थित मेरुदंडाच्या आधार स्थित ऊर्जा शक्ति केंद्र.

ॐ:- पवित्र संस्कृत अक्षर वा ध्वनी वा मंत्र आहे जो स्वतः मौलिक ब्रम्हांडीय शक्तिच्या स्वरूपाचे प्रतिनिधित्व करतो.

परा शक्ति :- सर्वोच्च मौलिक ब्रम्हांडीय शक्ति.

प्राणमय कोष :- हा व्यक्तिचा आत्मा वा जीवात्माला वेढलेला चौथा कोष आहे. याला 'जीवन ऊर्जा आवरण' म्हटले जाते.

प्रकृती :- मूलतः शक्तिचे स्वरूप वा ब्रम्हांड वा प्रकृती आहे.

प्राण :- ही ब्रम्हांडीय शक्ति व संपूर्ण ब्रम्हांडाला व्यापलेली गतिशील ऊर्जेचे एक रुप आहे. मानवी शरीरात जीवन ऊर्जेच्या आवरणातील जीवनशक्ति देखील आहे.

राजस :- मनाच्या तीन गुणांपैकी एक, ज्याच्या मुळे सर्व रुपांत सृजनात्मकता प्रकट होते.

सात्विक :- मनाच्या तीन गुणांपैकी एक ज्याच्या मुळे सांभाळ वा जीवनातील सर्व कार्ये सर्व रुपांत प्रकट होते.

समाधी :- ही निर्विचार अवस्था आहे. आत्मबोध होणाच्या आधीची सर्व योगक्रियांचा अंतिम उद्देश आहे.

शैव :- भगवान शिवाच्या अनुयायांचे एक दर्शन शास्त्र, जी हिंदूची तीन देवतां मधील एक आहे जिला एकत्रित रुपांत त्रिवेद च्या रुपांत ओळखले जाते.

शक्तिपात :- 'शक्तिचे अवतरण' सिद्ध महायोग तंत्रात साधकाला दीक्षा देण्यासाठी शक्तिपात परंपरेत संतां द्वारे वापरले जाणारे एक तंत्र वा पद्धत.

शक्ति :- मौलिक ब्रम्हांडीय शक्ति.

शक्तिपीठ :- मौलिक ब्रम्हांडीय शक्ति केंद्र.

सिद्ध महायोग :- व्यक्तिगत कुंडलिनी शक्ति जागृती नंतर भव्य योगतंत्र, ज्यात सर्व शक्ती गत योगतंत्र एकत्रित आहेत. हे शक्तिपात पद्धतीद्वारे वापरले जाणारे एक योगतंत्र.

स्वाधिष्ठान चक्र :- मेरुदंडितील जननांगाच्या क्षेत्रात मूलाधाराच्या वर स्थित शक्ति केंद्र.

सूक्ष्म शरीर :- यात संपूर्ण भौतिक शरीरा शिवाय सर्व कोष येतात. हे शरीर मृत्यूनंतर भौतिक शरीराला सोडून पुन्हा अवतार घेते.

तमस :- मनाच्या तीन गुणांपैकी एक ज्याच्या मुळे सर्व रूपांचा विनाश होतो.

तंद्रा :- योग ग्रंथा नुसार ही जाग्रत आणि स्वप्न या मधील एक अवस्था आहे.

तांत्रिक :- तंत्राचे साधक योग तंत्रातील एक प्रकार.

वैष्णो देवी :- भारतात जम्मू काश्मीर राज्यातील हिमालयात त्रिकूट पर्वतावर स्थित देवी पीठ हे शक्ति केंद्र सर्वात लोकप्रिय आस्था स्थळ आहे.

विशोक :- दुःखाचा अंत.

विज्ञानमय कोष :- कारण शरीरावरील दुसरे आवरण बुद्धी आणि अहंकार या कोषात स्थित आहेत. हे दोन्ही, चेतन व जड सर्व ऐंद्रीय प्रभावांचे निवास आहे.

योग :- सर्वशक्तिमाना बरोबर व्यक्तिचा आत्मा व जीवनाचे मिलन / विलय.

योगी :- कोणत्याही योग तंत्राचा साधक.

योगिनी :- कोणत्याही योग तंत्रातील महिला साधक.

शक्तिपात पद्धति के आश्रम

(अनुमार्गणीय और स्वायत्त)

1. नारायण कुटी संन्यास आश्रम, टेकरी रोड, देवास, मध्य प्रदेश, भारत, पिन -००१, टेली: + ९१ ०७२७२२३८९१/३१८८०

2. स्वामी विष्णु तीर्थ साधन सेवा न्यास, १२-३, पुराने पलासिया, जोपटकोटि, इंदौर, मध्य प्रदेश, भारत, पिन - ४५२००१, टेलीफोन: +९१ ०७३१ ५६६३८६/५६४०८१

3. स्वामी शिवोम तीर्थ कुंडलिनी योग केंद्र, दुर्गा मंदिर के पास, कलेक्टरबंगला, चिन्द्वाड़ा, मध्य प्रदेश, भारत, पिन - ४८०००१, टेलीफोन: +९१ ०७१६२ ४२६४०

4. स्वामी शिवोम तीर्थ आश्रम, मुखर्जी नगर, रायसेन, मध्य प्रदेश, भारत, पिन - ४६४५५१, टेलीफोन: +९१ ०७४८२ २२२९४

5. स्वामी शिवोम तीर्थ महायोगआश्रम, खारीघाट, जबलपुर, मध्य प्रदेश, भारत, पिन - ४८२००८, टेलीफोन: +९१ ०७६१ ६६५०२७

6. देवात्मा शक्ति सोसायटी, ७४, नावली ग्राम, पोस्ट धहिसर

(मुंब्रा के माध्यम से), मुंब्रा पनवल रोड, ठाणे जिला, महाराष्ट्र, भारत, पिन –४००६१२, टेलीफोन: +९१ ०२२ ७४११४००

7. Sri Swami Sahajananda Tirthji Maharaj, c/o Asheervad Oldage Home, Near Nagasai Mandir, Kabela Center, RR Nagar, Vijayawada, Andhra Pradesh, Mobile : 9848219240

8. शिवोम कृपा आश्रम ट्रस्ट, मकान संख्या २८-१४६३ / १, तेनेबांदा, शिवोम नगर, चित्तौड़, आंध्र प्रदेश, भारत, पिन - ५१७००४, टेलीफोन: +९१ ९४४००६९०९६, ०८५७२ ४९०४८

9. योग श्री पीठ आश्रम, शिवानंद नगर, मुनि-की-रेठी, ऋषिकेश, उत्तराखंड, भारत, पिन - २४९२०१, टेलीफोन: +९१ ०१३५ ४३०४६७

10. ओम कार आश्रम, चित्तोढ़ शासनागिर, जूनागढ़, गुजरात, भारत

11. ओम कार साधन आश्रम, आणंद, गुजरात, भारत

12. स्वामी विष्णु तीर्थ ज्ञान साधन आश्रम, कुबुदु मार्ग,केडी गुर्जर, गनुर, सोनीपतजिला, हरियाणा, टेलीफोन: +९१ ०१२४ ६२१५०/६१५५०

13. विष्णु तीर्थ सिद्ध महायोग संस्थानम, शिवोमकुटी आश्रम, निकट कालेश्वरमंदिर, बहादुरपुर मार्ग, अमलनेर पोस्ट, जलगांव जिला, महाराष्ट्र, भारत, पिन –४२५४०१

14. गुरु निकेतन, शिव कॉलोनी, डबरा, ग्वालियर जिला, मध्य प्रदेश, पिन - ४७५११०, टेलीफोन: +९१ ०७५२४ २२१५३

15. स्वामी शिवोमतीर्थ आश्रम, १२३८. आर टी.९७, स्पैरो बुश, न्यू यॉर्क, १२७८० सं.रा.अमेरिका

16. स्वामी शिवोमतीर्थ आश्रम, रूट नं 97,पोंडएड्डी, सल्लिवन कंट्री, न्यूयार्क, संयुक्त राज्य अमेरिका

17. स्वामी शिवोमतीर्थ आश्रम, ३९,एजमेरड्राइव, सीरिंगटाउन, न्यू यॉर्क, ११५०७, संयुक्त राज्य अमेरिका

18. न्यूयोर्क के देवात्मा शक्ति सोसायटी, पी.ओ. बॉक्स १४३२, न्यू यॉर्क, १०१८५, संयुक्त राज्य अमेरिका

19. Mr Ravi Kumar Kousik , Hyderabad, India, Mobile No. +91 8978611137

20. Mr Ajay Humsagar , Hyderabad, India, Mobile No. +91 9449824331

21. Mr Nageswar Rao, Andhra Pradesh, India, Mobile No. +91 8121451216, 9032711335, 8639139422, 9291243367, 9032439290

शक्तिपात पद्धति के संत (अनुमार्गणीयइतिहास)



लेखका विषयी

वयाच्या पंधराव्या वर्षी रॉक क्लाइंबिंग आणि पर्वतारोहणाचा अती उत्साहवश शक्तिशाली हिमालयाच्या पर्वतांच्या रांगा आणि गंगा नदीच्या स्त्रोताकडे आकर्षित झाले होते.

त्यांनी दोन हजार मैंलांपेक्षा जास्त लांबीचा प्रवास केला. हा प्रवास त्यांना एका पूर्णतः वेगळ्या यात्रेच्या दिशेकडे घेऊन गेला. जेव्हा एका तरुण युवकाच्या रुपांत त्याच गाडीत त्यांची आपल्या हिमालयातल्या गुरुं ची भेट झाली.

त्या तरुण युवकाने अजाणता, त्यांची यात्रा सुरू होण्या आधीच त्यांची एक मोठी गाथा लिहून ठेवली होती.

लेखक सध्या भारतीय सेनेत सेवारत आहेत.